# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

मा. विशेष महासभा दि. ०३/१२/२०१६

आज शनिवार दि. ०३/१२/२०१६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी १०.०० वाजता सभा सुचना क्र. ०६ दि. २९/११/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | जैन गिता भरत | महापौर |
| २) | प्रविण मोरेश्वर पाटील | उपमहापौर |
| ३) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सभापती, स्थायी समिती |
| ४) | मुन्ना सिंग | सभागृह नेता |
| ५) | लियाकत ग. शेख | विरोधी पक्षनेता |
| ६) | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ७) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ८) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ९) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| १०) | मयेकर सरस्वती रजनीकांत | सदस्या |
| ११) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १३) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १४) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १५) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १६) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १७) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| १८) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १९) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २०) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २१) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २२) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २३) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २४) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २५) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २६) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| २७) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| २८) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २९) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३०) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३१) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३२) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३३) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३४) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ३५) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ३६) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ३७) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ३८) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ३९) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४०) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ४१) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४२) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ४३) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ४४) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ४५) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |

| | | |
|---|---|---|
| ४६) | मेहता नरेंद्र लालचंद | सदस्य |
| ४७) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ४८) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ४९) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ५०) | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | सदस्या |
| ५१) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ५२) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ५३) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ५४) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ५५) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ५६) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ५७) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ५८) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ५९) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ६०) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६१) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ६२) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ६३) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ६४) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ६५) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ६६) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ६७) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ६८) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ६९) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ७०) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ७१) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ७२) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |
| ७३) | हेमंत म्हात्रे | नामनिर्देशित सदस्य |

<u>गैरहजर सदस्य –</u>

| | | |
|---|---|---|
| १) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| २) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ३) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| ४) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| ५) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ६) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ७) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ८) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ९) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| १०) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ११) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| १२) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| १३) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| १४) | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | सदस्या |
| १५) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| १६) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| १७) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| १८) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| १९) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| २०) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| २१) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| २२) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| २३) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| २४) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |

<u>रजेचा अर्ज –</u>

१)	मेंन्डोंसा स्टिवन जॉन	सदस्य

मा. महापौर :-

सचिव सभेला सुरुवात करावी.

प्र. नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा शनिवार दि. ०३/१२/२०१६ रोजी सकाळी १०.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०६, दि. २९/११/२०१६ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ९३, सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामधील मालमत्ता धारकांच्या मालमत्ता करातील व्याजाच्या रक्कमांना माफी देणेबाबत अभय योजना लागु करणे.

भगवती शर्मा :-

दि. २/०३/२००० सभा के अंदर में इसी तरीके का ठराव किया था। महानगरपालिका मालमत्ता कराचा आकारण्यात आलेली शास्ती कमी करण्याबाबत. उसके अंदर में लिखा था भिवंडी निजामपूर महानगरपालिका में, ठाणे महानगरपालिका में, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कर धारकांना स्वतःच्या मालमत्तेवरील असा मी ठराव मांडत आहे. महापौर मॅडम आपकी माध्यम से पुछना चाहता हूँ की, ठराव के बाद के अंदर में क्या अंमलबजावणी हुई, कितने लोगो के ऐसे व्याज माफ किए थे, कितने लोगो के टॅक्स भरे इसका लाभ कितने लोगो ने उठाना।

वंदना चक्रे :-

माझे अनुमोदन आहे.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम, दुसरी मैंने सुचना की थी इन्होंने इसके अंदर में ठराव दिया था। नियम के अंदर में क्या है यह अधिकार आयुक्त को है की महासभा को है किसको है।

मा. उपायुक्त (मु.) :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, कराधार नियम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कराधार नियमाअंतर्गत नियम क्र. ५१ शास्ती किंवा वसुलीचा खर्च माफ करता येईल. आयुक्तास आपल्या स्वेच्छा निर्णयानूसार नियम ४१ खालील शास्ती किंवा नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च पूर्णतः किंवा अंशतः माफ करता येईल अशा स्वरुपाची तरतूद कराधार नियमामध्ये आहे.

भगवती शर्मा :-

पूर्णतः आहे?

मा. उपायुक्त (मु.) :-

नाही अंशतः किंवा पूर्णतः स्वेच्छा निर्णय म्हटलेला आहे की आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार नियम ४१ खालील शास्ती आता नियम ४१ खालील शास्ती म्हणजे असे आहे की, जर आपण बील दिल्यानंतर म्हणजे आपण जेव्हा घर मालमत्ता कराचं देय दिल्यानंतर जर संबंधितांनी ते ९० दिवसांच्या आतमध्ये नाही भरलं तर दरमहा २ टक्के ही जी शास्ती आपण ह्या ठिकाणी आकारतो तर ती शास्तीची जी रक्कम आहे ती त्याच्यामध्ये अभिप्रेत आहे आणि जर समजा त्यांनी भरलं नाही आणि आपण कधी जप्तीचा अधिवारंट काढल नियम क्र. ४४ नुसार जर अधिवारंट काढलेला असेल तर त्याच्या सुध्दा रक्कम आपण त्याच्यामध्ये नमुद करतो तर ती सुध्दा त्यांना माफ करण्याचा त्या कलमानुसार अधिकार दिलेला आहे.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम, जो आपने इन्होंने गोषवारा में दिए है। लेकिन मुझे यह नही लगता है की, इन्होंने कोई डिमांड रखी हो क्योंकी ऐसे ही विशेष महासभा थी महापौर मॅडम आढावा की एक मिटींग हुई थी। इसके अंदर में हुआ था की महापौर मॅडम मैं ठराव पढता हूँ। मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांचे नियोजन होऊन कर आकारणी तयार करण्याकामी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील २०१५-१६ मध्ये आठ कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे. ठोक तरतूद केलेली इसके अंदर में अपनी डिमांड क्या है? आयुक्त साहेब यह विषय लाया। यह विषय लाया ऑफिस के अंदर में बैठके वोट दिए थे क्योंकी ऐसी प्रॉपर्टी है जिसके अंदर में कई बार सभागृह के अंदर में मिटींग में निर्णय लिया था की विधी अधिकारी को सूचित किया जाए। उसके उपर में बंधनकारक किया जाए क्योंकी वो जाकर पुछता हूँ की असेसमेंट क्या है। लेकिन आज तक हूआ नही उसके बाद में इस ठराव के अंदर में इतना पैसा खर्च करके यह हुआ था, प्रशासन के व्यवस्था भी नही कर पा रहे है। जिसके लिए भारतीय एजन्सी को लेकर के यह सर्व्हे करा के इस काम को पुरा किया है। तो अभी हम ऐसी ही अंदर के अंदर में आपने गोषवारा दिया है की माती योजना को लागू किया जाए। तो यह एजन्सी का जो सर्व्हे आएगा तो उसकी उपर में क्या यह काम कितना बढाया और यह काम शुरु हुआ है की नही हुआ है। आपने डिमांड रखी है मेनटेनन्स हुआ है की नही हुआ है। तो पिछे बार बार वैसी ही एन्स्ट्रूमेंट इन्होंने लेने के लिए कहाँ था। स्टॅन्डिंग में की नेक्स मिटींग के अंदर में हम पुरा काम कम्पलीट करके आपको महासभा के अंदर में प्रस्तुत करेंगे और पुरा

आढावा देंगे। तो कम से कम उस आढावा मिटींग के बाद में विषय वही है तो कम से कम उसकी पुरी जानकारी दे।

मॉरस रॉड्रीक्स :-

आयुक्त साहेब शास्ती लावायचे कारण काय आहे?

मा. उपायुक्त (मु.) :-

शास्ती जर ४१ सेक्शनमध्ये आपल्याला वाचून दाखवतो की, जेव्हा अनेक कराच्या मागण्या बद्दल आपण जे एक बील सादर करतो ते बील सादर केल्यानंतर अशा बीलमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पहिल्या सहामाही कराची रक्कम बील दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत भरायची असेल आणि बीलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे दुसऱ्या सालातराची रक्कम ३१ डिसेंबर पूर्वी भरायची असेल म्हणजे घरपट्टीचे बील भरण्यासाठी आता आपल्याकडे २ सहामाही आकारणी होतात पहिली सहामाही आकारणी ही १ एप्रिलपासून ३० सप्टेंबरपर्यंत त्याचे बील १ एप्रिलपासून ९० दिवसाच्या अंतरामध्ये म्हणजे एप्रिल, मे, जून म्हणजे जून एन्डपर्यंत भरणे आवश्यक आहे. आणि दुसरी सहामाही आकारणी ही १ ऑक्टोबरपासून तर ३१ मार्चपर्यंत असते. त्याची ३१ डिसेंबरपर्यंत बील भरणे आवश्यक आहे. जर त्यांनी ९० दिवसांच्या आतमध्ये बील नाही भरलं तर त्याला दरमहा २ टक्के प्रमाणे आपण शास्तीची कर आकारणी करत असतो.

मॉरस रॉड्रीक्स :-

अनधिकृतवरती शास्ती लावण्याचा.

मा. उपायुक्त (मु.) :-

अनधिकृत कलम सर वेगळा आहे. अनधिकृतच कलम हे २६७ (अ) आहे.

कल्पना म्हात्रे :-

म्हसाळ साहेब चुकीच सांगत आहेत ते व्याज आहे.

मा. उपायुक्त (मु.) :-

ह्या आपल्या कराधार नियमामध्ये दोन्ही प्रकरणांना शास्ती म्हटले आहे म्हणून आम्ही शास्ती कंसात व्याज म्हटलं आहे. आपण किंवा काही ठिकाणी प्रशासकीय रक्कम बोलतात तर प्रशासकीय आकारणी बोलतात. आकारणी तर काही ठिकाणी व्याज बोलतात काही ठिकाणी शास्ती बोलतात तर शास्तीला किंवा प्रशासकीय आकारणी ही जी कराधार नियम हा ४१ मध्ये म्हटलं आहे. त्याच्याबद्दलच आपण माफीचा प्रस्ताव किंवा त्याच्यामध्ये किती सूट देता येईल अशा स्वरुपाचा प्रस्ताव आज याठिकाणी पटलावर ठेवलेला आहे आणि आपण जे सर म्हणतात तर ते २६७ अनधिकृत बांधकामाच्या याच्यामध्ये तीन पट कर आकारणी करावी अशा स्वरुपाचा आहे.

मॉरस रॉड्रीक्स :-

अजून महिनाभर लावलच नाही कारण काय झाल शास्ती लावण्याचं कारण काय तुम्ही काय झोपलेले आहेत.

मा. उपायुक्त (मु.) :-

सर्व सन्मा. सभागृह विषय असा आहे की आपल्याला हे जे घरपट्टी असते ही १ एप्रिलला ड्यू असते म्हणजे आपल्या आहेत.

मॉरस रॉड्रीक्स :-

जितक्या अनधिकृत स्थाने झालेले आहेत. आपले अधिकारी काय करतात चार महिन्याच्या आत बिल्डींग होतात.

मा. उपायुक्त (मु.) :-

आजचा हा विषय अनधिकृत बांधकाम शास्तीवरचा नाही आहे.

मॉरस रॉड्रीक्स :-

साहेब त्याच्यावर सुध्दा लावलेली आहे.

मा. उपायुक्त (मु.) :-

अनधिकृतला शास्ती लावायचीच नाही शासनाने सांगितलेले आहे. आजचा तो विषय नाही आजचा विषय फक्त विलंबीत पध्दतीना जर कोणी देयक भरला असेल तर त्याला आपण इंटरेस्ट लावतो ते इंटरेस्टलाच शास्ती शब्द आहे. मराठीमध्ये येथे दोन गोष्टीना एकच शब्द प्रयोग केलेला आहे.

मॉरस रॉड्रीक्स :-

त्याला शास्ती लावलेली आहे मी सांगतो तुम्हाला.

मा. उपायुक्त (मु.) :-

कशासाठी शास्ती लावलेली आहे.

मॉरस रॉड्रीक्स :-

त्यांना तुम्ही नोटिस न बजावता शास्ती लावलेली आहे. ज्यावेळी काम चालू असताना तुम्ही का बंद केले नाही.

मा. उपायुक्त (मु.) :-

नाही आजचा मुद्दा हा अनधिकृत बांधकामा संदर्भातला मुद्दा नाही. २६७ याचा शास्तीचा आपण या ठिकाणी पटलावर विषय ठेवलेला नाही.

मॉरस रॉड्रीक्स :-

लावलेली आहे म्हणून...........

मा. उपायुक्त (मु.) :-

सर त्याच्यावरती लावायची अधिनियमातच तरतूद झालेली आहे ना. विधीमंडळाने...............

मा. महापौर :-

म्हसाळ साहेब, आज आपण टॅक्सचा विषय घेऊनच घेतला आहे तर हा विषय तुम्ही क्लिअर करुन घ्याव अशी माझी पण इच्छा आहे. तुम्ही सांगत आहेत शास्ती कोणाला लावतो आपण.

मा. उपायुक्त (मु.) :-

जी बांधकाम परवानगी शिवाय बांधलेली असतील तर त्या सर्वांना शास्ती लावण्याचे अधिनियमामध्ये तरतूद आहे.

मा. महापौर :-

परवानगी शिवाय म्हणजे तुम्ही सांगतात सी.सी. घेतली नाही तर परवानगी शिवाय का पहिला मतलब तो समझो हम।

मा. उपायुक्त (मु.) :-

अनधिकृत.

भगवती शर्मा :-

इन्होंने शास्ती दो जगह पे ली है। एक तो जिन्होंने सी.सी. ली है तो ओ.सी. नही ली सी.सी. लीया ओ.सी. भी लिया उस समय के अंदर मे मा. शिवमूर्ती नाईक साहब कमिशनर थे उन्होंने एक मध्यम मार्ग निकाला था की बहोतसी बिल्डींगो की अंदर में बिल्डर पजेशन देके जा चुके है। अब वह बिल्डर को. ऑपरेट हुआ करके गए वैसी स्थिती के अंदर में उन्होंने एक मार्ग निकाला था। उसका एक नोटीस भी निकाला था उसके बाद में उसका एक पत्र भी निकाला था। उसमें उन्होंने कहाँ था की अगर संबंधित बिल्डींग का आर्किटेक्ट यह लिख के देने के लिए तयार है की यह बिल्डींग एक प्रत काम के हिसाब से बनी हुई है तो यह शास्ती की रक्कम हटा दिया जाए उसको अनधिकृत बांधकाम में ही देना चाहिए उस समय के अंदर में उन्होंने आदेश दिया। उस समय के बाद उन्होंने आदेश को वापीस रिव्हाईस किया वह दो दो आदेश हुए उन दोनो आदेश के बाद के अंदर में प्रशासन के अंदर में ही जितने आयुक्त आए उन्होंने निर्णय ही नही ले पाए। तिसरी बार जब आपने आढावा मिटींग रखी मॅडम उस समय के अंदर के अंदर में यह निर्णय हुआ था उस समय हांगे साहब ने आदेश दिया था की हम १५ दिन के अंदर में क्योंकी लिगल डिपार्टमेंट का ओपीनीयन देखा जाए तो उन्होंने बोला राज्य शासन के पास में जाके हम इसका क्लियरन्स पास करके देंगे क्योंकी इसके एकही मुद्दा दुसरा मुद्दा हो गया था की, मैंने प्लान पास करवाया तो वहाँ पे साडे पाच हजार रुपया उसका स्टेटमेन्ट पास किया तो अब ५०० रुपये पे लगना चाहिए की एक बील भरा उसका लगना चाहिए की दो बील भरा उसको लगना चाहिए। लेकिन होता है की पुरी बिल्डींग की उपर शास्ती लगाई जा रही है। तो जो १०५ जितना कन्स्ट्रक्शन हुआ कमसे कम उसकी उपर तो शास्ती लगना नही चाहिए। एक तर्फी इस टाईप की इस महासभा के अंदर में कई बार चर्चा हुई है। लेकिन उसके उपर में आयुक्त साहब कभी भी कोई निर्णय आज तक हुआ नही है। आज भी लोग मॉरस शेठने उसकी उपर मुद्दा उठाया शास्ती लगाई गई उसकी उपर लेकिन उसपे भी व्याज लग रहा है। व्याज पे व्याज लग रहा है वही बात बढती जा रही है। क्योंकी उसपे भी लोग भरने के लिए तयार है शास्ती जो बाजूवाले है जो बेवजह भर रहे है जो शास्ती से कारण से इंटरेस्ट से इंटरेस्ट बढता जा रहा है एक उदाहरण मैंने पिछली बार महासभा में किया था साहेब की एक व्यक्ती ने ओ.सी. ले ली थी जब ओ.सी. ली उस समय के अंदर में उसमें ॲप्लीकेशन देना भूल गया उसके बाद में ॲप्लीकेशन उसने दी तो उन्होंने बोला की आर्किटेक्ट से ॲप्लीकेशन दिया तब भी बाजू मानी नही। मैंने कई बार आपने अंदर के अंदर अभी जाके उसका आढावा एक तरफ से बिल्डींग को लागू किया उसके उपर व्याज, व्याज के उपर ओव्हर टाईम लगा दिया उन लोगो ने तीन टाईम के अंदर में आयुक्त साहब पैसे भरे थे। लास्ट के अंदर में उस व्याज की रक्कम के लिए डिस्ट्रीब्यूट प्रस्तावित किए गए अभी जाकर के उसका विस्तार हुआ है। लेकिन आज जो ऐसे कई बिल्डींग है। इन्होंने जब ठराव किया था उसके अंदर में मिनिट्स के अंदर लिखा था और प्रुफली बता देता हूँ की अनधिकृत इमारतीचे किंवा जिथे बांधकामावर शास्ती असेल तर त्वरीत रद्द करा उस समय ठराव के अंदर में एक सूचना हुई थी लेकिन कभी भी महापौर मॅडम इसपे अंमलबजावणी नही हो रही है। हम अभय योजना निकाले लोग पैसा भरने के लिए तयार है। इसमें भी भरने के लिए तयार है उसमें भी भरने के लिए तयार है।

मॉरस रॉड्रीक्स :-

पहली बात तो मुझे यह है की यह हुआ कैसे अपने प्ले ग्राऊंड में बिल्डींग नही हो रही है अपने गार्डन में बिल्डीग हो रही है तो अपने अधिकारी क्या सो रहे मोदीजी बोल रहे है की अपने भ्रष्ट्राचार निदानाचे तो अपने अधिकारी को निकालना चाहिए जो अधिकारी नियोजन पे है जो एक नंबर पे काम करनेवाला मोदीजीने बोला की इधर दस नंबर चल रहा है आज नई बिल्डरोने मुझे टेबल को जाने के लिए दस लाख चुकाना पडता है। तो किस लिए यह जो प्ले ग्राऊंड में बिल्डींग हो रही है गार्डन में बिल्डींग हो

रही है जो कोई भी प्लेस में जो बिल्डींग अनधिकृत उसके लिए शास्ती लगानी जरुरी नही है। जो अपने अधिकारी को बरखास्त करना चाहिए।

मा. महापौर :-

म्हसाळ साहेब शास्ती लावण्याआधी २६८ नोटीस देणे गरजेचे आहे.

मॉरस रॉड्रीक्स :-

२५ वर्षापासून हेच चाललेल आहे. मी २५ वर्षापासून हेच बघतो अधिकारी १० वर्ष काढतात. इकडे १-१ जण नियोजनमध्ये १०-१० वर्ष एक जण जातो. दहा वर्षांनी पुन्हा येतो फक्त ४० वर्षांनी एवढेच नियोजन भाईंदरला झालेले आहेत. मी ३५ वर्षापासून इथे नगरसेवक आहे आणि पुढेही राहणार आहे. जर कुठला आयुक्त ॲक्शन घेत नाही तर त्यांना प्रशासनासाठी इकडे पर्दापण करतात आणि त्याच्यावर काही ॲक्सेप्ट घेत नाही तर त्यांनी दुसरे मागून घ्या असे सांगण्यात आले त्यांचे चालूच आहे. त्यांच्यावर शास्ती लावायची जरूरत नाही. काढून टाका लिगली करुन घ्या मी सांगतो.

मा. उपायुक्त (मु.) :-

सन्मा. महापौर मॅडम, आपण विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देतो २६७ अ मध्ये असे म्हटलेले आहे. कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम करील किंवा पुर्नःबांधकाम करील तो अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत त्याच्याविरुध्द दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत दरवर्षी अशा इमारतींवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल. अवैध बांधकाम करील ज्याच्यामध्ये असा शब्दप्रयोग केलेला आहे असा कर शास्ती बसविण्यावरती गोळा करणे असे अवैध बांधकाम किंवा पूर्नःबांधकाम ते अस्तित्वात असे तोपर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुर्नःबांधकाम विनिमयित झाले आहे असे अन्वयार्थ लावला जाणार नाही आणि मग असा कालावधी कितीही असो तर आपण म्हणालात जसं तर आपण म्हणालात मगाशी पाचशे बोललात नंतर साडे पाचशे तर त्यासंदर्भात बोलेल की जर परवानगीप्रमाणे त्यांनी बांधकाम केल ओ.सी. प्राप्त न होता जर त्यांनी वरती एक मजला उभारला २ मजले उभारले तर अनधिकृत ही ती बिल्डींग म्हणजे परवानगीच्या विरोध बांधकाम म्हटल्यामुळे ते संपूर्ण बांधकाम अनधिकृत ठरल जातं.

भगवती शर्मा :-

ह्या जी.आर. मध्ये काय लिहिले आहे. शास्ती करण्यापूर्वी राहिलेल्या कोणत्याही इमारतीचे एक शब्द ज्यादा किंवा इमारतीच्या भागाच्या अवैधरित्या बांधकामाकरिता सात दो के इसके अंदर में दो क्वेशन है। एक इमारत अथवा अगर उस इमारत की अंदर में कोई बांधकाम अवैधरित्या बांधता है तो उसको देना चाहिए अगर अपने पहिली बार को आपने इमारत अवैध बांध दी तो इमारत आपकी पकडी गई या उसकी अंदर में किंवा शब्द है इमारतीच्या अवैध भाग मतलब क्वेशन ऑफ इललिगल तो आप यह क्वेशन ऑफ इललिगली पुरा बिल्डींग का क्यों बनाते है। ऐसी कई बिल्डींग है साहब।

मा. उपायुक्त (मु.) :-

नाही.

भगवती शर्मा :-

जैसे साहब की कई बिल्डींग ऐसी है जिन्होंने क्लेम सर्टिफिकेट ले ली उसकी बाद की अंदर में ओ.सी. भी ले ली इसकी तौर पर दिया आपने उसको शास्ती लगा दी। अभी आपने बोला ना ओ.सी. के पहले शास्ती लगा दी। अभी आप ने बोला ना ओ.सी. के पहिले।

मा. उपायुक्त (मु.) :-

परवानगीच्या विरोध झाला साहेब ना ते. बघा तुम्ही स्टील कव्हर केल परवानगीच्या विरोध झाल ते पूर्ण इस्टेट स्ट्रक्चर स्टील अनधिकृत झाल आपण नगररचनाच्या जर सर.

मा. महापौर :-

साहेब ओ.सी. घेतल्यानंतरच्या कव्हर केलेल आहे. ते जे सांगत आहेत ते ओ.सी. घेतल्यानंतरच आहे.

मा. उपायुक्त (मु.) :-

ओ.सी. केल्यानंतर केल असेल तर त्याचा भाग झाला परंतु ओ.सी. केल्याच्या पूर्वी झाला असेल तर ते पूर्ण स्ट्रक्चर अनधिकृत झालं. नगररचनाच्या नगररचनामध्ये एम.आर.टी.पी. च्या अंतर्गत ही डेफीनेशन आहे त्याच्यामध्ये परवानगीच्या विरुध्द केलेले कोणतेही बांधकाम हे अनधिकृत ठरल जाते आपण विधी विभागाचे याच्यामध्ये घेतले.

भगवती शर्मा :-

की इस स्टील बाद में कव्हर किया है। आयुक्त महोदय ओ.सी. लेने के बाद में पर्टीक्युलर क्वेशन हो गया ना तो हम सब का क्वेशन हो गया अपने हिसाब से विरोध किया। दुसरी बात और बताता हूँ आपको कई बिल्डींग ऐसी है, जिन्होंने पुरा ओ.सी. ले लिया उपर के अंदर में जाके फिर से कॉम्पलेक्स बनाया आपकी पुरी बिल्डींग को पुट कर दिया बराबर है। कई बिल्डींग ऐसी है जिनके अंदर में जैसे मा. शिवमूर्ती नाईक साहब ने आदेश निकाला था। २००९ के अंदर जब आदेश निकाला था ऐसी कई बिल्डींगो को आपने ओ.सी. आर्किटेक्चर देने के बाद में की अंदर में इनसे शास्ती नही लगाई बराबर है। इसको

ओ.सी. माना गया था क्योंकी उन्होंने आदेश दिया था तो एक ओ.सी. का ही आदेश था। अगर कोई आर्किटेक्ट सर्टिफिकेट दे देता है यह इमारत एक तरफ प्लान पास के हिसाब से है। दुसरी उपर से शास्ती नही लगते है। आपने उसको मान लिया उस के बाद के अंदर में उसमें अवैध बांधकाम हूआ। उस बार फिर से शास्ती के अंदर में ले लिया, एक ही बिल्डींग को दो दो बार साहब कई बार आयुक्त साहब यहाँ पर आयुक्त साहब गए। हर सदस्य की एक भावना है की, इस सभा की अंदर में यह जो शास्ती का जो सब इन्होंने उठाया है। बहुत से बिल्डर बिल्डींग बांधके चले गए लेकिन आज रहनेवाले परेशान है। लेकिन उसको कई ना कई राजनिती मिल जाती है। आप लिगल मॅडम को बुलाएँ कई बार आयुक्त के पास हमने जाके दाद मांगी है। उन्होंने वडके मॅडम से पूछा की इसकी अंदर आप ओपिनियन दिजीए। उन्होंने ओपिनियन दिया और में आपको अभी इसकी अंदर में प्रोसेडिंग के अंदर में पाच मिनिट बैठ दिजीए। पिछले आयुक्त के अंदर में उन्होंने बोला था की मंत्रालय मैं मिटींग लगाए। इसका व्हेरीफिकेशन लेके लोगों को आयोजित करेंगे लेकिन आज ३-३ महिना उसको भी हो गए। महापौर मॅडम धन्यवाद करता हूँ आपका की आपने ठिक आयोजन किया। इस सत्ता के अंदर में आज आप जनहित के लिए पब्लीक के लिए लेटरफाय कर के उठाया लोगो को भी कम से कम राहत मिली। इसके लिए आपने यह मुद्दा उसके अंदर में सम्मीलीत किया। इसके अंदर दोनो की उपर चर्चा किया।

मा. महापौर :-

खर आहे म्हसाळ साहेब माझी पण ती भावना आहे की आपण आपल्याकडे एवढे प्रकरण येतात. रोज तर त्याच्यात आम्ही जे चेअरवर बसतो तिथे रोजच नविन प्रकरण असते. आता एखादी बिल्डींगला चार वर्षांनी ओ.सी. मिळाली तरी आपण सुधारीत बिल पाठवले नाहीत. म्हणून त्यांनी भरल नाही म्हणून त्यांच्यावर व्याज चढले आहे. असे कित्येक प्रकरण आहेत. ॲज पर प्लान आहे. आपण तरीही त्यांना शास्ती लावतो. असे पण भरपूर प्रकरण आहेत. एकाच वर्षात आपण एक ओ.सी. मिळालेली बिल्डींगला शास्ती लावली नाही आणि ओ.सी. नाही मिळाली ही शास्ती लावली नाही. तसेही भरपूर प्रकरण आहेत. मग प्रकरण हे सगळ क्लिअर करुन आपले पण बिल्डींग येणार आणि लोकांना ही त्याच्यातून राहत मिळणार असे काहीतरी मार्ग काढा अशी माझी ही इच्छा आहे.

मा. उपायुक्त (मु.) :-

मॅडम २६७ (अ) ज्यावेळेस ह्या अधिनियमामध्ये दुरुस्ती करण्यात आली त्यावेळेस शासनानी शासन स्तरावरती ज्या बैठका झाल्या होत्या त्यावेळेस काही चर्चांमध्ये हा डिफरन्ट मेजर आहे. अनधिकृत बांधकाम करण्यासाठी लोक बजाऊ नये लोक त्यापासून परावृत्त व्हावीत यासाठीचे हे अमेटमेन्ट केली होती की लोकांना जर एक पटावरून तीन पट जर कर आकारणी झाली तर लोक अनधिकृत बांधकाम करणार नाहीत. धजावणार नाहीत. परंतु आता काय होत की, परवानगीचे आपण जस म्हणालात की एक काम स्ट्रक्चर एक बिल्डींग बांधली. चार महिन्याच स्ट्रक्चर आहे. त्याला परवानगी दिली त्यांनी ओ.सी. च्यानंतर जर बांधल तर पोर्शन ठरतो. परंतु ओ.सी. च्यापूर्वी जर बांधल तर पूर्ण बिल्डींग अनधिकृत ठरते. नाही नगररचनेच्या डेफीनेशनप्रमाणे एम.आर.टी.पी. प्रमाणे जी परवानगीच्या विरुध्द असेल ती स्ट्रक्चर अनधिकृत ठरत मग त्याच्याविषयी पोशन असेल नाहीतर मग हे असेल.

लियाकत शेख :-

साहेब एक सिम्पल प्रश्न आहे. आम्हाला जाणून घ्यायचा आहे. अनधिकृत आणि अधिकृत तुम्ही अनधिकृत केव्हा डिक्लेर करणार माझी सी.सी. आहे. ओ.सी. घेण्यासाठी मला वेळ लागला अशा परिस्थितीत जर मी ओ.सी. घेतली नाही तर ती बिल्डींग अनधिकृत ठरली का? तर एक सिम्पल प्रश्न आहे. पहिले त्या प्रश्नाचं उत्तर द्या.

मा. उपायुक्त (मु.) :-

ओ.सी. न घेता जर भोगवटा केला तर अनधिकृत भोगवटाच ठरतो तो.

लियाकत शेख :-

तर अनधिकृत ठरवताना तुम्ही त्या पध्दतीची कारवाई करता का? २६० च्या नोटीसी घेऊन ते अनधिकृत डिक्लेर केले आहे का?

भगवती शर्मा :-

नियमाप्रमाणे सांगा ना तुम्ही.

लियाकत शेख :-

तुम्ही त्याला अनधिकृत डिक्लेर केले आहे का? त्या प्रोसीजरप्रमाणे. ॲजपर त्या २६० ची नोटीसा देऊन त्यांना संधी दिली का?

मा. उपायुक्त (मु.) :-

अनेक प्रकरणामधून २६० त्या नोटीसा गेल्या आहेत. या सर्व जेवढे शास्ती लागलेत अशा सर्व प्रकरणांना नोटिसा गेलेल्या आहेत. शास्ती लागलेल्या सर्व प्रकरणामध्ये नोटिसा गेल्या का की याची मी सगळी आपल्याला माहिती घेऊन सभागृहाला देईल.

भगवती शर्मा :-

साहेब २०१५ मध्ये मिटींग झाली होती. साहेब तुम्हाला सभा मधील मिनिट्स वाचून दाखवतो. काय त्यांनी सांगितले.

लियाकत शेख :-

साहेब लक्षात आले का काय विचारतोय? अनधिकृत ठरवताना तुम्ही ती प्रोसिजर केली आहे का ती ऑथोरीटी कोण आहे एकतर तुम्ही आहात किंवा कोर्ट आहे पण ती कारवाई ड्यू प्रोसिजर ऑफ लॉ झाली पाहिजे तशी काही बिल्डींग अनधिकृत आहेत याच्यावर शास्ती लागली पाहिजे. तुम्ही सरसकट लावून टाकली ओ.सी. आली नाही. लावून टाका शास्ती. बरोबर नाही ना. मी टेक्नीकल प्रश्न विचारलेला आहे.

मा. उपायुक्त (मु.) :-

लोक थांबत नाहीत कर आकारणीसाठी प्रस्ताव आला की ही सगळी प्रोसिजर होईपर्यंत कोण थांबायला तयार नाही. तुम्ही कर लावा कर लावा फक्त आम्ही नंतर एका बाजूला आपल्याकडून सुध्दा एक रेट असतं की तुम्ही करासाठी लोक आलेत आणि कर लावलेला नाही. तर ही प्रोसिजर होईपर्यंत सुध्दा कोणी थांबत नाही.

लियाकत शेख :-

आम्ही कुठे बोलतो कर लावू नका. त्याच्यामध्ये अनधिकृत ठरल्यानंतर शास्ती लावा ना साहेब. साहेब लक्षात आल का? कर लावण्यासाठी आलो मी कर भरा माझी बिल्डींग झाली आहे माझे दोनशे फ्लॅट ताब्यात आहेत त्याच्यावर कर आकारणी करा तुम्ही कर लावा ना.

भगवती शर्मा :-

ऑफ द रेकॉर्ड बोल दिया आपने। आपके पास आपने यह बहुत गलत बोल दिया है की, लोग बोलते टॅक्स आप एक साईट में निविदा कार्यालय है कहते है तो मेरे को बताए अनधिकृत बांधकाम के समोर मॉरस शेठने बोला की अधिकारी जिम्मेदार है आज के ८ साल पहिले महानगरपालिका को सभी को राज्य सरकारने निर्देश दिया था की जो वॉर्ड का अधिकारी है संबंधित पुलिस चौकी के अंदर की अंदर में ड्युटी ऑफिसर है सब जिम्मेदार होंगे। आज तक किसीको जिम्मेदार ठहराया आपने एक व्यक्ती को नही ठहराया। नियम की बात है तो नियम का कही भी अनधिकृत बांधकाम के लिए।

मा. उपायुक्त (मु.) :-

अनधिकृत बांधकाम प्रकरणी आपल्या अनेक अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. निलंबित झालेले आहेत.

भगवती शर्मा :-

नही सहाब इस हाऊस के अंदर में जब इसकी चर्चा हुई थी की अनधिकृत डिमांड के कई ना कई अधिकारी भी जिम्मेदार है नियम है साहब उसके अंदर में राज्य सरकार ने वह निकाला है। नोटिफिकेशन निकाला है। तो जब-जब सदन के अंदर में आवाज उठाई तो अधिकारी साईट में रह गए वो क्या किया की जिन्होंने ओ.सी. ले लिया उन बिल्डरो की उपरो में केस दाखील कर दिया। यह कारवाई की महापौर मॅडम आयुक्त साहब आप ध्यान में रखीए यह १३/०५/२०१५ की मेरे पास प्रोसिडींग है। आयुक्त साहब जो बोला दो लाईन पढके सुनाना चाहता हूँ की, मा. महापौर मॅडम मागच्या सभागृहामध्ये या बद्दल चर्चा झाली होती आणि जो लिगल सेक्शन आहे तो लिगल जो इललिगल आहे तो इललिगल इललिगल बद्दल समजा एखादा माझ्या ह्याच्यामध्ये ६ माळ्याच्या बिल्डींग असेल आणि दान माळे एखाद्या माळ्याच्या अनधिकृत एक्स्ट्रा बांधला आहे तर त्या टाऊन प्लानिंगकडे व्हेरीफिकेशनसाठी या महिन्याच्या सगळ्या फाईल पाठवण्यात आहेत. त्याच्याकडील लिगल, इललिगल ठरवून आल्यानंतर इललिगल शास्ती आणि लिगलची काही आकारणी असेल ती आकारणी रद्द करण्यात येईल अशी माहिती घेवून सांगत आहे. आज एक साल हो गया की यह मुद्दे कई ना कई पेन्डींग रह रहे है। इसीके कारण से टॅक्सके डिमांड और बढते जा रहे है और लोग व्याज के कारण से शास्ती से कारण से पैसा नही भरता है तो कई ना कई यह निर्णय लेके इसपे आज निर्णय लिजीए।

मा. महापौर :-

भगवतीजी बैठीए में आपको बोलती हूँ।

रोहिदास पाटील :-

मा. महापौर मॅडम आयुक्त साहेब आज जो शास्तीचा विषय आहे गेल्या २००८ सालापासून हा विषय सुरू झाला. पहिल्या दिवसापासून ह्या विषयावर उलटसूलट चर्चा होत राहिली तत्कालीन आयुक्तांनी अधिकाऱ्यानी त्याच्यावर नियोजन केल सभागृहातील सदस्यांनी नियोजन केले अनेक आपण ठराव पण केले. आजची वस्तूस्थिती काय आहे. इथे २००८ साली ज्या व्यक्तिने आपल्याकडे विनंती अर्ज केला त्या २००८ च्या त्या विनंती अर्जाचा निपटारा आज झाला नाही त्याला लावलेली शास्ती नियमबाह्य आहे की नियमानुसार आहे याचे पण आपण उत्तर देत नाही. ती व्यक्ति पुन्हा आपल्या कार्यालयात येते चकरा मारते स्वतः येते दुसऱ्याला मध्यस्थी ठेवते नगरसेवकाला सांगते सन्मा. महापौराना पण अनेकांनी विनंती केलेली आहे की ह्याच्यात आम्हाला न्याय द्या आम्ही पैसे भरायला तयार आहोत पैसे न भरल्यामुळे सर आपण कम्प्यूटरला पण प्रोग्राम दिलेला आहे. त्याला कॅल्क्यूलेशन करायला लागत नाही. त्याला लेटमार्क झाल त्याच्यात व्याज लागते, व्याजात व्याज, व्याजात व्याज वर्षानुवर्षे वाढत जाते. आम्ही विचार करतो म्हणून व्याज थांबेल अशी एकही केस नाही आहे की, या केसवर विचार होण बाकी आहे म्हणजे व्याजास की शिक्षेत पात्र नाही असा आपण कोणताही निर्णय घेतलेला नाही आपण तीन, चार ठराव केलेत अशी तीन चार ठराव करा माझ्याकडे एकही नाही पण मला आठवते. नक्की तीनही चारही वेळा आपण जनहितासाठी

जे ठराव केले पण त्याची पुर्तता कोणी करत नाही एज्युकेशन कोणी करत नाही. आयुक्त साहेब आता महापौर सक्षम आहेत तुम्ही सक्षम आहात तुम्हाला अस वाटते की आम्हाला लोकांना अस वाटत की जर आयुक्त साहेब एवढे मोठमोठ्या मिशन लावतात तुम्ही स्वच्छता अभियान चालवल कर वसुलीचे अभियान चालवल माझी सभागृहाला विनंती आहे सभागृहाला वेळ पण आहे. कोणी नाही सांगण्याचे कारणच नाही. की एक अस मिशन चालवा फक्त शास्ती, शास्तीची प्रकरणे निकाली काढण्यासाठी प्रभाग ऑफिसमध्ये मिटींग लावा त्यांना आवश्यक असेल तर संगणक द्याव, त्यांना आवश्यक असेल तर त्यांना क्लार्क द्यावेत त्यांना आवश्यक असेल तर त्यांना अधिकारी द्यावेत अधिकाऱ्यांना आवश्यक असेल तर त्यांना अधिकार द्यावेत पण वेळेत व्हायला पाहिजे. निर्णय होत नाही आहे आणि कोणीही आमच्यातला आश्वासन देतो वह बादमे दो अभी निर्णय हानेवाला है। पण त्याला ८ वर्ष झाली निर्णय होत नाही निर्णय होत नाही तर चुक कोणाची आहे सभागृहाची चुक नाही सभागृहाने तुम्हाला प्रत्येक वेळी हो ला होच म्हणत आलेले आहे. लोकांचा हितासाठी महापालिकेच्या हितासाठी महापालिकेचा आर्थिक फायदा होत असेल तर त्यासाठी सभागृहातला कोणताही सदस्याने कधी विरोध केलेला नाही मग निर्णय का होत नाही. आमची साहेब विनंती आहे आणि ज्या लोकांच्या तक्रारी आल्या आता सभागृहाची आणखी मत घ्यायची फार कारण अस काहीच नाही त्या सगळ्या अधिकाऱ्यांना माहित आहे तक्रारी कोण-कोणत्या आलेले आहेत त्या तक्रारीच्या दृष्टीने तुमचा गोषवारा तयार करा म्हणजे तुमचा पर्याय ज्यांनी टॅक्समध्ये काम केलं त्याला लोकांचे सहमत काय की या-या ठिकाणी नंतर ही लोकांनी अशी तक्रार आहे इथे जर सुट देता येईल, इथे नाही सुट देत आणि नाही देत त्यांचावर ठाम राहिलात आज पर्यंत ह्या सभागृहात कधीही आयुक्तांनी अधिकाऱ्यांनी ठाम भुमिका मांडली नाही की, हे होणारच नाही पण ठिक आहे याच्यावर विचार करूया विचार करु सांगितल्या बरोबर आताच हा विषय तुम्ही ठेवला की, आम्ही विचार करून सांगतो परत आमच्या भावना अशाच होणार की, पुढच्या मिटींगमध्ये याच्यावर निर्णय होणार आहे आणि जे लोकं फेऱ्या मारतात त्यांना अजुन किती दिवस फेऱ्या मारव्या लागणार त्याचं उत्तर काही राहत नाही आपली ह्या सभागृहात नक्की आयुक्त साहेब तुम्ही आश्वासीत कराव निर्णय घ्या शांतपणे आमचा याच्यावर काही प्रेशर नाही. तुम्हाला सांगतो आम्ही आपल्यापासुन हे जे महापालिकेचे कामकाज पाहिले टॅक्सचा तुमच्याकडे ज्या काही तक्रारी आल्या. जशा महापौरांकडे आल्या तशा तुमच्याकडे पण आल्या असतील एक तुमच सांगितलं आहे की, सामान्य माणुस तुम्ही भेटता त्याला तुम्ही उत्तर देतात याच्यावर मार्ग काढूया पण मार्ग निघत नाही साहेब, मार्ग निघत नाही व्याज वाढत जाते तो माणुस येथे टॅक्सी करून येतो, उत्तन वरून येतो, उत्तनचा जो लंगोटीवाला कोळी येतो त्याला पुढच काही समज पण नाही फक्त महापालिका माहिती आहे. आयुक्त माहित आहेत, आयुक्तांना भेटतात परत गेल्यानंतर पुढच्या वर्षी परत नोटीस येते तेव्हा ते धावत सुटतात तो पर्यंत त्यांचा काही प्रश्न नाही साहेब पण ते पाठपुरावा का करत नाही असही नाही पण ते येतात आपल्याकडे उत्तर मिळत नाही ते परत जातात आणि परत गेल्यानंतर परत जेव्हा आपली नोटीस जाते किंवा आपल्याकडे अभियान चालू होते कोणाची जप्ती काढणार हे काढणार तर आपण सहज लोकांना घोषणा करतो घोषणा जी करतो त्याच्यावर आपण टिकुन राहतो की, नाही ते ही निट लोकांचा लक्षात येत नाही तो पर्यंत बातमी येते की, आयुक्तांनी असे निर्देश दिलेले आहेत त्याचा परिणाम काय झाला महापालिकेला काय फायदा झाला लोकांनी काय मान्य केलं लोकांनी कर भरल्याची तक्रार घेतली का, तुमची इच्छा आहे. खाली निर्देश देऊन हे काम करून दयावं पण ते काम पुर्ण होते की नाही आपली पुर्ण टिम आपल्याला पुर्ण साथ देते की नाही साहेब, त्याचे ॲनॅलेसेस होते की नाही होते हा तुमचा विषय आहे पण लोकांच्या समोर असे दिसते की, तो मागेल तसा न्याय मिळत नाही आमची विनंती आहे सभागृहाची विनंती आहे की न्याय मिळेल, घाई घाईत काही निर्णय घेऊ नका याच क्रेडिटच आहे तुम्हाला. क्रेडिट अस आहे की, आपण फक्त १० रुपये आंधळा मागतो एक डोळा तस म्हणाले तर तसच आहे आपल्याला १० रुपये मागतो तर आपल्या ११० रुपये मिळाले आहेत लोकांनी जी वसुली आपल्याला दिली साथ दिली पैसे आपल्याला भरपूर मिळाले आहेत त्याच्यातून योग्य रक्कम तुम्ही खर्च करा साहेब, पण याच्यातून लोकांना ह्या टेंशन मधून बाहेर काढा की, ह्या बिडींगा आपण ह्यावर बांधकाम झाले असेल हे नक्की बाहेर निघेल हे निघणारच नाही निघणार तर नाही निघणार साहेब, नाही निघणार त्याची खात्री पटली तर तो थांबेल कशाला साहेब तो त्याच भरेल मग ते व्याजदर वाढणार नाही साहेब व्याजावर व्याज तुम्ही वाढवता म्हणजे तो भरायला तयार असुन सुध्दा त्याच्याकडून व्याजावर व्याज, व्याजावर व्याज घेऊन ही रक्कम वाढली आहे आणि ज्याच्यामुळे आपलेही अंदाजपत्रक चुकत आहे. आपण सांगतो एवढी वसुली बाकी आहे किंवा असही होत आयुक्त म्हणजे प्रशासन ती वसूली करू शकत नाही अस एक चित्र दिसत आहे. शासनाकडे तस चित्र दिसते. मिरा भाईदर महानगरपालिकेची वसुली कमी २५४ असतांना फक्त ७५ एवढी झाली २५४ असतांना फक्त १२० झाली आपली २५४ एवढी १८० झाली. १८० पैकी १७० तुम्ही साहेब वसुल केले कुठे ही आपल्याला प्राईझ मिळेल महापालिकेला अवॉर्ड मिळेल माझ एवढच म्हणण आहे आपण आज सक्षम आहात महापौर मॅडम पण त्याच्यात उत्साही आहेत. तुम्ही ठरवा साहेब कार्यक्रम करा मिशन २०१६ जे आहे याच्यातला आठवडा ते १५ दिवस हेच काम चालेल अन्य काम थांबल तरी चालेल.

वंदना चक्रे :-

मा. महापौर मॅडम माझा असा प्रश्न आहे की, बिल्डींगच्या संदर्भामध्ये सगळे बोलले पण मागच्या वेळेस आयुक्त महोदय आपण नवीन आहात आपल्याला हा विषय आपणासमोर आलेला नाही आहे मिरा

भाईदर झोपडपट्टी आहे चाळी आहे. चाळीचा टॅक्स आपण वसुली करून घेतला का हा माझा प्रश्न आहे त्याच्या मागे प्रश्न असा आहे की ही झोपडी माझी वंदना चक्रेची आहे ही डिमेलो साहेबांनी घेतली डिमेला साहेबांची भगवती शर्मानी घेतली भगवती साहेबांची एल.जी. साहेबांनी घेतली आणि एवढ्या लोकांनी टॅक्स भरला नाही. फक्त एल.जी. साहेबांनी आताच भरला हे तीन माणस व चार माणस मधले आयुक्त साहेब चार माणसांनी टॅक्स भरला नाही आणि एकच भरतो. हे तीन जणांनी टॅक्स कसे वसुल करुन घेतात हे मागे सुध्दा मी सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित केला होता. ह्या मॅडमला मी वारंवार पत्रव्यवहार केला मॅडमला जाऊन विचारणा केली की मिरा भाईंदर शहरामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात चाळी आणि झोपडपट्ट्या आहेत. त्याचा टॅक्स कधी वसुल करुन घेणार आहात? घेणार आहात की नाही? कधी घेणार का आहेत की नाही हा प्रश्न मी दहा वेळा विचारला. सभागृहाला विचारला पत्रव्यवहार करुन विचारला त्यांच्या केबीनमध्ये जाऊन विचारला. त्याच्यावर तुम्ही काय करणार आहात बिल्डींगचे तुम्ही टॅक्स वसुल करायच, व्याजाच कस करणार आहात ज्यावेळीस मी माझी जमीन यांना विकली मी नाही भरला टॅक्स, आयुक्त महोदय तुम्हाला याच्याबद्दल माहिती द्यावी.

मा. महापौर :-

झोपडीची टॅक्सची माहिती पाहिजे ना मग बसा.

प्रभात पाटील :-

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलते पहिल्यांदा तर मी आपल आणि आयुक्त साहेबांचे येथे अभिनंदन करु इच्छिते की, त्या नोटा बंदीच्या फतव्यानंतर महापौरांनी आपल्या सहकार्याने मा. आयुक्तांनी ह्या शहरामध्ये विक्रमी वसुली केलेली आहे आणि इतकी वसुली झालेली आहे की, मला वाटत राज्यामध्ये आपला नंबर लागतो त्याच्यावर तुमच अभिनंदन आणि मॅडमला तर मी असे म्हणेन की आता वर्षभर काही काम शिल्लक राहिलेले देशमुख व देशपांडे मॅडमला तर तुमच अभिनंदन मला एक प्रश्न असा विचारायचा आहे की, मॅडमला ती केस माहित आहे. मॅडमकडे ते लोक गेले होते, आपल्याकडे पण आलेले होते. हा विषय निघाला म्हणून मी सांगते की, लोक आपल्याकडे कर भरणा करायला तयार आहेत आणि शास्ती विषय इतका गहन आहे मॅडम आपल्याला माहित आहे की, त्या बिल्डरने ती बिल्डींग स्ट्रक्चर करताना काय प्लींथ त्याची तयार झाल्याबरोबर त्यांनी टॅक्स लावून घेतला मॅडम बरोबर आहे. बिल्डींग तयार नव्हती टॅक्स लावला लोकांनी राहायला आल्यानंतर २-२ वर्ष टॅक्स पण भरला त्याच्यानंतर त्याने अनधिकृत बांधकाम केल मॅडम बरोबर आहे आणि त्याच्यानंतर आपण लोकांनी त्याला शास्ती लावली. आता लोकांनी लिगल टॅक्ससाठी दोन वर्ष भरला आहे आणि नंतर आपण शास्ती लावली अशी पण प्रकरणे आहेत. शास्ती काय आहे हे काय अधिकाऱ्यांना कळलेले आहे की नाही हे मला समजत नाही आणि आम्ही अनभिज्ञ आहोत ह्या प्रकरणामध्ये की शास्ती कोणाला लागते आणि कशी लागते. दुसरी गोष्ट टॅक्स लावला गेला त्याच्यात अजुन एक प्रकरण आहे. लोकांना आपल्याकडे आपण म्हणतो इतकी थकबाकी आहे लोक आपल्याकडे अप्रोच होत असतात पण आपण २-२, ३-३ वर्षांचे आहेत त्यांना टॅक्स लावत नाही म्हणून लोक आमच्या सर्व नगरसेवकांकडे येतात तेव्हा कळत. टॅक्स त्यांना का लागत नाही? बिल्डरने ओपन लॅन्ड टॅक्स भरला नाही आता मला सांगा की, लोक येऊन राहिले, ॲप्लीकेशन केले तीन वर्ष झाली. तुमच्याकडे ते प्रकरण आले त्याच्यामुळे तुम्ही त्यांच्यावर ३ वर्षांनी जर टॅक्स लावणार किंवा ४ वर्षांनी लावणार की ५ वर्षांनी लावणार तुम्ही ॲप्लीकेशन आलेल्या दिवसापासून लावणार बरोबर आहे. ॲप्लीकेशन तुमच्याकडे २०१४ ला आलेले आहे. तुम्ही तो टॅक्स लावणार २०१४ पासुन. आता का लावला नाही कारण त्याने ओपन लॅन्ड टॅक्स भरला नाही मग हा दोष तिथे राहणाऱ्या व्यक्तीचा आहे का? तिथे घर घेणाऱ्या लोकांचा दोष आहे का? आणि तुम्ही त्याच्यावर व्याजाची पण आकारणी करणार त्याला शास्ती पण लावणार. पण ही गोष्ट तुम्ही का करत नाही की त्या बिल्डरकडून ओपन लॅन्ड टॅक्स गोळा करण्याची त्या लोकांना का हा भुर्दंड आहे? साहेब शास्तीमध्ये खुप प्रकरण आहेत तुम्ही त्यांना शास्ती लावता व्याज लावता. परंतु एक शुल्लक माणसांची डेव्हलपर्सची चुक असते हा नाहक भुर्दंड ग्राहक भोगत असतो आणि म्हणून शास्ती काय शास्तीचे नियम काय, नियमावली काय, त्याची शिक्षा कोणाला हे सर्व तुम्ही निट स्टडी करा. कर निर्धारक आहेत, संकलक आहेत, जुने अधिकारी आहेत. त्यांचे सगळ्यांचे ओपिनियन घ्या आणि मगच तुम्ही शास्तीचा विषय आणा.

तारा घरत :-

काही वास्तुमध्ये अनलिगल म्हणून तुम्ही नगरपालिकेने जाहिर केले आहे तर त्यांना तुम्ही शास्ती लावली आहे का? शास्ती लावून दिले आहे का?

मा. महापौर :-

शास्तीचा विषय मला वाटत की एक मोहिम आपण शास्ती विषयक घेऊ आणि एक महिना फक्त शास्तीवर काम करु टॅक्स डिपार्टमेंटला मी अशी सुचना करणार आहे. म्हणून दुसरा काही विषय असेल तर सांगा. शास्तीचा विषय आपण नक्की आपण एक-एक प्रकरण घेऊ.

जुबेर इनामदार :-

प्रथमतः तुमचे अभिनंदन. एक चांगला विषय त्याचबरोबर प्रशासनाचा की त्यांनी त्यांचा गोषवारा दिला आणि पॉझिटिव्ह गोषवारा आहे की शास्ती त्यांनी १० टक्के प्रमाणे आणलेला विषय की १० टक्के आपण त्याच्यामध्ये व्याज कमी करु. आजपर्यंत आपले ह्या मालमत्ता करासंदर्भात अर्थसंकल्पामध्ये नेहमी

चर्चा होऊन राहिली. आपली डिमांड खरतर कधीच निश्चित झाला नाही. ओपन लॅन्ड टॅक्सचा असो किंवा मालमत्ता कराचा असो घरपट्टीचा साहेब कधीच आपण त्या एक अंकुश त्याच्यावर लावू शकलो नाही की आम्हाला इतकीच वसूली करायची आहे. कारण त्याच्यावरती मेहनत कोणी घेतली नाही साहेब. त्याचबरोबर तुम्ही लागून एक विषय दिलेला आहे की कमर्शिअलाईज करायचे म्हणजे त्यांनी वाणिज्य वापर केलेला काय सुरुवात केलेली त्यावर आपल्याला कर आकारणी करायची म्हणजे असा हा जो प्रकार आहे तो कुठेतरी थांबला पाहिजे आज विषय सुरु झाला म्हणून चर्चेला आणला आहे. दुसर साहेब मालमत्ता कर भरल्यानंतर सुध्दा ते खतवले जात नाही. खतवले जात नाही म्हणून परत दुसऱ्या वर्षामध्ये म्हणजे पुढच्या चालु वर्षाच्या खतवले गेले नाही म्हणून पुढच्या वर्षामध्ये परत त्याच मालमत्ता करामध्ये त्यांच्या त्या रक्कमेचा उल्लेख केला जातो बाबा तुमची थकबाकी इतकी राहीली त्याच्यामुळे होणारा गोंधळ महापौर मॅडम एक वस्तुस्थिती आहे. त्यामध्ये होणारा गोंधळ महापौर मॅडम एक वस्तुस्थिती आहे. त्यामध्ये होणारा गोंधळ आणि त्याच्यामुळे आपला अर्थसंकल्पावरचा अंदाज चुकून जातो कारण होत अस की आपले खतवले जात नाही. बरेच अशी प्रकरणे राहतात की, शिल्लक राहतात. पुढच्यावर्षी आपल्याकडे ती डिमांड तशीच पेंडींग राहते. त्याच्यावरती सुध्दा सर काम करणे गरजेचे आहे. प्रशासनाला दुसरा एक प्रश्न आहे माझा की, शास्ती हा जो प्रकार आहे तो राज्यशासनाने आपल्याला त्याच धोरण निश्चित करुन दिलेले आहे की जोपर्यंत तुमच्याकडे भोगवटा दाखला उपलब्ध होत नाही तोपर्यंत तुमची शास्ती काही काढता येत नाही ह्या विषयावर ह्या सभागृहामध्ये बरीच वेळ चर्चा झाली आणि सन्मा. सदस्य नरेंद्र मेहताजी आता आमदार आहेत त्यांनी सुध्दा इथे भाषण केले होते ही शास्ती मी काढणार हटवून दाखविणार. शासनाकडून ही शास्तीचा विषय आम्ही कमी करणार किंवा काढून दाखविणार मी त्यांना परत तो विषय आठवण करुन देतो की, तुम्ही सभागृहामध्ये शब्द दिलेला आहे. त्याचे पालन करायचा प्रयत्न करा. तिथे गेलात तर तिथे काही तरी काम होईल साहेब. जात जा तिथे म्हणजे तुमचा हा जो प्रकार आहे तिथे तुम्ही आणु शकाल आणि ह्या शहरामधला हा जो भुर्दंड लोकांना भोगावा लागत आहे तो कुठेतरी कमी होईल त्याचबरोबर साहेब कारण किती आम्ही इथे प्रयत्न केला तुम्ही आम्हाला किती शब्द दिले किती काही चर्चा झाल तरी शासनाच्या निर्णयाच्या विरोधात कारण आलेल्या नोटिफिकेशन तुम्ही त्याला बदलु शकणार नाही. दुसर साहेब तुम्ही दिलेल्या गोषवाऱ्यामध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ करधार नियम कलम ५१ नुसार मा. आयुक्त सो. आपल्या स्वच्छतेनुसार नियम ४१ खाली शास्ती म्हणजे पॅनल्टीनंतर तुम्ही आता गोषवाऱ्यामध्ये देता की, व्याज कमी करा मग हा स्पष्ट करा. शास्ती करणार कमी की व्याज कमी करणार. साहेब दुसर याच्याआधी आम्ही ठराव केलेला होता. ०२/०३/२०१५ ला आणि तो सर्वानुमते सुचक होत्या श्रीम. प्रतिभा तांगडे आणि अनुमोदन मी स्वतः जुबेर इनामदार. याच्यामध्ये मी स्पष्ट उल्लेख केला होता शास्तीवरची ही शास्ती वरचा व्याज कमीत कमी त्या लोकांना तुम्ही एकतर शास्ती लावलेली आहे. त्यांची चुक नसताना खरतर याची चुक कोणाची विकासकर्ते ज्यांनी विकास करुन गेले साहेब परिस्थिती अशी तुम्ही ओ.सी. दिल्यानंतर त्याच्यावरती बांधकाम होते त्या इमारतीला, मालमत्तेला सर्वसाधारण कर लागलेला नाही शास्ती शिवाय.

मा. महापौर :-

यह पॉईंट हो चूके है अगर आपको इसके अलावा का कुछ पॉईंट कहना है तो प्लिज कहिए। जो पॉईंट हो चुके है उनको रिपीट ना किजीए। कुछ नया मुद्दा रखीए।

जुबेर इनामदार :-

मॅडम याच्यामध्ये तोच मुद्दा आहे. याच्याआधी आम्ही यांचा ठराव केला होता.

मॉरस रॉड्रीक्स :-

महापौर मॅडम आपल्याला शास्ती लावायला आपण वडके मॅडमला बोलावून विचारा की लिगली लावू शकतो की नाही हा लिगली लावू शकतच नाही.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम विषय असा आहे की, आज हा विषय सभागृहामध्ये आला आहे. चर्चेला आला अंमलबजावणी झाली पाहिजे. उद्या प्रशासनाने याची अंमलबजावणी नाही केली आता शास्ती वरचा विषय आम्ही इथे महासभेमध्ये त्यांना खरतर याची गरज नव्हती. आयुक्तांकडे स्वतःचे अधिकारात सुध्दा करता आल असतं धोरणात्मक निर्णय होणे म्हणजे सभागृहासमोर ठेवलेला म्हणून तो चर्चा होणे गरजेचे आहे. कारण प्रशासनाच्या मनामध्ये काय आहे आणि लोक प्रतिनिधी त्यांची मागणी काय याच्यामध्ये अंतर असते. कधी कधी माझा इतिहास असा आहे की शास्तीवर कमीत कमी जो व्याज आहे तो ही त्याच्यातून गहाळ केला पाहिजे. बरेच त्याच्यातले विषय आपल्याकडे प्रलंबित आहेत. त्याच्यावर सुध्दा काम प्रशासनाने केले पाहिजे. त्यांची जबाबदारी आहे. त्यांनी ते पार पाडायला पाहिजे. महापौर मॅडम, आपल्याकडे जे देयके आहेत बील टॅक्सचे, कराचे बील ते आपल्याकडे चार चार महिने उलटून गेल्यानंतर सुध्दा येत नाही ऑगस्टच्या अखेरपर्यंत...................

मा. महापौर :-

जुबेरजी मुझे लगता है की, यह सब पॉईंट हो गए है अगर आपके पास कोई नया मुद्दा है तो बोलीए नही तो उनको बोलने दिजीए। प्लिज इस विषय को खत्म किजीए। सभी यही बात बोल रहे है मैं जानती हूँ की शास्ती का विषय है और मैं आयुक्त को बोल रही हूँ की अभी का हमारा एक महिना सिर्फ और सिर्फ

शास्ती के जो जो प्रकरण है उसको क्लिअर करने में लगना चाहिए। जिसको लगनी चाहिए उसेही लगनी चाहिए जिसे नही लगनी चाहिए। उस पर से शास्ती निकालनी चाहिए।

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम हा दिशाभुल करणारा विषय होऊन जाईल. प्रशासन शास्ती हटवू शकते का?

मा. महापौर :-

जुबेरजी आप प्लिज बैठ जाइए।

सुहास रकवी :-

महापौरांच्या परवानगीने बोलतो आमच्या वॉर्डमध्ये मॅडम, २००७ साली एका महागणपती टॉवरला कर आकारणी केली होती. आपल्याकडे शासनाचा जी.आर २६४ नुसार शास्ती कोणाला लावावी कर आकारणी कुणावर करत असताना शास्ती कोणाला लावावी असा जी.आर. आला. परंतु त्यानंतर आम्हाला ज्या बिल्डींगला लावलेली कर आकारणी रद्द करुन शास्ती सहित पूर्ण बिल्डींगला त्या टॉवरला त्यानंतर पत्र दिल गेल की सदरचे जे अनधिकृत असतील त्यांना तुम्ही शास्ती लावा. बाकीचे जे रेग्युलर आहेत ज्यांनी प्लान पास करुन प्लॅन बघून घेतलेला आहे तर त्यांना तुम्ही शास्ती लावू नका मॅडम १० वेळा झालं.

मा. महापौर :-

रकवी जी आपको बार बार बोल रही हूँ की, शास्ती के सभी प्रकरण हम एक एक करके लेंगे और उसको क्लिअर करेंगे मैंने आयुक्त को अभी अभी कहाँ है की हम एक महिने के अंदर शास्ती के प्रकरण केस टू केस लेके उसको सॉल्व्ह करेंगे...................

सुहास रकवी :-

मॅडम नळ तोडायला धमकी द्यायला तिकडे तुमची माणस गेली नाही पाहिजे. आमच्या इकडचे लोक कर भरायला तयार असतात. मॅडम तुम्ही तो विषय लक्षात घ्या.

मा. महापौर :-

रकवीजी प्लीज बैठ जाइए आपको विनंती करता हूँ की, शास्ती के बारे में मैंने रुलींग दे दिया है की एक महिने के अंदर केस टू केस सभी शास्ती के प्रकरण सॉल्व्ह किए जाऐंगे आप प्लीज बैठ जाइए।

सुहास रकवी :-

चांगली गोष्ट आहे परंतु तिथपर्यंत कोणताही अधिकारी तिकडे धमकाविण्यासाठी गेली नाही पाहिजे मॅडम ही तुम्हाला विनंती आहे.

लियाकत शेख :-

मॅडम केस टू केस सर्व प्रकरण तुम्ही करणार आहेत. वेरी गुड परंतु माझ्या प्रश्नाच उत्तर मिळालेले नाही. जो शास्तीच प्रकरण चालु आहे मुळात जो प्रश्न आहे अधिकृत अनधिकृत.............

मा. महापौर :-

म्हसाळ साहेब त्यांना जबाब द्या २५० ची नोटिस दिली नाही तर तुम्ही शास्ती लावू शकता का?

मा. उपायुक्त (मु.) :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, सभागृहात जो प्रश्न उपस्थित झालेला आहे की, २६० ची नोटिस दिली नसेल तर ती आपल्याला करता कर आकारणी शास्तीची करता येते की नाही. आपण जेव्हा कर आकारणी करत असतो त्यावेळी स्थापन प्राथमिक एक ह्याप्रमाणे तुम्हाला कर आकारणी केलेली आहे याच्या विरोधात तुमच काही म्हणणे असेल तर २१ दिवसात द्यावे. अशा स्वरुपाच केलेल असत त्यावेळेस कोणी त्याच्यामध्ये ऑब्जेक्शन घेत नाही ती नंतर आपण ती आकारणी कायम करतो.

मा. महापौर :-

म्हसाळ साहेब ऑब्जेक्शन जरी नाही घेतल तरी तुम्ही नोटिस दिल्याशिवाय शास्ती लावू शकतात का फक्त तेवढ उत्तर द्या.

मा. उपायुक्त (मु.) :-

मॅडम परवानगीचे पेपर आले असतील तर निश्चितपणे कर आकारणीची त्याच्यावर वेळेवर विचार प्रशासनाने त्यावेळेस केला असता. ही काही आताची प्रकरण नाहीत ही जुनी २००९ पासुन चालत आलेली प्रकरणे आहेत.

सुहास रकवी :-

साहेब याला शास्ती नाही लागली त्याला नंतर तुम्ही अचानक कर आकारणी करतात कर आकारणीला २६७ ची नोटिस देता ज्याला शास्ती लागलीच नाही. त्याला नंतर देऊन तुम्ही अचानक शास्ती लावतात म्हणजे तुमचे जे दुतात्मीक धोरण आहे ना पहिला तुम्ही ते सुधारा. त्यामध्ये तुम्ही एक निश्चित करा २६७ नुसार दिल्यानंतर शास्ती लावता येईल की नाही अशी प्रकरणे किती प्रलंबित आहेत साहेब. आम्ही तुम्हाला वारंवार लेटर देतो देशपांडे मॅडमना भेटतो.

मा. महापौर :-

रकवीजी आपसे विनंती करती हूँ आप बैठ जाईए।

नरेंद्र मेहता :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने, सर्वप्रथम मा. आयुक्त साहेब आणि प्रशासनाचे मनपूर्वक अभिनंदन करतो की रात्री १२-१२, १-१ वाजेपर्यंत जागुन ऐतिहासिक रक्कम टॅक्सची असु द्या पाणीची असु

द्या, ओपन लॅन्ड टॅक्सची असु द्या, डेव्लपमेंट चार्जेस असु द्या, ऐतिहासिक रक्कम आपण वसुल केली त्याबद्दल प्रशासनाचे आम्ही मनपूर्वक अभिनंदन करतो. रात्री बेरात्री जागत आणि एक दिवस नाही तर गेल्या १५ दिवसांपासून एवढी मोठी योजना हाती घेतली आणि सर्वांनी चांगली रक्कम जमा केली त्याबद्दल मनापासून त्यांचे अभिनंदन करतो. आता जुबेर इनामदारजीनी त्यांची व्यथा व्यक्त केली की एवढ्या वर्षापासून शास्ती खर म्हणजे ही त्यांची व्यथा आजची नाही गेल्या १० वर्षे त्यांची व्यथा ही समजू शकतो आणि विशेषतः तरी मला हे बोट करुन सांगितल माझ्याकडे विशेष बोट करुन सांगितल मेहता साहेब हे तुम्ही करुन दाखविणार त्यांना हे ही माहित आहे की ह्या शहरामध्ये हे कोणी करु शकतो तर आम्हीच करु शकतो म्हणून त्याला हे ही खात्री आहे त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करतो. आयुक्त साहेब आजचा विषय जो आहे ते गेल्या अनेक वर्षापासुन काही ना काही कारणामुळे दंड, व्याज हा कॅरी फॉवर्ड होत आलेला आहे. त्यामध्ये काही प्रशासनाच्या चुका असतील काही नागरीकांच्या चुका असतील काही वेगवेगळ्या सर्वामयन्सेस प्रमाणे झालेले प्रश्न असतील अशा प्रकारची एक मोठ्या प्रकारची थकबाकी ही झालेली आहे आणि जसे आता सांगितले की नक्की आपली मुळ मागणी काय आहे आणि एक मोठा बॅकलॉग दिसला आणि आपण ज्यावेळी सरकारकडे कुठली योजना येऊन जातो ऑडीट पॉईट प्रश्न उपस्थित होतो आणि सर्वात मोठी तुमची एवढी थकबाकी आहे दिसते अस की २५० कोटी बाकी आहे ८० वसुल केले म्हणजे तुम्ही ३० टक्के वसुली केली नाही अस कुठेना कुठे दिसून येते. आणि अनेक प्रश्नाला आपल्याला मग सामोरे जावे लागते आणि त्याचे उत्तर आपल्याकडे नसते. कारण त्यांना आपण अस सांगु शकत नाही हे येणार नाही हे बॅकडेटच सांगु शकत नाही ती रक्कम कुठेतरी फुगलेली दिसते आणि कुठेतरी त्याला न्याय द्यावा लागेल आणि बॅकडेट म्हणून कुठेतरी संपवावा लागेल ह्यासाठी हा विषय आणलेला आहे. त्याबद्दल मनापासून अभिनंदन करतो. आयुक्त साहेब आपण कर आकारणी करतो त्यावेळी जो सांगितल शास्ती असेल मी आपल्या मताशी सहमत आहे मी मॅडम त्या शास्ती इललिगल इमारत याच्यावर जात नाही. २६० ची नोटिस आणि टॅक्स प्रकरण हे दोन्ही वेगळी प्रक्रिया आहे. २६० एखादा अनधिकृत बांधकामवर कारवाई करण्यासाठी २६० ची नोटिस दिल्यावर आयुक्तांना ते एखादा अनधिकृत आदेशच द्यावा लागेल की ती बिल्डींग डिमॉलीश करा त्याला मग तुम्ही सांगु शकत नाही की २६० तुझी अनधिकृत टॅक्स लावतो अस होऊ शकत नाही त्याच्यावर तो निर्देश द्यावा लागेल की ही बिल्डींग डिमॉलिश करा आणि अनधिकृतला आम्ही काही सभागृहात कोणी पाठीशी घालत नाही पण दॅट इज अ टोटली डिफरन्ट प्रोसेस ऑफ द इललिगल कन्स्ट्रक्शन संदर्भातल आहे. टॅक्सचा आणि ह्या प्रणालीच काही संबंध नाही. एखादी इमारत त्यामध्ये पार्टली असेल जे काही असेल आपण इमारत सांगतो आणि इमारत ती इललिगल की लिगल त्यामध्ये वाढीव मस स्टिल झाला किंवा वरच झाल खालच झाल तर ती इमारतच येते. त्याला वेगळ तुम्हाला करता येणार नाही ती इमारत वैध धरली जाईल. एखाद्या व्यक्तीने ओ.सी घेतली किंवा त्याला कर आकारणी झाली आणि त्यानंतर कोणी अनधिकृत बांधल तर तेवढ्याच पुरता तो लागला पाहिजे. तुम्हाला पूर्ण बिल्डींगला त्याच्यामध्ये आणता येणार नाही. एखादी कर आकारणी तुम्ही केली २ वर्षापूर्वी आणि आज आम्ही काही वेगळ बांधल तर जेवढ बांधल आहे. त्याच्यावरती तुमच शास्तीवर लावायला पाहिजे. आता जे सांगितलं गेल की, अनेकदा आम्ही सांगितल सर ही भुमिका मांडली आयुक्त साहेब, शास्ती अनधिकृत बांधकामावर शास्ती लादावी. एखादा ओ.सी. नाही घेतली म्हणून ती बिल्डींग अनधिकृत ठरत नाही. ओ.सी. नाही घेतली तर वेगळी आपल्याकडे साहेब दंडासकट ती रक्कम वसुल करतो. त्यासाठी आपण मागच्या वेळी जी त्याची पण योजना आणली होती की त्यांचा दंड माफ करा आणि हॉरीजनल पैसे घ्या. अनेक लोकांना आपण ओ.सी. दिलेली आहे. ओ.सी. इज द टोटली डिफरन्ट मॅटर मग त्याच आणि ह्या कर आकारणी ह्या लिगल आणि इललिगलचा काही संबंध येत नाही. ओ.सी. नाही तर बिल्डींग इललिगल ठरत नाही आणि आहे ते इलिगल डिफरन्ट थिंग कर आकारणी करताना आता कुठेतरी आपल्याला सर्टिफाईड करून आम्हाला एक निर्णय घेतला की ज्या आर्किटेक्टनी नी तो प्लान पास केला किंवा दुसरा सक्षम जो आर्किटेक्ट त्याने ते सर्टिफाईड कराव आपला टाऊन प्लॅनिग सर्टिफाईड कराव ही बिल्डींग ॲज पर प्लांन बांधलेली आहे म्हणून याला शास्ती लागता कामा नये कारण शब्द अन अधिकृत बांधकाम आहे नियमाप्रमाणे बिल्डींग असतील काहीचे यू एल सी चे प्रॉब्लेम असतात काहीचे वेगळे प्रॉब्लेम असतात काहीचे दुसरे प्रॉब्लेम असतात, मग त्याला आपण बिल्डींगला अनधिकृत ठरवू शकत नाही. आजही आम्ही तो ठरावामध्ये मांडल पहिलाही आम्ही ठरावामध्ये मांडलेले आहे कि, ज्या अशा बिल्डिंग असतील त्याला लिगल असेल तर त्याला विदाऊट शास्तीची कर आकारणी झालीच पाहिजे साहेब, तर आज आमच्या ठरावाच्या माध्यमातून सगळेच प्रश्न ह्या महापालिकेचे ह्या लोकप्रतिनिधीचे ह्या जनतेचे सुटणार आहेत.

नरेंद्र मेहता :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कराधान नियम ४१ नुसार, पहिल्या सहामाही मालमत्ता कराची रक्कम बिल दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत व दुस-या सहामाहिची मालमत्ता कराची रक्कम ३१ डिसेंबर पूर्वी भरावयाची आहे आणि जर अशी मालमत्ता कराची रक्कम त्या दिनांकापर्यंत असा कर भरावयाचा होता. त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा भागासाठी दरमहा २% इतकी रक्कम व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) म्हणुन भरण्यास मिळकतधारक जबाबदार असेल अशी तरतूद करण्यात आली आहे. यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील जे मिळकतधारक उपरोक्त नमूद केलेल्या विहित मुदतीत मालमत्ता कर महानगरपालिकेकडे जमा

करीत नाहीत, अशा मिळकतधारकांकडुन दरमहा २% इतकी रक्कम व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) आकारण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाची संगणकीय आज्ञावलीतील मागणीनुसार मालमत्ता करापोटी रू. २६५.५६/- कोटी मागणी दिसून येत आहे व सदर मागणीत रु.१४५.६३/- कोटी थकबाकी व रु. ६१.२९/- कोटी एवढे व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) दिसून येत आहे. परंतू सदर मागणीत दुबार मागणी, प्रस्तावित निर्लेखित प्रकरणे यामुळे अवास्तव वाढ दिसून येत आहे.

सद्यस्थितीत विहीत मुदतीत मालमत्ता कराची रक्कम न भरणा-या मिळकत धारकास थकीत रकमेवर तरतूदीनुसार दरमहा २% प्रमाणे व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) आकारण्यात येत आहे. काही मिळकतीचा वर्षानुवर्षे मालमत्ता कर भरला जात नसल्याने, त्यावरील व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) वाढत आहे. यामुळे थकबाकी व व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) यानुसार होणारी वसुलीची टक्केवारी कमी प्रमाणात दिसून येत आहे. त्याचप्रमाणे मालमत्ता कराच्या थकबाकीवरील व्याजामध्ये सुट दिल्यास, मालमत्ता कराची थकीत रक्कम व चालू मागणी भरण्याबाबत मिळकतधारकांचा/ नागरीकांचा कल आहे व प्रत्यक्ष वसुली दरम्यान मिळकतधारकांकडून अशा प्रकारे सुट मिळणेबाबत विचारणा होत आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम प्रकरण ८ (कराधान नियम) कलम ५१ मध्ये या अधिनियमानुसार आकारण्यात आलेले व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) किंवा वसुलीचा खर्च पूर्णतः किंवा अंशतः माफ़ करण्याची तरतूद आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती पाहता अनेक वर्षापासून थकीत असलेली मालमत्ता कराची रक्कम वसुल होण्याच्या प्रयत्न करण्याच्या दृष्टीकोनातून मालमत्ता करावरील व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) माफ़ करण्याबाबत खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

- जे मिळकतधारक माहे १२ डिसेंबर २०१६ ते १४ जानेवारी २०१७ पर्यंत देय होणारा थकीत मालमत्ता कर व चालू आर्थिक वर्षाच्या मागणीसह रक्कम भरतील अशा मिळकतधारकांना त्यांच्या मिळकतीच्या मालमत्ता कराच्या देयकात दिसून येणारे व्याजाच्या रक्कमेवर (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) ७५% माफी देण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच जे मिळकत धारक दि. १५ जानेवारी २०१७ मध्ये मालमत्ता कर भरण्यास येतील अशा मालमत्ता धारकांना दि. १५ जानेवारी २०१७ ते दि. ३१ जानेवारी २०१७ पर्यंत त्यांच्या मिळकतींच्या मालमत्ता कराच्या देयकांत दिसून येणाऱ्या व्याजाच्या रक्कमेत ५०% सुट देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

व्याज माफी बाबत मा. आयुक्त यांनी सोशल मिडीयाच्या माध्यमातून शहरामध्ये प्रसिद्धीचे फलक लावण्यात यावेत व वृत्तपत्रामध्ये या अभय योजनेची प्रसिद्धी ३१ जानेवारी २०१७ पर्यंत चालू ठेवावी. मोठ्या थकबाकी धारकांना लेखी पत्राने कळविण्यात यावे एखाद्या मालमत्ता धारकांने देयकामध्ये सुधारणा करण्याची मागणी अभय योजनेच्या काळात केली ही सुधारणा अभय योजनेच्या काळात झाली नाही तर अशा मिळकतधारकांस त्यांच्या अर्जाची तारीख गृहित धरुन देयकामध्ये दुरुस्ती झाल्या नंतर अभययोजनेचा लाभ घ्यावा.

या कामी मा. आयुक्त यांनी वेगळी यंत्रणा उभी करावी व कर्मचारी वर्ग कमी असल्यास मानधनावर कर्मचारी वर्ग घेण्यसही मंजूरी देण्यात येत आहे. कर विभागाने अभय योजनेचे प्रलंबित अर्ज २६ फेबृवारी २०१७ पर्यंत निकाली काढून अर्जाचा निर्णय २८ फेब्रुवारी २०१७ पर्यंत घ्यावा.

उपरोक्तप्रमाणे जे मिळकरधारक व्याजाची रक्कम दि. ३१ जानेवारी २०१७ पर्यंत मालमत्ता कराचा भरणा करणार नाहीत अशा मिळकतधारकांच्या सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या मालमत्ता कराच्या बिलामध्ये अशी व्याज (मालमत्ता कराच्या थकबाकीसह) थकबाकी म्हणून दर्शविण्यात येईल. सदरची थकबाकी वसुल करणेकरीता अधिनियमातील तरतूदीनुसार कडक कारवाई अंतर्गत प्रत्यक्ष वॉरंट बजावून मिळकत जप्त करण्यात येईल आणि जाहीर लिलावाद्वारे मिळकतीची विक्री करण्यात यावी.

उपरोक्तप्रमाणे मालमत्ता कर देयकातील व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) माफीस मा. महासभा मंजूरी देत आहे.

ज्या इमारती मंजुर नकाशा प्रमाणे बांधण्यात आलेल्या असतील अशा इमारतींचे वास्तुविशारद (Architect) दाखला प्राप्त झाला असेल अशा मालमत्तांवर आकारण्यात आलेली शास्ती, व्याज, दंड माफ करण्यात यावा.

कर आकारणी झाल्या नंतर किंवा भोगवटा दाखला झाल्या नंतर अनधिकृत बांधकाम झाले असल्यास तेवढ्याच अनधिकृत / वाढीव बांधकाम क्षेत्रावर शास्ती कराची आकारणी करण्यात यावी. यासही महासभा मंजूरी देत आहे.

त्याचप्रमाणे मोकळ्या जागेवरील व्याज उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे माफी देण्यास महासभा मंजुरी देत आहे.

अश्विन कासोदरीया :-

माझे अनुमोदन आहे.

नरेंद्र मेहता :-

आम्ही जो ठराव केला आहे त्याची थोडी माहिती देऊ इच्छितो मा. आयुक्त महोदय आम्ही हा जो ठराव केलेला आहे ठराव आपल्याला मिळणार आहे. ज्या नागरिकांच गेल्या अनेक वर्षापासून पैसे बाकी असतील त्यांना आपण १२ डिसेंबर ते १५ जानेवारी मध्ये त्यांनी पुर्ण ह्या चालू वर्षासकट एक रकमी पैसे भरले तर त्याला ते ७५ टक्के व्याज आणि दंडात माफी देण्यात यावी जो व्यक्ती १४ जानेवारी ते ३१ जानेवारी पर्यत भरेल त्याला ५० टक्के म्हणजे सर्वानी असे होता कामा नये की मी शेवटी भरेल त्यांनी पहिल भरल तर त्याला ७५ टक्के नंतर भरल तर ५० टक्के ज्या व्यक्तिचे एखादा त्यांच्या बिलामध्ये चुक आहे दुरूस्ती होत नाही आपल्याकडे त्यानी विनंती केली आणि काही कारणाने त्याचा तुम्ही कर आकारणी केली नाही किंवा भरून घेतली नाही तर त्याला जे दिलेला अर्ज आहे त्या तारखेच ग्राह्य धरून त्याला ती सवलत दिली जाईल म्हणजे एखादा मी सांगतो माझ सगळ व्यवस्थित आहे बिल आल ९० हजारच आपण सुधारणा करून देत नाही तर त्या व्यक्तिने तुमच्याकडे एकदा लेखी निवेदन दिल रिसीव्ह झाल तर ते तुम्ही त्यांच भरण्याची मानसिकता अस गृहीत धरून त्याचप्रमाणे कारवाई व्हावी तुम्ही त्याच निकाली काढल नाही तीन महिना तर त्यामध्ये तो व्यक्ति दोषी राहणार नाही. अशा प्रकारच आम्ही तो निर्णय दिलेला आहे आणि ह्याचा आपण जाहिरातीचा पेपरचा न्युज, पेपरच्या माध्यमातुन सोशल मिडीयाच्या माध्यमातुन वेगवेगळ्या सोर्सने आपण याची पुर्ण जाहिरात करावी ज्या व्यक्तिची मोठी रक्कम बाकी आहे त्यांना आपण लेखी सुध्दा कळवावे आपण ते पैसे भरा आणि ह्या ३१ जानेवारीपर्यत जो नाही भरणार त्याच्यावर आपल्याकडून परत ज्याचीं बाकी आहे ते दंडासकट, व्याजासकट जशी बिल होती तशीच ती पुढे चालू राहतील आणि ३१ मार्चमध्ये मा. आयुक्त त्यामध्ये ते एखादा कायद्यामध्ये बसणारी असेल तर ते मिळकत जप्त करावी आणि त्याचा लिलाव करून हा विषय संपूर्णपणे एकदा क्लियर करावा आणि ह्यासाठी गरज पडल्यास आपण मानधनावर कर्मचारी घ्या अधिकारी ध्या खाली साईनिंग ऑथरिटी आपल्याकडे ठेवा पण बाकीचे तुमचा एखादा सर्व्हे असतील इतर काही असतील त्यामध्ये हा निर्णय देऊन २८ प्राप्त आपण सर्व अर्ज निकाली काढा म्हणजे येणारा बजेट आम्हाला व्यवस्थित मांडता येईल की आम्हाला नक्की काय घ्यायच आहे आणि काय द्यायच आहे आणि त्यामध्ये जे काही बॅक डेटची रक्कम असेल ती आपण ३१ मार्चच्या पुर्वी आम्हाला सादर करा की हे लोकच सापडत नाही ही वास्तुही सापडत नाही, ही दुबार आहे ही तीबार आहे ती आम्हाला महासभेला देऊन ती बॅकडेट सोडून ते करून आपण ते विषय करून हा एकदम साफसुधरा आपला अकाऊंट टॅक्स प्रकरणचा ठराव असा मी ठराव मांडत आहें. आणि सभागृहाला विनंती राहील की आपण हा सर्वानुमते करूया. आणि आपण आपल्या नागरिकांना सर्वाना जागृत करूया की हे पैसे त्यांनी भरावे आणि हे जे अभियान आता आपण दुसर हाती घेणार आहेत त्यामध्ये सुध्दा आपण आयुक्त साहेब आम्हाला खात्री आहे. त्याच पध्दतीने कारवाई करा आणि १०० टक्के आम्हाला वसुली करून दाखविणार.

मॉरस रॉड्रिक्स :-

कमिशनर साहेब पॅनल्टी कोण भरणार तुम्ही सांगितले आता भरायचे आहे.

नरेंद्र मेहता :-

आमचा ठराव एखाद्या व्यक्तिचा १०० रूपयाची मागणी असेल ते गेल्या १० वर्षापासून १००-१०० हून १००० झाले असेल कदाचीत आणि त्याच्यावर शास्ती दंड हे दूसरे १००० झाले असेल तर ते १००० रूपये आपले ओरिजनल आपले घ्यायचे आहेत आणि जे दंड असतील ते फक्त २५ टक्केच घ्यायचे आहे ७५ टक्के माफ करायचे आहेत. शास्ती संदर्भात ज्या लोकांच अधिकृत इमारती असतील आणि त्याला आपण शास्ती लावली असेल तर त्याची शास्ती त्याच व्याज त्याचा दंड हा सगळा तुम्हाला काढायचा आहे आणि त्याला नियमाप्रमाणे करायच आहे.

मा. आयुक्त :-

मा. महापौराच्या परवानगीने, हा गोषवारा हा फक्त महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधार नियम ४१ नुसार व्याजांना माफी करण्याचा असल्यामुळे आपण तेवढयाच मर्यादित आपण ह्याठिकाणी गोषवारा आणि ठराव करावा अनधिकृत बांधकामाच्या संदर्भामध्ये जे शास्ती लावण्याचा विषय आहे त्याच्या अनुषंगाने जर आपण सजेशन केलेले असेल तर त्याच अनुषंगाने अभ्यास करून परत त्याच्यावर आपण म्हणजे ह्याठिकाणी निर्णय घेऊ.

नरेंद्र मेहता :-

आयुक्त साहेब आम्ही परत सुधारण करतो आपल्याला काही गैरसमज झाला असेल तर अनधिकृत बांधकाम असेल ते तुमच्या नियमाप्रमाणे तुम्ही कारवाई करा आम्ही फक्त हे सांगितले आहे की ज्या बिल्डींग अधिकृत असतील त्याला लागले असेल तर ते डिलीट कराव.

मा. आयुक्त :-

मिशन मोडवर आपण ते काम करू.

मॉरस रॉड्रीक्स :-

आज बिल्डर बांधून गेले आणि फ्लॅट ओनर राहिले तर ते कुठून भरणार ज्या अधिकाऱ्यासमोर ज्या बिल्डींग झाल्या असतील त्या अधिकाऱ्यांना काढा. सर्व बिल्डर बांधून पळून गेले त्याच्यावरती काय फ्लॅट ओनर कसे भरणार ते तुम्ही कसे तोडू शकतात. जो बेचके गया है जो बिल्डर भाग के गए है ऐसा लेके वो अधिकारीयोसे पैसा वसुल करोना जो अधिकारी पे जीस वक्त वह बिल्डींग पुरी हुई वह कौन अधिकारी थे उनको बरखास्त करो उनसे पॅनल्टी लो। कमिशनर साहब या उनको बरखास्त करो।

प्रेमनाथ पाटील :-

आयुक्त साहेब माझ्या प्रभागामध्ये अशा काही इमारती आहेत जुन्या बिल्डींग आहेत त्याच्यामध्ये एका पायर्स बिल्डींगमध्ये ८८ फ्लॅट आहेत पण त्यांना ८९ चे बिल येत आहे. मॅडम तर अशा बऱ्याच बिल्डींग माझा प्रभागामध्ये आहेत की साहेब त्यांची जी थकबाकी आहे जी थकबाकी रूम नंबर असेल १०५, १०२ त्याआधी किती थकबाकी आहे ते जाऊन तो सर्व्हे करून तो निर्लेखीत करून घ्यावा.

मा. महापौर :-

सर्व बसुन जा आपल्याला ठराव करायचा आहे

सुहास रकवी :-

मॅडम एक विचारायच आहे त्यांनी सांगितले की कलम ४१ नुसार आयुक्तांनी आता दिशाभूल केली याच्यामध्ये शास्ती लावूनच त्यांनी कर आकारणी ह्या इमारतीलाच होते आम्हाला तेच विचारायच आहे.

मा. महापौर :-

तुम्हाला परत सांगते शास्तीचा जे काही आहे ते केस टू केस सॉल्व्ह केले जातील तुम्ही शास्तीसाठी काही रूल लावू शकत नाही.

सुहास रकवी :-

शास्ती साठी नाही त्यांनी कर आकारणी ही इमारतीचीच लागते त्यांनी महाराष्ट्र महानगरपालिका ४१ नुसार जो विषय दिला आहे त्याच्यामध्ये ज्यांना शास्ती लावून त्यांनी जे कर आकारणी केली आहे तोच विषय रिलेटेड शास्ती आहे. साहेब म्हणत आहेत की शास्ती या विषय नंतर पण ज्याने शास्ती लावून कर आकारणी केली आहे साहेब प्लीज आम्हाला खुलासा करावा.

मा. महापौर :-

त्याचे जे प्रकरण थांबलेले आहे शास्तीमुळे लावलेल ते केस टू केस घेऊन आपण ते सॉल्व्ह करू कारण सरसकट एक नियम तुम्ही सागळयांना लावू शकत नाही एक महिना मी सांगते की जशी आपण ही कलेक्शन मोहिम हाती घेतली तशी एक महिना आपण शास्ती मोहिम घेऊ आणि ते सगळे प्रकरणे मार्गी लावू. प्रेमनाथ पाटील सांगत आहेत की कुठेतरी फक्त ३० रूम आहेत आणि ३५ बिले आली आहेत किंवा ३२ बिले आली आहेत तेही आपण केस टू केस बसून ते सॉल्व्ह करून तेवढी बिल काढून टाकू.

जुबेर इनामदार :-

मा. आयुक्त महोदय गोषवाऱ्यामध्ये कलम ५१ नुसार शास्ती नंतर कंसामध्ये व्याज महाराष्ट्र महानगरपालिका म्हणजे उद्या तुमचा गोषवारा आणि आमचा ठराव हे विसंगत होणार आणि आम्ही केलेला ठराव तो तुम्ही मान्य करणार नाही खर तर शास्ती काढणार तुम्ही की व्याज कमी करणार साहेब तुम्ही कंसात व्याज घेतलेले आहे .वाचा.

मा. महापौर :-

त्यांनी वाचून दाखविलेले आहे.

सुहास रकवी :-

गोषवारा वाचा त्याच्यामध्ये शास्ती हा शब्द आलेला आहे.

मा. महापौर :-

पण त्यांनी ते क्लेरिफिकेशन केलेले आहे का आपण त्यांना शास्तीचे सांगतो.

मा. उपायुक्त :-

शास्ती ह्या शब्दावर गोंधळ उडू नये म्हणून आम्ही शास्ती कंसात व्याज म्हणजे ते जे विलंबीत आकार आहे ज्याला आपण शास्ती, किंवा पॅनल्टी बोलतो इग्रजीमध्ये पॅनल्टी बोललेले आहे आपण मराठीमध्ये त्याला शास्ती बोलले परंतु ही शास्ती २६७ नुसार सुध्दा शास्तीच होते अनधिकृत बांधकाम असेल तर त्याला पण पॅनल्टी विलंबीत आकाराला सुध्दा पॅनल्टी..................

जुबेर इनामदार :-

अधी नियमामध्ये कंसामध्ये अस दिले आहे का पुस्तक माझ्याकडे नाही आहे. म्हणून मी तुम्हाला विचारतो.

मा. उपायुक्त (मु.):-

सभागृहाला थोडी क्लेरीटी हवी या दृष्टीने आम्ही केलेले आहे.

मा. महापौर :-

मला वाटतय की आता विषय संपलेला आहे आपण पुढचा विषय घेऊया ठराव आहे तर बोला.

बर्नड डिमेलो :-

आता मघाशी आपण सांगितल दोघांचा जरी संभोक्ता अलग असला पण जी रक्कम अजुन मोठाणी आकडा जो असतो त्याच्यासाठी आपण नियम जो बनवितो. आमदार साहेबांनी जो ठराव मांडला तो जरी चांगला असला तरी त्यात क्लेरिफिकेशन होत नाही आणि आकडा लो महापालिकेला वसुल करायचा आहे तो शास्तीचा आपल्याला वसुल झाला शास्तीचा प्रश्न आपण पुर्ण सोडवीला आणि व्याजापुरता आता लोकांनी काय केल आहे की दोन हजार घेऊन ५००० शास्ती होती लोक २००० हलार भरत होते ५००० भरत नव्हते असा प्रकार झाल्यामुळे ३-३ वर्षाची १५००० थकबाकी आहे आणि २००० वर चालले आहे. तुम्हाला शास्ती वसुल करायची किंवा व्याजसुध्दातर जी अनधिकृत नाहीत त्यांना सुध्दा लावली आहे.

मा. महापौर :-

मी परत तेच सांगते केस टू केस केल्याशिवाय त्या बिल्डींगला..................

बर्नड डिमेलो :-

जो पर्यत तो निकाल निघत नाही....................

मा. महापौर :-

ते सांगितले ना तुम्ही अर्ज करा आणि त्या अर्ज केलेल्या दिवसानंतर ते मोजले जाणार त्याच्यावर ते लावू नये. क्लियर झाले आहे.

बर्नड डिमेलो :-

तो शब्द नमुद करा.

मा. महापौर :-

आपण ठराव तसा केला आहे.

सुहास रकवी :-

मा. महापौर मॅडम आमच्याइकडे चार वर्षापासुन देशपांडे मॅडम म्हणतात की तशा प्रकारचा ठराव केलेला नाही.

मा. महापौर :-

चार वर्ष जे झाले ते आता करायचे नाही.

सुहास रकवी :-

आम्ही देशपांडे मॅडमना नेहमी जाऊन भेटतो त्याचा निर्णय देऊन.....................

ग्रिटा फॅरो :-

मा. महापौराच्या परवानगीने बोलते, मॅडम २४ ऑक्टोबरला शास्तीचे ज्यांनी पैसे भरले ते भरत नव्हते मी त्यांना जबरदस्ती करून भरायला सांगितले मी इथे चौकशी केली की शास्तीमध्ये काही कमी जास्त होईल का? पण इथून मला नाही सांगितले आज ते लोक मला बोलतील मॅडम तुम्ही आम्हाला भरायला सांगितले. २४ ऑक्टोबरला भरले आहेत त्याबद्दल काय?

मा. महापौर :-

मॅडम आपण आज काढले आणि आजपासूनच लागू होणार. पहिले काय टॅक्स भरत होते आणि आता काय कमी झाले.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

आपण आजपासून ती योजना लावली आजपासूनच ती अंमलात येणार.

ग्रिटा फॅरो :-

मॅडम ते भरत नव्हते...........

मा. महापौर :-

मॅडम आपल्या सिस्टममध्ये नाही की परत द्यायचे आपण बसून घ्या.

ग्रिटा फॅरो :-

आम्ही काय गुन्हा केला आहे.

मा. महापौर :-

विषय संपलेला आहे. पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

भगवती शर्मा :-

व्याज माफी का इसके पहले ठराव किया था। उसमें क्या रिकव्हरी हुई? यह प्रश्न पहले पुछा इसी संबंधीत विषय से है।

मा. महापौर :-

पहले व्याज माफी हुई नही अपना सिस्टम उसे ॲक्सेप्ट नही कर रहा था।

भगवती शर्मा :-

उसके कारण तो बताए।

जुबेर इनामदार :-

तेव्हा विखंडीत करुन भागवल का?

नरेंद्र मेहता :-

देढ घंटा हो गया।

जुबेर इनामदार :-

असू द्या ना ज्वलंत विषय तुम्ही चर्चेला घेतला आहे.

मा. महापौर :-

ठराव पढना है।

भगवती शर्मा :-

ठराव पढना है पर आप इसका जवाब दो।

मा. महापौर :-

त्यांना माहिती काढून पाठवा की त्याची इतकी रिकव्हरी आहे.

मा. उपायुक्त (मु.) :-

आपण जे ठरावाचे बोलता तशा प्रकारचा ठराव झालेला नाही. रिबेटच्या संदर्भात प्रक्रिया झाली होती अशी मला विजय पाटील ह्यांनी माहिती दिली. परंतु अशा स्वरुपाचा ठराव झालेला नव्हता. जर मुदतीच्या आत भरले तर आपण रिबेट देतो. नगरपालिका काळामध्ये पण देत होतो की मुदतीच्या आतमध्ये २ टक्के रिबेट.

भगवती शर्मा :-

साहेब चुकीचा ठराव झालेला आहे.

मा. उपायुक्त (मु.) :-

अभय योजनेसारखा ठराव झालेला नव्हता अशी मला तत्कालीन करनिर्धारक ह्यांनी माहिती दिलेली आहे.

जुबेर इनामदार :-

साहेब विषयपटलावर विषय होता. विषयपत्रिकेवर विषय होता. दि.१५/०१/२०१५ रोजीची निलंबित सभा त्यानंतर ती महासभा दि. २/३/२०१५ ला लागली. हा ठराव प्रशासनाला करुन देण्यात आला. आमचा फक्त एकच प्रश्न आहे की त्या ठरावावर तुम्ही अंमलबजावणी केली की नाही? नाही केली तर तो ठराव विखंडीत करुन घेतला का? सभागृहाने दिलेला ठराव त्याच्यावर अंमलबजावणी झाली पाहिजे.

मा. महापौर :-

उन्होंने जवाब दिया आपको संतोष नही है। दो घंटे से एकही विषय चल रहा है।

जुबेर इनामदार :-

त्यांना जवाब द्यायला देता कुठे तुम्हीच जवाब देता.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर. पुढचा विषय घ्या.

जुबेर इनामदार :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र ६ प्रभाग समित्यांमध्ये विभागलेले आहे. त्यात रहिवाशी व वाणिज्य असे ३,५५,०६८ अधिक मालमत्ताधारक अस्तित्वात आहेत. महापालिकेच्या कार्यपध्दती अनुसार वित्तीय वर्षाच्या सुरुवातीला सहा महिन्याचे व नंतर सहा महिन्याचे मागणी देयके करधारकांना वितरीत केली जाते. प्रथम सहा महिन्याच्या मागणीवरच्या देयक रक्कम अदा करण्याची मुभा तीन महिन्यांपर्यंत असते. उशिर झाल्यास ०.०२% व्याज प्रतीदिन प्रमाणे आकारला जातो. तद्नंतर पुढील महिन्यांसाठी तसेच धोरण निश्चित आहे.

महापालिका कर विभागाकडून मालमत्ताकर मागणी वित्तीय वर्षातील सहा, आठ महिने उलटुनही करधारकांकडे पोहचत नाही. याबाबतची तक्रार रहिवाशी व लोकप्रतिनिधी वारंवार करत असतात. महापालिकेच्या माध्यमातुन करधारकांना उशिरा पोचणा-या देयकामुळे व्याज भरावा लागतो. द्वितीय वर्षाच्या ऑगष्ट अखेरपर्यंत करधारकांपर्यंत देयक पोहचणे गरजेचे आहे, प्रशासनाने याची भविष्यात दक्षता घ्यावी व असेन झाल्यास संबंधीत करनिर्धारक अधिकारी यांना जबाबदार ठरवावे.

महानगरपालिका क्षेत्रात एकाच इमारतीमधील वेगवेगळ्या सदनिकांवर करयोग्य मुल्याप्रमाणे वेगवेगळे कर आकारण्यात आलेले आहेत. तरी अशा मालमत्तांच्या करांमध्ये सुधारणा करुन समान कर आकारण्यात यावा. महानगरपालिका कर विभागाच्या माध्यमातुन करधारकाने मालमत्ता देयक अदा करुनही वित्तीय वर्ष संपले तरीही भरलेले देयक खतवण्याचे काम विभागीय कर्मचा-यांमार्फत नियमित होत नाही किंबहुना करनिर्धारकांचा या विषयावर जातीने लक्ष असणे अत्यंत गरजेजे आहे. विभागीय कर्मचा-यांच्या या हलगर्जीपणामुळे वित्तीय वर्षाच्या कर वसुलीच्या रक्कमेचा अर्थसंकल्पीय अंदाज विस्कळीत होतो. तरी विभागीय अधिका-यांनी विहीत मुदतीत आपली जबाबदारी पार पाडावी.

तसेच सन २०१५-१६ या वित्तीय वर्षामध्ये करदात्यांनी मालमत्ता कर भरुनही व्याजाची व नोटीस फी ची रक्कम सन २०१६-१७ च्या चालू वर्षाच्या मालमत्ता कराच्या देयकामध्ये समाविष्ट झाल्याची प्रकरणे आहेत. अशा देयकातील व्याजाची रक्कम रद्द करण्यात यावी.

महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामावर तिप्पट शास्ती आकारली जात आहे. मालमत्ताधारक अनधिकृत बांधकाम करणा-या विकासकांच्या कृतीला बळी पडतात व सर्वसाधारण करधारकांना त्याचा भुर्दंड सोसावा लागत आहे. तरी शास्तीच्या रक्कमेवर व्याज आकारण्यात येऊ नये.

भिवंडी-निजामपुर महानगरपालिका व ठाणे महानगरपालिकेच्या धर्तीवर मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रालाही करधारकांनी त्यांच्या मालमत्तेवर थकीत असलेली कराची मागणी मार्च अखेरपर्यंत अदा केल्यास त्यातुन व्याजाची रक्कम ९९% माफ करुन केवळ कराची रक्कम स्विकारण्यात यावी, असा मी ठराव मांडत आहे.

बर्नड डिमेलो :-

माझे अनुमोदन आहे.

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ९३ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. नरेंद्र मेहता, अनुमोदन श्री. अश्विन कासोदरिया. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. बर्नड डिमेलो. सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. बर्नड डिमेलो ह्यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. नरेंद्र मेहता ह्यांच्या बाजूने मतदान करायचे आहेत त्यांनी हात वर करायचे आहेत. विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

सुचक श्री. नरेंद्र मेहता ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४३, विरोधात २६ इतकी मते पडलेली आहेत. श्री. नरेंद्र मेहता ह्यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. ९३ :-

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामधील मालमत्ता धारकांच्या मालमत्ता करातील व्याजाच्या रक्कमांना माफी देणेबाबत अभय योजना लागु करणे.

ठराव क्र. ९४ :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कराधान नियम ४१ नुसार, पहिल्या सहामाही मालमत्ता कराची रक्कम बिल दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत व दुस-या सहामाहिची मालमत्ता कराची रक्कम ३१ डिसेंबर पूर्वी भरावयाची आहे आणि जर अशी मालमत्ता कराची रक्कम त्या दिनांकापर्यंत असा कर भरावयाचा होता. त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा भागासाठी दरमहा २% इतकी रक्कम व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) म्हणुन भरण्यास मिळकतधारक जबाबदार असेल अशी तरतूद करण्यात आली आहे. यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील जे मिळकतधारक उपरोक्त नमूद केलेल्या विहित मुदतीत मालमत्ता कर महानगरपालिकेकडे जमा करीत नाहीत, अशा मिळकतधारकांकडुन दरमहा २% इतकी रक्कम व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) आकारण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाची संगणकीय आज्ञावलीतील मागणीनुसार मालमत्ता करापोटी रू. २६५.५६/- कोटी मागणी दिसून येत आहे व सदर मागणीत रु.१४५.६३/- कोटी थकबाकी व रु. ६१.२९/- कोटी एवढे व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) दिसून येत आहे. परंतू सदर मागणीत दुबार मागणी, प्रस्तावित निर्लेखित प्रकरणे यामुळे अवास्तव वाढ दिसून येत आहे.

सद्यस्थितीत विहीत मुदतीत मालमत्ता कराची रक्कम न भरणा-या मिळकत धारकास थकीत रकमेवर तरतूदीनुसार दरमहा २% प्रमाणे व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) आकारण्यात येत आहे. काही मिळकतीचा वर्षानुवर्षे मालमत्ता कर भरला जात नसल्याने, त्यावरील व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) वाढत आहे. यामुळे थकबाकी व व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) यानुसार होणारी वसुलीची टक्केवारी कमी प्रमाणात दिसून येत आहे. त्याचप्रमाणे मालमत्ता कराच्या थकबाकीवरील व्याजामध्ये सुट दिल्यास, मालमत्ता कराची थकीत रक्कम व चालू मागणी भरण्याबाबत मिळकतधारकांचा/ नागरीकांचा कल आहे व प्रत्यक्ष वसुली दरम्यान मिळकतधारकांकडून अशा प्रकारे सुट मिळणेबाबत विचारणा होत आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम प्रकरण ८ (कराधान नियम) कलम ५१ मध्ये या अधिनियमानुसार आकारण्यात आलेले व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) किंवा वसुलीचा खर्च पूर्णतः किंवा अंशतः माफ़ करण्याची तरतूद आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती पाहता अनेक वर्षापासून थकीत असलेली मालमत्ता कराची रक्कम वसुल होण्याच्या प्रयत्न करण्याच्या दृष्टीकोनातून मालमत्ता करावरील व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) माफ़ करण्याबाबत खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

- जे मिळकतधारक माहे १२ डिसेंबर २०१६ ते १४ जानेवारी २०१७ पर्यंत देय होणारा थकीत मालमत्ता कर व चालू आर्थिक वर्षाच्या मागणीसह रक्कम भरतील अशा मिळकतधारकांना त्यांच्या मिळकतीच्या मालमत्ता कराच्या देयकात दिसून येणारे व्याजाच्या रक्कमेवर (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) ७५% माफी देण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच जे मिळकत धारक दि. १५ जानेवारी २०१७ मध्ये मालमत्ता कर भरण्यास येतील अशा मालमत्ता धारकांना दि. १५ जानेवारी २०१७ ते दि. ३१ जानेवारी २०१७ पर्यंत त्यांच्या मिळकतींच्या मालमत्ता कराच्या देयकांत दिसून येणाऱ्या व्याजाच्या रक्कमेत ५०% सुट देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

व्याज माफी बाबत मा. आयुक्त यांनी सोशल मिडीयाच्या माध्यमातून शहरामध्ये प्रसिद्धीचे फलक लावण्यात यावेत व वृत्तपत्रामध्ये या अभय योजनेची प्रसिद्धी ३१ जानेवारी २०१७ पर्यंत चालू ठेवावी. मोठ्या थकबाकी धारकांना लेखी पत्राने कळविण्यात यावे एखाद्या मालमत्ता धारकांने देयकामध्ये सुधारणा करण्याची मागणी अभय योजनेच्या काळात केली ही सुधारणा अभय योजनेच्या काळात झाली नाही तर अशा मिळकतधारकांस त्यांच्या अर्जाची तारीख गृहित धरुन देयकामध्ये दुरुस्ती झाल्या नंतर अभययोजनेचा लाभ घ्यावा.

या कामी मा. आयुक्त यांनी वेगळी यंत्रणा उभी करावी व कर्मचारी वर्ग कमी असल्यास मानधनावर कर्मचारी वर्ग घेण्यसही मंजूरी देण्यात येत आहे. कर विभागाने अभय योजनेचे प्रलंबित अर्ज २६ फेब्रुवारी २०१७ पर्यंत निकाली काढून अर्जाचा निर्णय २८ फेब्रुवारी २०१७ पर्यंत घ्यावा.

उपरोक्तप्रमाणे जे मिळकरधारक व्याजाची रक्कम दि. ३१ जानेवारी २०१७ पर्यंत मालमत्ता कराचा भरणा करणार नाहीत अशा मिळकतधारकांच्या सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या मालमत्ता कराच्या बिलामध्ये अशी व्याज (मालमत्ता कराच्या थकबाकीसह) थकबाकी म्हणून दर्शविण्यात येईल. सदरची थकबाकी वसुल करणेकरीता अधिनियमातील तरतूदीनुसार कडक कारवाई अंतर्गत प्रत्यक्ष वॉरंट बजावून मिळकत जप्त करण्यात येईल आणि जाहीर लिलावाद्वारे मिळकतीची विक्री करण्यात यावी.

उपरोक्तप्रमाणे मालमत्ता कर देयकातील व्याज (शास्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कराधान नियम ४१ नुसार) माफीस मा. महासभा मंजूरी देत आहे.

ज्या इमारती मंजुर नकाशा प्रमाणे बांधण्यात आलेल्या असतील अशा इमारतींचे वास्तुविशारद (Architect) दाखला प्राप्त झाला असेल अशा मालमत्तांवर आकारण्यात आलेली शास्ती, व्याज, दंड माफ करण्यात यावा.

कर आकारणी झाल्या नंतर किंवा भोगवटा दाखला झाल्या नंतर अनधिकृत बांधकाम झाले असल्यास तेवढ्याच अनधिकृत / वाढीव बांधकाम क्षेत्रावर शास्ती कराची आकारणी करण्यात यावी. यासही महासभा मंजूरी देत आहे.

त्याचप्रमाणे मोकळ्या जागेवरील व्याज उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे माफी देण्यास महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ४ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | ४ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | पाटील वंदना विकास | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | शबनम लियाकत शेख | निरंक |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | प्रभात प्रकाश पाटील | |
| १० | जैन गिता भरत | १० | पुजारी कांचना शेखर | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | वंदना रामदास चक्रे | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | अनिता जयवंत पाटील | |
| १४ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १४ | इनामदार जुबेर | |
| १५ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १५ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १६ | सुजाता रविकांत शिंदे | १६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | १७ | सामंत प्रमोद जयराम | |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | १८ | रकवी सुहास माधवराव | |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | १९ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २० | कासोदरीया अश्विन श्यामजी | २० | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| २१ | जैन दिनेश तेजराज | २१ | डॉ. आसिफ गुलाब शेख | |
| २२ | जैन रमेश धरमचंद | २२ | लियाकत ग. शेख | |
| २३ | तारा विनायक घरत | २३ | नरेश तुकाराम पाटील | |
| २४ | शुभांगी महिन कोटियन | २४ | भोईर कमलेश यशवंत | |
| २५ | जयमाला किशोर पाटील | २५ | रविंद्र भिमदेव माळी | |
| २६ | परमार अनिता भरत | २६ | वंदना मंगेश पाटील | |
| २७ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| २८ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| २९ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ३० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३१ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३३ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३४ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३५ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | |
| ३६ | केळूसकर प्रशांत नारायण | | | |
| ३७ | भोईर भावना राजु | | | |
| ३८ | भोईर राजु यशवंत | | | |
| ३९ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४० | मुन्ना सिंग | | | |
| ४१ | दिप्ती शेखर भट | | | |
| ४२ | मयेकर सरस्वती रजनकांत | | | |
| ४३ | अशोक तिवारी | | | |

ठराव बहुमताने मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ९४, महानगरपालिका क्षेत्रातील ज्या मालमत्तांना कर आकारणी झालेली नाही तसेच ज्या मालमत्तांचा वापर अनिवासी चालु आहे, अशा मालमत्तांची नव्याने वापराप्रमाणे कर आकारणी करणे इत्यांदीसाठी अभय योजना लागु करणे.

प्रमोद सामंत :-

मॅडम टॅक्सचा विषय आहे. मा. आयुक्तांचे अभिनंदन. त्यांनी विक्रमी वसुली केलेली आहे. वसुलीमध्ये पेपरात न्युज छापून आलेली ५.५० लाख गहाळ झाल्याचे पेपरमध्ये आले नंतर ते मिळाले सुध्दा. महानगरपालिकेच्या सुरक्षेचा विषय आहे. आयुक्तांनी निवेदन करावे की त्यांनी गुन्हा दाखल केला आहे का? पैसे मिळाले चांगली गोष्ट आहे पण पैसे आले कुठून? पैसे कुठून गहाळ झाले होते चौकशी केली होती का? महानगरपालिकेच्या सुरक्षेबाबत टॅक्स विभागाबाबत अशा गोष्टी नेहमीच येतात. कधी साईट हॅक होते. आपली काय व्यवस्था आहे त्याबाबत निवेदन करावे.

मा. उपायुक्त (मु.) :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो दि. २४ नोव्हेंबर रोजी मिड नाईट १२.०० पर्यंत जी कराची वसुली झाली होती. त्या दिवशी त्या प्रभागाकडून ३७ लाख वसुली झाली होती. संध्याकाळी ६ वाजता बँकवाले १० लाख घेऊन गेल्यानंतर उर्वरीत जी रक्कम होती ती रात्री १२ वाजता संबंधीत कर्मचारी कर निरिक्षक त्यांना ६ पासून ते १२ वाजेपर्यंत रक्कम कुठे ठेवली ते लक्षात आले नाही. चलनाच्या पावत्या आहेत पण रक्कम नाही त्यानंतर त्यांनी कर निर्धारक ह्यांना माहिती दिली. त्याच्यानंतर ह्याचा पुन्हा शोध घ्यायला लावला. दरम्यानच्या काळात आमचे कर्मचारी काशिमिरा पोलिस स्टेशनला गेले असता त्यांनी शोध घ्या. संपूर्ण तपशील तपासा, पूर्ण रक्कमेचा ताळमेळ घ्या अशा स्वरुपाच्या सुचना केल्या. त्यानंतर २५ तारखेला शोधाशोध चालू केली त्यामुळे प्रथमतः प्रचंड ताण ह्यामुळे लक्षात आले नाही त्यानंतर कपाटाच्या तिकडे त्यांना आठवले त्यानंतर तत्परतेने त्यांनी आणून भरले त्यानंतर शनिवार रविवारची सुट्टी गेली होती. त्यामुळे संबंधीतांना निष्काळजीपणाची नोटिस दिली त्याच्याकडून व्याजासकट ही रक्कम वसूल केली.

प्रमोद सामंत :-

मा. आयुक्त साहेब अशा प्रकारच्या गोष्टी आपल्याकडे मागे होत होत्या. दोन वेळा टॅक्स विभागाची साईट हॅक झाली. त्यावेळी किती प्रॉपर्टी निर्लेखित झाल्या, दुबार किती कमी झाल्या, किती ठिकाणची शास्ती कमी झाली याबद्दल आपण चौकशी केली नाही गुन्हा दाखल केलेला नाही. ह्या प्रकरणाचा पण गुन्हा दाखल केलेला नाही. ह्या प्रकरणाचा पण गुन्हा दाखल केला पाहिजे होता ह्याच्यात पुन्हा डिनोमिशेनचा मोठा इश्यू पूर्ण देशभरात चाललेला आहे. काही लोकांना त्रास होतो, काही लोकांना विषय चांगला आहे. गरिबांना तर भरपूर त्रास होतो हे ५.५० लाख जुन्या नोटा पुन्हा कुठून आल्या कूठून आपल्याकडे रेव्हेन्यू लगेच आला त्यात आपले कर्मचारी इनव्हॉल्व आहेत का? हे आपण बघितले पाहिजे.

मा. उपायुक्त (मु.) :-

पुर्वीच्या मॅटरमध्ये आपण जसे आपण बोलतात की साईट हॅक झाली होती त्या संदर्भात गुन्हा दाखल झालेला आहे. मेनली ५००-१००० च्या नोटांसाठी ह्यासाठीच ड्राईव्ह होता की अशा प्रकारच्या डिनोमिनेशनच्या नोटा आणून भराव्या. त्यानुसार कराचा भराणा जास्त होईल त्यानुसार स्थानिक संस्था कराना ह्याच्यात उत्पन्न मिळेल. आणि ५०० ला ज्या टेंडर व्हॅल्यू नाही असा चोरुन देण्याचा मुद्दा नव्हता अशा नोटा कोण चोरुन पण नेणार नाही.

प्रमोद सामंत :-

त्याला अजूनही टेंडर व्हॅल्यू आहे.

मा. उपायुक्त (मु.) :-

त्याच्याकडून गैरप्रकार आणि मिस अप्रपेशन झाले असेल तर निश्चित आपण त्या संदर्भात संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल केला असता...................

जुबेर इनामदार :-

चुकीचे आहे. तो काही कपाटाच्या खाली लपलेला उंदिर नव्हता.

(सभागृहात गोंधळ)

जुबेर इनामदार :-

कोणाला वाचवायचा प्रयत्न करु नका. हे तुम्हालाच त्रासदायक होणार आहे. जे कर्मचारी ह्याला दोषी असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे होती.

मा. उपायुक्त (मु.) :-

त्यांना आपण निष्काळजीपणा..............

जुबेर इनामदार :-

सर हे निष्काळजीपणा नव्हता ही चोरी होते.

मा. उपायुक्त (मु.) :-

संबंधित कर्मचाऱ्याने स्वतःहून आपल्याकडे हे केले आहे की............

वेंचर मेन्डोंसा :-

साहेब स्टॅन्डिंगमध्ये काहीतरी वेगळच बोलले तुमचा जवाब वेगळा होता.

हरिश्चंद्र आमगावकर :-

स्टॅन्डिंगच्या मिटींगमध्ये हा विषय जेव्हा घेतला तेव्हा आयुक्त साहेबांनी सांगितल की ही जी रक्कम आहे ती जे कर्मचारी होते त्यांच्याकडून वसुली केली. आता तुम्ही सांगता त्याच्याकडे सापडली.

मा. उपायुक्त (मु.) :-

आम्ही त्यांना सांगितले की तुम्ही भरा त्यांनी नंतर शोध घेऊन भरली.

हरिश्चंद्र आमगावकर :-

सापडली असे तुम्ही सांगितले नव्हते.

मा. उपायुक्त (मु.) :-

आपल्या कोषागरात भरली असे मी सांगितले.

हरिश्चंद्र आमगावकर :-

सर सभागृहाच्या समोर सांगा. त्यादिवशी स्टॅन्डिंगला अलग विषय सांगितला होता आज तुम्ही वेगळ सांगता.

मा. उपायुक्त (मु.) :-

ही रक्कम गहाळ झाली तर संबंधिताकडून रक्कम भरणा केली असे मी बोललो.

जुबेर इनामदार :-

अशा कर्मचारी अधिकाऱ्यांना पाठीशी घालता म्हणून ही अनधिकृत बांधकाम होतात म्हणून ही शास्ती लोकांना भरायला लागते. अशा लोकांच्या पाठीशी असे प्रशासन उभे राहील अधिकारी वर्ग उभे राहील. ह्या शहराच्या प्रशासनाचे काय होणार आहे. साहेब सभागृहाला ह्या विषयाचे उत्तर पाहिजे.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

त्यांनी उत्तर दिलेले आहे बसून घ्या.

**प्रमोद सामंत :-**

**त्या लोकांना ते पाठीशी घालतात.**

**नरेंद्र मेहता :-**

**मा. आयुक्त साहेब आपण योग्य ती कारवाई करा.** कर आकारणी न झालेल्या व वापरात बदल झालेल्या मालमत्तांची कर आकारणी करणेसाठी मालमत्ताधारक यांनी स्व्त: होउन पुढे येणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधन नियम 8 अन्वये मालमत्ताधारक यांनी माहिती देणे बंधनकारक आहे. परंतू अशी माहिती दिली जात नाही ही वस्तूस्थिती आहे. कर विभागातील उपलब्ध अधिकारी व कर्मचारी वर्ग विचारात घेता कर आकारणी न झालेल्या व वापरात बदल झालेल्या मालमत्तांची कर आकारणी करणेकामी ज्या मालमत्ताधारकांकडून माहिती कळविली जाईल. त्यांना कर आकारणी केल्या नंतर येणाऱ्या करपात्र रक्कमेच्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधन नियम 8(3) अन्वये 25 टक्के रक्कम प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणून आकारण्यात येणार नाही. परंतू ज्या मालमत्तादाराकडून अशी माहिती स्वत: न कळविल्यास प्रभाग समितीमधील कर निरीक्षक व विभागिय लिपीक यांनी जागा तपासून पाहणी करून त्याची कर आकारणी केल्यास अथवा मनपाचे वतीने सर्व्हेक्षण केल्यास त्यांना कर आकारणी करण्यात आलेल्या वार्षिक करपात्र रक्कमेच्या 25 टक्के रक्कम ही प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणून आकारुन कर आकारणी करणेबाबत अभय योजना जाहिर केल्यास कर आकारणी न झालेल्या व वापरात बदल झालेल्या मालमत्ता, कर आकारणीच्या जाळ्यात येतील व महानगरपालिकेचे उत्पन्न् वाढेल.

वरील बाब विचारात घेऊन कर आकारणी न झालेल्या व वापरात बदल झालेल्या मालमत्तांची कर आकारणी करणेसाठी खालील प्रमाणे अभय योजना जाहीर करणेस प्रस्ताव सादर करीत आहे.

1) कर आकारणी न झालेल्या सर्व मालमत्तांची कर आकारणी करणे साठी मालमत्ताधारक यांनी स्वत: अभय योजनेच्या कालावधीत म्हणजेच दि. 15/12/016 ते दि. 14/02/2017 अखेर अर्ज केल्यास (Self Declaration) त्यांना त्यांचे मालमत्तेची अधिनियमातील तरतुदीनुसार करपात्र रक्कम निश्चित करुन कर आकारणी करणेत येईल, यामध्ये ज्या मलामतत्ता धारकांनी करावी आकारणी केलेली नाही अशा मालमत्ता धारकांना काराची आकारणी मालमत्तेच्या वापरापासून किंवा जास्तीत जास्त 6 वर्ष मागे जावून कराची आकारणी करण्यात यावी. यामध्ये प्रशासनाने दंड व व्याज आकारु नये. जे मालमत्ताधारक दि. 14/02/2017 नंतर मालमत्ता कराची आकारणी करतील त्यांना दंड व व्याज वार्षिक करपात्र रक्कमेच्या 25 % रक्कम ही प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणुन आकारुन कर आकारणी करण्यात यावी तसेच सदर मालमत्ता धारकांना योजना कालावधीतच दि.12/02/2017 पुर्वीच सदर रक्कमेचा भरणा करावा लागेल अन्यथा सदर मालमत्ता धारकाच्या पुढील आर्थिक वर्षाचे देयकात वार्षिक करपात्र रक्कमेच्या 25 टक्के रक्कम प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणुन एक वेळेत आकारण्यात येईल.

2) वापरात बदल झालेल्या व भाड्याने दिलेल्या मालमत्ता अशा सर्व मालमत्तांची कर आकारणी करणे साठी मालमत्ताधारक यांनी स्वत: अभय योजनेच्या कालावधीत म्हणजेच दि. 12/12/016 ते दि. 14/02/2017 अखेर अर्ज केल्यास (Self Declaration) त्यांना त्यांचे मालमत्तेची अधिनियमातील तरतुदीनुसार करपात्र रक्कम निश्चित करुन कर आकारणी करणेत येईल यामध्ये ज्या मालमत्ता धारकांनी कराची आकारणी केलेली नाही अशा माजमत्ता धारकांना कराची आकारणी मालमत्तेच्या वापरापासून किंवा जास्तीत जास्त 6 वर्ष मागे जावून काराची आकारणी करण्यात यावी. यामध्ये यामध्ये प्रशासनाने दंड व व्याज आकारु नये. प्रस्तुत बाबत वार्षिक करपात्र रक्कमेच्या 25 टक्के ही प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणुन एक वेळेत आकारणी करणे असल्याने वरीलप्रमाणे शुल्काची आकारणीस मंजूरी आहे.

3) प्रस्तूत बाबत वार्षिक करपात्र रक्कमेच्या 25 टक्के ही प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणुन एक वेळ आकारणी करणे असल्याने वरीलप्रमाणे शुल्काची आकारणीस मंजूरी आहे.

4) महानगरपालिका क्षेत्रामध्ये ग्रामपंचायत व नगरपालिकेपासून कराची आकारणी झालेली आहे. कर आकरणी करताना एकाच इमारतीमधील सदनिका धारकांना समान कर आकारणी होणे आवश्यक होते. परंतु काही सदनिकांना समान दराने कर आकारणी झालेली नव्हती. तरी एकाच इमारतीमध्ये राहिलेल्या सदनिका धारकांना त्याच इमारतीधील भाडेमुल्य दराप्रमाणे समान कर आकारणी सुधारीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. समान कर आकारणी प्रकरणामध्ये कर विभागाने

स्वतंत्रपणे प्रकरणनिहाय अहवाल तयार करुन सदर कर आकारणीची प्रकरणे मा. आयुक्त यांना सादर करावीत व प्रकरणावर आयुक्तांनी निर्णय घेण्यास हि सभा मान्यता देत आहे.

वरीलप्रमाणे कर आकरणी न झालेल्या व वापरात बदल झालेल्या मिळकतीची कर आकरणी करणेसाठी अभय योजनेस (ॲम्नेस्टी स्कीम) महासभेची मंजूरी आहे.

प्रशांत केळुसकर :-

माझे अनुमोदन आहे.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम, आयुक्त साहेब मिरा भाईंदर आपण मागच्या ठरावामध्ये काही रक्कम होती. व्याज दंडीत होत कुठेतरी माफ केलं आणि त्यामध्ये महापालिकेचा कुठेतरी अर्थसंकल्पावर परिणाम होईल. बॅडॅप्सीक होईल हा दुसरा जो विषय आहे ह्याच शहरामध्ये मोठ्या प्रमाणात अजुनही कर आकारणी झालेली नाही. मग ते एखादे स्लम असतील, एखादी इमारती असतील कर आकारणी आपण त्यांची करु नये अशी आपण त्यांना माफी देऊ शकत नाही, नियमाप्रमाणे एखादा कर आकारणी करायची असेल तर संबंधीतांनी स्वतःहून आपल्याला अर्ज करायला पाहिजे त्यांनी केल नाही तर त्याच्यावर २५ टक्के हे आपण शास्ती किंवा दंड आपण लागु करतो म्हणजे हजार रुपये असतील तर १२५० आपण घेतो कारण त्यांनी सेल्फ डिक्लेर करायचं होतं. आपल्याकडे अजुनपर्यंत आपण कोणाला वेठीस धरल नाही ज्याने उशीराने कर आकारणी केलेली आहे. काही कर्ज आपल्याकडे दोन वर्ष असतील काही तीन वर्ष असतील तर पहिला निर्णय आम्ही हा दिलेला आहे की, ज्या तारखेपासून वापरात आलं किंवा जास्तीत जास्त सहा वर्ष ह्याप्रमाणे त्याची कर आकारणी करण्यात यावी ज्याची कर आकारणी झालेली नाही त्याचा कुठलाही दंड, कुठलाही व्याज कुठलीही शास्ती त्याच्यावर लादु नये. अनधिकृतमध्ये असतील तर शास्तीचे दोन परिणाम आहेत. मी शास्तीचे डेफिनेशन वापरतो २६७ ची शास्तीचा विषय वापरत नाही आहे. जे २५ टक्के आपण ते डेफिनेशन वापरतो. तर अशा प्रकारचा लावु नये. अनधिकृत बांधकाम असतील त्यांना जे तुम्हाला तीन पट शास्ती ती लावावी पण त्याच्यावर गेल्या तीन वर्षापासून कर आकारणी झाली नसेल तर त्याला दंड किंवा असं कुठल्याही प्रकारचे आपण ते लाऊ नये. दुसरा विषय आहे की, वापरात बदल ज्या रेसिडेन्समध्ये कमर्शियल झाले असेल इंडस्ट्रीमध्ये काही बदल झाला असेल किंवा घरात वेगळ ऑफिस झाल असेल ह्या सगळ्या बाबतीमध्ये. त्या जागा वास्तु मालकाने आपले सेल्फ डिक्लरेशन द्यायच की, मी ह्या जागेच्या बद्दल मी ह्या तारखेपासून केलेल आहे. तर त्याला मागे आपण जाऊ नये. तर चालु वर्षापासून ते बदल आपण स्विकारुन त्याला बदलचं कमर्शियल असेल तर कमर्शियलप्रमाणे सेमी कमर्शियल असेल जे काही असेल त्याप्रमाणे त्याची कर आकारणी करावी. एखाद्या व्यक्तीने कर आकारणी झालेली आहे आणि कुठल्याही प्रकारे टॅरेस कव्हर केला असेल वाढीव बांधकाम केलं असेल नियमात असेल तर ती कर आकारणी लावावं त्याच्यावर टॅक्स आणि हे वसुल करुन चालु वर्षापासून त्याची कर आकारणी करावी. एखादा तरी अनधिकृत केला असेल तरी त्याची चालु वर्षापासून करावी परंतु शास्ती २६७ प्रमाणे तीन पट जे काही असतील, एखाद्याने टॅरेस कव्हर केलेला आहे, एखाद्याने माळा वाढवलेला आहे जुनीच त्याची कर आकारणी चालु आहे. तर त्याला शास्ती खाली आणुन चालु वर्षापासून करावी. ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात आपल्याकडे इंडस्ट्रीज आहेत त्यांनी डबल, ट्रीपल हाईट्स केलेली आहेत. तर त्यांनी कर आकारणीमध्ये बदल करुन घेतलेला नाही. तर त्यांना तुम्ही वरचा जो काही त्याने वाढीव बांधकाम झाल असेल त्यावर शास्ती लावून खाली चालू वर्षात जो सेल्फ डिक्लेर करतील आणि जे लोकं सेल्फ डिक्लेर करणार नाहीत दि. ३१ जानेवारीपर्यंत त्यांच्यावर आपण व्याजासकट, दंडासकट, शास्तीसकट शास्ती म्हणजे जे २५ टक्के वाले, शास्ती आणि व्याज ह्यासकट ज्या वापरात आलेल्या आहेत किंवा जास्तीत जास्त ६ वर्ष असं मागे जाऊन त्याच्यामध्ये ती कर आकारणी आपण ती करायची आहे आणि अनधिकृत असेल, तर त्याला ती शास्ती लावून त्याने सेल्फ डिक्लेर केलं तर त्याला चालु वर्षापासून डिक्लेर नाही केल तर मागे जाऊ. अशा प्रकारचा आमचा महानगरपालिकेचा उत्पन्नामध्ये सुध्दा वाढ होणार आहे. आणि कुठेतरी टॅक्सची प्रणालीमध्ये समांतर रुप येईल. भविष्यात आपले सर्व प्रश्न सुटतील आणि येणारा बजेटमध्ये मला खात्री आहे यावर आपण व्यवस्थित भार देऊन हे कार्य केलं तर साधारण आपली नाही तरी २५.५० कोटी रुपये वसुल होणार आहेत आणि ह्याचा आपण जाहिरात देऊन प्रसिध्दी व्यवस्थित व्हावी अशी आपल्याला विनंती आणि परत सभागृहाला विनंती सर्वानुमते आपण हा ठराव मांडू या. जे लोक सेल्फ डिक्लेर करतील त्यांना फायदा आहे. पण जे लोकं आताही लपवत असेल तर त्यांना हा व्याज दंड सगळ भराव लागणार आहे. शहराला, महापालिकेला, विकासासाठी निधी उपलब्ध असतो. ज्या लोकांनी वेळोवेळी कर भरलेला आहे ते दुःखी होतात जे लोक अनेक वर्षापासून कर भरत नाही किंवा वापरात बदल केलेला आहे. त्यांना हे कुठेतरी मार्गावर लागला पाहिजे त्याने सेल्फ डिक्लेर केलं. इट्स ओके नाही केलं. तर मग आपली कारवाई चालु द्या साहेब असा ठराव मांडत आहे. धन्यवाद.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम, हमारा समर्थन हम भी चाहते है रेव्हेन्यु बढे उन लोगोने वहाँ पे चेक किया उन लोगो को टॅक्स लगा कर दो, सबसे बडी चिज उन्होंने कहा अधिकृत आणि अनधिकृत अगर ३० डेज के अंदर में

कोई कॉमन से उसका युज कर रहा है। उसके उपर आप चर्चा करेंगे उसके सेल्फ डिफेन्स के उपर रेव्हेन्यु में इसका रेग्युलेशन उसका नही है। मैं आज कर्मशियली उसको युज कर रहा हूँ उसके उपर में आप टॅक्स लगाए वह लिगल हुआ की अनलिगल हुआ पहिले तो उसकी क्या व्याख्या है। अगर वहाँ पर बदल किया बिना नगररचना के ए.बी.पी.पी. के प्राधिकरण के बिना वह मेरी नजर में मेरे को जो जानकारी है, वह अनधिकृत ठहराया जाता है। अगर अनधिकृत ठरता है तो उनपे टॅक्स लगाने का किसको कितना अधिकार है। आज मिरा भाईंदर के अंदर मे बहुत सी ऐसी बिल्डींग है, वहाँ पे ग्राऊंड फ्लोर में कमर्शियल युज हो रहा है। छोटे मोठे व्यवसाय किए जा रहे है। महापौर मॅडम आपके पास बहुतसी तक्रार आ रही है। सोसायटी के भी ऑब्जेक्शन है यहाँ पे भी कॉमनसेन्स युज हो रहा है तो उसको ओव्हर रुड कर के बहुत से लोगो को यहाँ पर परवाना दिया जा रहा है। जो गलत है जब प्रॉपर बदल नियम के अनुसार नही किया जाता है तब तक उसको कोई भी अधिकार महानगरपालिका को नही है की उस व्यक्ती को टॅक्स लगाया जाए। टॅक्स लगाऐंगे तो इललिगल बोल करके टॅक्स लगाओ। मैं जानकारी के हिसाब से कहता हूँ की ३७ का ठराव इसी सभा के अंदर में हुआ था की कुछ ग्राऊंड फ्लोअर के अंदर में दवाखाना हॉस्पीटल तक वापर हो रहा है बहुत सी सोसायटीने ऑब्जेक्शन लिया। बम्बई के अंदर में ३७ का ठराव कर के वहाँ पे उन्होने कुछ परवानगी मांगी थी। यहाँ पे थी मिरा भाईंदर के अंदर में भी सभागृह के उद्दिष्ट लाद कर के वह परवानगी ३७ का ठराव किया गया है। आप जो बदल कर रहे है उसको भी आप ३७ का ठराव करो मतलब नियमन साध्य कर रहे हो तो यहाँ पे यह नियम अलग से लिए गए है। रिकव्हरी करना है महानगरपालिका का उत्पन्न में बढाना है लेकिन नियम के अनुसार तो होना चाहिए ना। कही तो उसकी वैधता होनी चाहिए ना। नगररचना के नए नियमानुसार होना है तो उसकी इजाजत दिजीए। मान्यता दे दुसरी आपके अगर नियमीत देता है तो मेरा आपसे निवेदन है की जो भी एन निवासी यहाँ पर बदल कर रहा है तो संबंधीत सोसायटी के एन.ओ.सी. के बिना उसको बदल न किया जाए।

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने जे भगवती शर्माजीने जे मांडल खर म्हणजे हे एखादा रेसिडेन्समध्ये कमर्शियल झालं, लोकांना त्रास होतो तर अशा ज्या प्लान्टमध्ये नसतील तर त्याला कर आकारणी आपण करायचीच आहे पण ते शास्तीमध्ये येतील कारण तो अल्टीमेटली रेसिडेन्सच त्याने कमर्शियल केल्यामुळे तो अनधिकृतच गृहित धरुन त्याला शास्तीमध्ये त्याला आपण आणावं ज्याच्याकरिता टॅक्स आणि कारवाई हे दोन्ही वेगळे इश्यु आहेत आपल्याला त्या बिल्डींग सिल करायची आहेत. ती दुकान तोडायचा हा वेगळा भाग झाला पण एखादा कर आकारणी ज्यावेळी आपण करतो तर तो एक रेसिडेन्स कमर्शिअल झाला आणि तो नगररचनेमधून नियमाप्रमाणे बदल करुन घेत नाही जिथपर्यंत तो कमर्शियल करावा पण शास्तीसकट करावे.

मा. महापौर :-

भगवतीजी अगर एन.ओ.सी. नही है तो पहिले कारवाई की अनुमती दी है उन्होंने की अपने ठराव में यह रखा है की, अनुमती लिजीए की कारवाई किजीए। उनपे कारवाई की जाएगी लेकिन जबतक कारवाई नही होगी तब तक उसपे दंड तो वसुला जाए की नही।

भगवती शर्मा :-

मैं उसके खिलाफ नही हूँ, रेव्हेन्यु किसी भी तरीके से हो पर नियम के अंदर में किया जाए यह ठराव आप कर लिजीए लेकिन उसकी अंमलबजावणी भी होनी चाहिए। लेकिन अंमलबजावणी नही होगी तो मतलब क्या होगा।

जुबेर इनामदार :-

मेहता साहब शास्तीचा विषय आला तर मग २६७ ''अ'' खाली शास्ती लागली एका इमारतीमध्ये एक अनधिकृत कमर्शियलला शास्ती लावली त्याचा अर्थ पूर्ण इमारत त्याच्यामध्ये आली म्हणजे तुम्हाला पूर्ण इमारतीला शास्ती लावावी लागेल.

नरेंद्र मेहता :-

मागच्या ठरावामध्ये हे म्हटलेलं आहे की एखाद्या इमारतीला कर आकारणी झाली किंवा ओ.सी. झाली त्यानंतर त्याबदल काही जेवढ झालं तेवढच लावावं हे मागच्या ठरावामध्ये सुध्दा मांडलेले आहे आता साहेब आमच म्हणणे आहे की टॅक्सचे कलेक्शन, टॅक्स प्रणाली वेगळी आहे इललिगल बांधकामाची वेगळी आहे आपल्याला तो दुकान सिल करायचे आहे हॉस्पीटल सिल करायचं आहे. पण बी प्रॅक्टीकल आज आपली महापौर मी सर्व लोकांना विचारतो त्यांनी मानसिकता आहे का ह्या शहरातली सर्व रेसिडेन्शल दुकान बंद करु शकता ह्या शहरातली सर्व रेसिडेन्सली हॉस्पीटल आपण बंद करु शकतो. अशा अनेक बाबी आहेत ते प्रॅक्टीकली होऊ शकत का तरी प्रशासनाने आपल्या स्तरावर तो निर्णय घ्यावा. परंतु रेव्हेन्युच्या बाबतीत त्यांनी हे बदल केले अनधिकृत केले त्यासाठी कमीत कमी शास्तीखाली आला पाहिजे. आणि तो रेसिडेन्स म्हणून कर आकारणी करतो २०० रु., ५०० रु. त्याने ते कमर्शियल भरायला पाहिजेत बाजुवाला कमर्शियल पैसे भरतो आणि त्यासाठी ते शास्तीखाली आला पाहिजे.

जुबेर इनामदार :-

शास्ती लावली तर ती पूर्ण इमारतीला परत लागणार नाही याच स्पष्टीकरण काय प्रशासनाने करावं.

नरेंद्र मेहता :-

नाही होणार त्याच्यात बदल झाला आहे.

जुबेर इनामदार :-

साहेब इथे तोच विषय चाललेला आहे भोगवटा दाखला आणि फक्त सी.सी. अशा कितीतरी मालमत्ता असतील फक्त सी.सी. प्रशासनाने हा विषय स्पष्ट करावा.

मॉरस रॉड्रीक्स :-

जाहिरात करायला सांगतो पब्लिकने टॅक्स भरु नये ज्यांना पाणी प्यायला, बिल्डींगला सांगितल नाही त्यांनी टॅक्स भरु नये. मुंबईला सर्व बिल्डींगला टॅक्स, पाणी मिळत पण टॅक्स भरतात इथे असं का नाही. मी दरवर्षी ठोकून सांगतो टॅक्स भरु नये आणि आज पण सांगतो कोणी टॅक्स भरु नये. ओ.सी. वाल्या बिल्डींगला पाणी देण भाग आहे आपल्याला. आज त्यांना १० बादल्या मिळत आहेत त्यांना एक बादली मिळाली तरी चालेल. पण पाणीच कनेक्शन देण जरुरी आहे.

मिरादेवी यादव :-

महापौर मॅडम, दो घंटे से यह जो टॅक्स पावती के लिए विषय चल रहा है, अभी तक बिल्डींग का भी चल रहा है। शायद यह शहर के अंदर बहुत सारा सल्म एरिया है, उनकी भी दिक्कत है की जो टॅक्स बनाया हुआ है स्लम एरिया का वह दुसरे को बेचा है वह ट्रान्सफर नही हो रहा है। उसके लिए भी ध्यान दिया जाए और बिल्डींग का ओ.सी., सी.सी. दिया जा रहा है। मॅडम उनके लिए स्लम एरिया में कोई परमिशन नही दिया जा रहा है। कोई उनको जगह नही दिया जा रहा है उनके लिए भी कुछ सुविधा किया जाए की वह भी वहाँ के रहिवासी है शहर के उनके लिए जो टॅक्स पावती बन रही है वह नही बन रही है। वह अधिकारी दो तीन दिन से लगाए हुए है उनको कन्फर्म करो की उनके लिए २-३ दिन है। यह बात भुलाने का काम यह लोग करते है और पुरे शहर के अंदर जितना स्लम एरिया है बहुत ऐसे सारे टॅक्स नही है की जो मिरा भाईंदर का जो अभी वसुल किया उससे जादा यह शहर में स्लम एरिया में मेरा यह कहना है की उनका भी टॅक्स लगाया जाए। उनको हम सारी सुविधाए हम दे रहे है उनसे भी वह वसुल किया जाए।

वंदना चक्रे :-

महापौर मॅडम माझा असा प्रश्न आहे की, आता टॅक्स वरती जी बिल्डींगमध्ये ओ.सी. मिळालेली आहे सी.सी. ओ.सी. मिळालेली आहे. त्याच्यामध्ये जर समजा फ्लॅट आहेत फ्लॅटचे दुकाने केली तर त्याच्यावरती टॅक्स लागणार आहे का? बदल करु शकतात का? तो माझा प्रश्न आहे.

मा. महापौर :-

बदल त्यांनी नियमानुसार त्यांच्या सोसायटीचे एन.ओ.सी. हे सगळ त्यांचे कडून कमर्शियल परवानगी टाऊन प्लानिंगकडे तस.............

प्रमोद सामंत :-

मेहता साहेबांनी ठराव केला की आयुक्तांनी सर्वेक्षण करुन मालमत्तेची भगवती साहेबांनी सांगितल १५/०५, १३/०५ ला ठराव केलेला की, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांचे रिव्हीजन कराव आणि ८ करोडचं प्रोव्हिजन आपण बजेटमध्ये केलेलं आहे आणि ज्या आढावा बैठकीत आपण तसा ठराव पण केला पण त्यांनी काही तस स्पष्टीकरण दिलं नाही.

मा. महापौर :-

मला वाटतं तुम्ही आयुक्तांना दिलं.

प्रमोद सामंत :-

नाही दिलं सर्वेक्षण ८ करोडची तरतूद काय दिलं उत्तर.

मा. महापौर :-

वह किया ही नही अभी तक, वही इन्होंने बोला लेकिन आपने नही सुना।

प्रमोद सामंत :-

आमच्या म्हाडाच्या १३ बिल्डींगला पण टॅक्स नाही लावला गेल्या २-३ वर्षापासून ते लोकं इकडे येतात टॅक्स लावायला सांगतात. आपण त्यांना लावत नाही. आपल्याकडे येऊन वारंवार त्यांची इथे फेरी होते की टॅक्स आमच्या इमारतीला लावा आपण ते करत नाही.

मा. महापौर :-

ठराव क्या किया, जिसको नही लगाया उसको लगाया जाए। म्हाडा को नही लगाया तो वह इसमे आएगा।

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, आम्हाला ठरावाच्या बाजुनेच बोलायचे आहे. आमचा प्रश्न तोच आहे जसा ठराव केला ज्या जागेला स्वतःहून नाही लावला तर त्यांच्यावरती शास्ती लावता येईल आता शास्ती तुम्ही कुठल्यातरी कमर्शियल इस्टॅब्लीशमध्ये त्यांनी नगररचनेची परवानगी घेतलेली नाही आणि अशा कितीतरी ज्यांनी नगरपालिकेची परवानगी घेतली नसेलच ८० टक्के असे आहेत त्यांना वाणिज्य रहिवाशी म्हणून वाणिज्यावर गेलेले आहेत. अशा मालमत्तांना ज्यांनी तुम्हाला नगररचना विभाग तुम्हाला सुचित करेल किंवा तुम्ही त्यांच्याकडून मागविणार सुचना की यांनी परवानगी घेतली होती की नाही. त्यांनी तुम्हाला सुचना

दिली की त्यांनी परवानगी घेतलेली नाही. ते अनधिकृत झाल त्याच्यावर तुम्ही शास्ती लावली आणि एकदा त्याच्यावरती शास्ती लावली याचा अर्थ पूर्ण मालमत्ता, पूर्ण इमारत याच्यावर शास्ती लागेल. कारण धोकरणच तस आहे.

मा. महापौर :-

जुबेरजी शायद आप उसको फिर ऐसे ले रहे है अभी क्लिअर हुआ की, ओ.सी. के बाद जो भी उसका चेंज हुआ है। उसपे हम सिर्फ जो चेंज हुआ है उस पर हम लगा रहे है।

जुबेर इनामदार :-

ऐसी कितनी इमारत है जिसने मिरा भाईंदर में ओ.सी. लिया है २० टक्के, ८० टक्के आज भी नही है। ८० टक्के आज भी नही है क्या उन इमारतो पे आप लगोओगे यही तो हमारा प्रश्न है।

नरेंद्र मेहता :-

साहेब मी परत सांगतो ज्या बिल्डींगला ओ.सी. लागली असेल किंवा कर आकारणी झालेली असेल आणि त्यानंतर काही बदल झाला तर ते तेवढच पुरता दुकान असेल किंवा एखादा गाळा असेल किंवा एखादा असतील तेवढ्याच पुरता आहे ज्याला कर आकारणी पूर्वी झालेली आहे किंवा ओ.सी. झालेली आहे त्यांना ८० टक्के ..........

जुबेर इनामदार :-

म्हणजे नगररचनेने एखादा प्लान मंजूर करुन दिला ओ.सी. घेतली त्याच्यानंतर ४ माळा अजून वरती बांधतो त्याला काही फरक पडणार नाही. हा विषय झाला तो म्हणजे आपण कायद्यावर बोट कुठेच ठेवत नाही.

भगवती शर्मा :-

यह क्या कर रहे है राज्य सरकार का उद्देश जैसा है उसके अंदर में वह लिगली, इललिगली का......

नरेंद्र मेहता :-

उन्होंने पहले भी कहाँ की, ओ.सी. के बाद अगर कुछ हुआ रहेगा तो उतनाही पार्ट उन्होंने कहाँ। प्रशांत साहबने कहाँ की, ओ.सी. नंतर एखाद्याने वाढीव केलं असेल तर ते सर्व इललिगल आहे. पूर्ण बिल्डींग काही इललिगल ठरत नाही.

जुबेर इनामदार :-

साहेब अशी तरतूद कुठे आहे.

वंदना चक्रे :-

ओ.सी. मिळाल्याच्या आधी जर झालेल असेल तर त्याच्यावरती काय आहे.

मा. महापौर :-

चक्रे मॅडम बसुन जा आयुक्त साहेब जवाब देत आहेत.

मा. आयुक्त :-

आपण जे काही ह्या विषयावर बोलतो आता बऱ्याचशा म्हणजे जे मालमत्ता अद्यापही टॅक्स लागलेला नाही किंवा अनधिकृत आहेत असे समजून त्याच्यावर शास्ती लावण्यात आलेली आहे. ह्या सगळ्या इश्यूवर म्हणजे एक सोल्युशन आहे. सर्व कस सोल्युशन काढायचं अशा प्रकारचे नियोजन आपल्या प्रशासनामार्फत करण्यात येत आहे. हे सगळे इश्यू बहुतेक सगळे सॉल्व्ह होतील असे मला वाटत आहे कारण खुप वेळेपासून मी सर्व ऐकतो आहे. सर्व सन्मा. सदस्यांनी अत्यंत चांगले मुद्दे मांडलेले आहेत आणि जे प्रशासनाने नोंद केलेली आहे आणि ऑलरेडी त्याच्यावर म्हणजे प्रोसेस चालु आहे आपल्याकडे ३ लाख ५० हजार मालमत्ता आहे त्याच्यावर टॅक्स लागलेला आहे. परंतु अशा अनेक मालमत्ता आहेत ज्याच्यावर टॅक्स लागलेला नाही उदा. झोपडपट्टी एरियामध्ये सुध्दा आणखीन टॅक्सेशन नाही आहे. त्याच्याबरोबर आणखीन मोठ्या-मोठ्या बिल्डींगमध्ये सुध्दा टॅक्सेशन लागलेले नाही. अस ह्या ड्रायुमध्ये माझ्या लक्षात आलेले आहे. ह्या ड्रायुमध्ये लक्षात आल्यानंतर म्हणजे काही ठिकाणी आम्ही टॅक्स लावला आणि त्याची वसुली सुध्दा केली परंतु एक सर्वकश हे करण्यासाठी आपल्याला सविस्तर सर्व्हे करावा लागेल जो आता तुम्ही मगाशी तुमच्याही भाषणामध्ये मांडल की, याच्यामध्ये तरतूद केलेली होती. आता या इश्युमध्ये दोन पायलट म्हणजे सर्व्हे केलेले आहेत आम्ही प्रशासनाने पायलट सर्व्हेमध्ये काय आमचा हातात येते ते आम्ही बघणार आहोत आणि त्याच्यामधून आम्ही एक पॉलिसी ठरवू आणि त्याच्यानंतर एक टेंडर काढू किंवा एक एक्सप्रेशन ऑफ इंट्रेस काढू आणि एक एजन्सी आपण निश्चित करु की ज्याच्यामध्ये ए टू बी पर्यंत म्हणजे एक लाईन जर अशी घेतली त्या सर्वेची आणि तिथे पूर्ण रस्ता आहे. इकडण रस्ता आहे,कम्पीट त्याचा १०० टक्के सर्वे करून मालमत्ता जर लागलेली असतील टॅक्स लागलेला असेल तर ते बरोबर आहे का टॅक्स लागलेला नसेल तर तो टॅक्स आपल्याला लावावा. लागेल म्हणजे त्याची आता मेजरमेंट घ्यायची आहे. तर ती मेजरमेंट सुध्दा म्हणजे त्याठिकाणी असा नविन टेप आलेला आहे. इलेक्ट्रोनिक टेप तो जो सेन्सर टेप आहे तो सेन्सर टेप पटकण मोजतो त्याचा जो मंजूर प्लॅन आहे. त्याने ॲक्चूअल किती बांधकाम केलेले आहे. रेसिडेन्शीयल आहे. काही कर्मशिसल त्याचा वापर केलेला आहे. ह्या सगळ्या गोष्टी त्याच्यामध्ये अवगत होणार आहे.

किंवा आपल्याला माहिती होणार आहे. आणि म्हणून माझी अशी सगळ्या सभागृहाला विनंती आहे की, हे दोन जे ठराव आहेत तर ते दोन ठराव प्रशासनाने मांडलेले आहेत तर त्याच्या अनुषंगाने आम्ही प्रयत्न करतो की, एक सवलत द्यायची लोकांना सांगायचे आणि एवढे सांगितल्यावर सुध्दा हे लोक टॅक्सेशन मध्ये जर का स्वतःहून आले नाहीत तर मात्र आपल्याला ह्याठिकाणी त्यांच्यावर प्रशासकीय शुल्क आकारून किंवा त्याच्यामध्ये दंड करून त्यांना आणि ह्या गोष्टी ज्या आहेत त्या मागच्या सहा वर्षापासून आपल्याला पूर्ण घ्यावे लागतील समजा कमर्शियल बांधकाम आहे. त्याठिकाणी वापर सुरू आहे. सहा वर्षापासून टॅक्स लावला नाही मग आपल्याला हे लक्षात येईल सर्वेमध्ये म्हणून अशाप्रकारचा आपण टॅक्सेशन करणार आहोत. ह्या सर्व गोष्टीला थोडासा विलंब लागणार आहे. ८ते १५ वर्षाच्या आत दरम्यानची ही गोष्ट ह्या ८ ते १० महिन्यामध्ये सॉल्व्ह होण हे काही शक्य नाही परंतु याला वेळ लागेल म्हणजे एखाद्या महिण्यामध्ये मिशन मोर्ड वर करण्यासाठी आपण प्रयत्न करू परंतु हे कॉम्पलीकेटेड केसेस असल्यामुळे याठिकाणी निर्णय प्रकियेमध्ये खूप विलंब लागतो आपल्या कडचा स्टाफ जो आहे तर तो स्टाफ आपल्याला विकास कामासाठी म्हणजे आता साधारणतः ऑगस्ट महिन्यामध्ये आपली इलेक्शन असेल तर त्याला ३-४ महिण्याअगोदर पर्यत म्हणजे आपल्याला मे महिण्यापर्यत आपल्याला ही कामे पूर्ण करावी लागतील मग आपण निर्णय घ्या की पुर्ण १०० टक्के स्टाफ हा ह्या वसुलीचा व टॅक्सेशन प्रकारामध्ये गुंतवायच्या का विकासाची कामे करून आपल्याला ते काम पूर्ण करायचा आहे कारण दोन्ही गोष्टी सॅमलटेनीसली होणार म्हणजे थोडस कठीण वाटतेय आणि म्हणून ही संपुर्ण प्रक्रिया आपण सॅमलटेनीसली सुरू करावी आता सध्या माझी प्रायोरिटी आहे. विकासाची कामे करणे आपल्याकडे हातामध्ये साधारणतः म्हणजे डिसेंबर,जानेवारी,फेब्रुवारी, मार्च एप्रिल ह्या ४-५ महिने जे येतात ते म्हणजे पावसाळयाच्या अगोदरचे तर ते खुप चांगले म्हणजे कामाचा स्पीड देण आणि विकास कामे करण्याची गरज आहे. अस माझे स्वतःचे मत आहे. सॅमलटेनीसली म्हणजे आपण हा टॅक्सेशन या इश्यु द्यायचा तो सुध्दा आपण हॅन्डल करू परंतू यालासुध्दा एक वेगळी यंत्रणा तयार करण एक एजन्सी नेमण त्याच्यावर सुध्दा आम्ही काम करणार आहोत म्हणजे ते एकदम बंद करणार असे नाही. परंतू या गोष्टीला थोडासा विलंब लागू शकतो म्हणून माझी अशी विनंती आहे की, सभागृहाने जे काही ठराव सबमीट केला आहे तर तो मंजुर करावा याच्या अनुषंगाने जो काही शास्ती लावण्याचा विषय आहे तर तो कायदेशीर तपासुन घेतला जाईल. जे कायदेशीर योग्य असेल तर केलं जाईल अन्यथा केल जाणार नाही याची ग्वाही मी सभागृहाला देतो.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ९४ :-

महानगरपालिका क्षेत्रातील ज्या मालमत्तांना कर आकारणी झालेली नाही तसेच ज्या मालमत्तांचा वापर अनिवासी चालु आहे, अशा मालमत्तांची नव्याने वापराप्रमाणे कर आकारणी करणे इत्यांदीसाठी अभय योजना लागु करणे.

ठराव क्र. ९५ :-

कर आकारणी न झालेल्या व वापरात बदल झालेल्या मालमत्तांची कर आकारणी करणेसाठी मालमत्ताधारक यांनी स्व्त: होउन पुढे येणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधन नियम 8 अन्वये मालमत्ताधारक यांनी माहिती देणे बंधनकारक आहे. परंतू अशी माहिती दिली जात नाही ही वस्तूस्थिती आहे. कर विभागातील उपलब्ध अधिकारी व कर्मचारी वर्ग विचारात घेता कर आकारणी न झालेल्या व वापरात बदल झालेल्या मालमत्तांची कर आकारणी करणेकामी ज्या मालमत्ताधारकांकडून माहिती कळविली जाईल. त्यांना कर आकारणी केल्या नंतर येणाऱ्या करपात्र रक्कमेच्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधन नियम 8(3) अन्वये 25 टक्के रक्कम प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणून आकारण्यात येणार नाही. परंतू ज्या मालमत्तादाराकडून अशी माहिती स्वत: न कळविल्यास प्रभाग समितीमधील कर निरीक्षक व विभागिय लिपीक यांनी जागा तपासून पाहणी करून त्याची कर आकारणी केल्यास अथवा मनपाचे वतीने सर्व्हेक्षण केल्यास त्यांना कर आकारणी करण्यात आलेल्या वार्षिक करपात्र रक्कमेच्या 25 टक्के रक्कम ही प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणून आकारुन कर आकारणी करणेबाबत अभय योजना जाहिर केल्यास कर आकारणी न झालेल्या व वापरात बदल झालेल्या मालमत्ता, कर आकारणीच्या जाळ्यात येतील व महानगरपालिकेचे उत्पन्न् वाढेल.

वरील बाब विचारात घेऊन कर आकारणी न झालेल्या व वापरात बदल झालेल्या मालमत्तांची कर आकारणी करणेसाठी खालील प्रमाणे अभय योजना जाहीर करणेस प्रस्ताव सादर करीत आहे.

5) कर आकारणी न झालेल्या सर्व मालमत्तांची कर आकारणी करणे साठी मालमत्ताधारक यांनी स्वत: अभय योजनेच्या कालावधीत म्हणजेच दि. 15/12/016 ते दि. 14/02/2017 अखेर अर्ज केल्यास (Self Declaration) त्यांना त्यांचे मालमत्तेची अधिनियमातील तरतुदीनुसार करपात्र रक्कम निश्चित करुन कर आकारणी करणेत येईल, यामध्ये ज्या मलामतत्ता धारकांनी करावी आकारणी

केलेली नाही अशा मालमत्ता धारकांना कराची आकारणी मालमत्तेच्या वापरापासून किंवा जास्तीत जास्त 6 वर्ष मागे जावून कराची आकारणी करण्यात यावी. यामध्ये प्रशासनाने दंड व व्याज आकारु नये. जे मालमत्ताधारक दि. 14/02/2017 नंतर मालमत्ता कराची आकारणी करतील त्यांना दंड व व्याज वार्षिक करपात्र रक्कमेच्या 25 % रक्कम ही प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणुन आकारुन कर आकारणी करण्यात यावी तसेच सदर मालमत्ता धारकांना योजना कालावधीतच दि.12/02/2017 पुर्वीच सदर रक्कमेचा भरणा करावा लागेल अन्यथा सदर मालमत्ता धारकाच्या पुढील आर्थिक वर्षाचे देयकात वार्षिक करपात्र रक्कमेच्या 25 टक्के रक्कम प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणुन एक वेळेत आकारण्यात येईल.

6) वापरात बदल झालेल्या व भाड्याने दिलेल्या मालमत्ता अशा सर्व मालमत्तांची कर आकारणी करणे साठी मालमत्ताधारक यांनी स्वत: अभय योजनेच्या कालावधीत म्हणजेच दि. 12/12/016 ते दि. 14/02/2017 अखेर अर्ज केल्यास (Self Declaration) त्यांना त्यांचे मालमत्तेची अधिनियमातील तरतुदीनुसार करपात्र रक्कम निश्चित करुन कर आकारणी करणेत येईल यामध्ये ज्या मालमत्ता धारकांनी कराची आकारणी केलेली नाही अशा माजमत्ता धारकांना कराची आकारणी मालमत्तेच्या वापरापासून किंवा जास्तीत जास्त 6 वर्ष मागे जावून काराची आकारणी करण्यात यावी. यामध्ये यामध्ये प्रशासनाने दंड व व्याज आकारु नये. प्रस्तुत बाबत वार्षिक करपात्र रक्कमेच्या 25 टक्के ही प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणुन एक वेळेत आकारणी करणे असल्याने वरीलप्रमाणे शुल्काची आकारणीस मंजूरी आहे.

7) प्रस्तूत बाबत वार्षिक करपात्र रक्कमेच्या 25 टक्के ही प्रशासकीय/विलंब शुल्क म्हणुन एक वेळ आकारणी करणे असल्याने वरीलप्रमाणे शुल्काची आकारणीस मंजूरी आहे.

8) महानगरपालिका क्षेत्रामध्ये ग्रामपंचायत व नगरपालिकेपासून कराची आकारणी झालेली आहे. कर आकरणी करताना एकाच इमारतीमधील सदनिका धारकांना समान कर आकारणी होणे आवश्यक होते. परंतु काही सदनिकांना समान दराने कर आकारणी झालेली नव्हती. तरी एकाच इमारतीमध्ये राहिलेल्या सदनिका धारकांना त्याच इमारतीधील भाडेमुल्य दराप्रमाणे समान कर आकारणी सुधारीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. समान कर आकारणी प्रकरणामध्ये कर विभागाने स्वतंत्रपणे प्रकरणनिहाय अहवाल तयार करुन सदर कर आकारणीची प्रकरणे मा. आयुक्त यांना सादर करावीत व प्रकरणावर आयुक्तांनी निर्णय घेण्यास हि सभा मान्यता देत आहे.

वरीलप्रमाणे कर आकरणी न झालेल्या व वापरात बदल झालेल्या मिळकतीची कर आकरणी करणेसाठी अभय योजनेस (ॲम्नेस्टी स्कीम) महासभेची मंजूरी आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. ९५, दहिसर पर्यत येणाऱ्या मेट्रो रेल्वेचा विस्तार भाईंदर पर्यंत करणेबाबत.**

**प्रशांत केळुसकर :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचे नागरीकरण वेगाने होत आहे. शहर मुंबई व ठाणे शहरालगत असून सदर दोन्ही शहरांना जोडण्यासाठी मेट्रो रेल्वेचे प्रकल्प मंजुर करण्यात आलेले आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पश्चिम बाजूस दहिसर लिंक रोड व पूर्व बाजूस राष्ट्रीय महामार्ग क्र.८ दहिसर पर्यंत मेट्रो चे काम सुरु झाले आहे. तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्रात कासार वडवली पर्यंत मेट्रो प्रकल्प मंजुर आहे.**

**मिरा भाईंदर शहरापर्यंत मेट्रो रेल सेवा सुरु व्हावी याबाबत शहरातील आमदार मा. श्री. नरेंद्रजी एल. मेहता, मा. श्री. प्रतापजी सरनाईक, शहरातील नागरीक, लोकप्रतिनिधी व विविध संस्थांनी शासनाकडे कळकळीची मागणी होती. सदर मागणीचा मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी सन्मानपूर्वक दखल घेवून अंधेरी ते दहिसर पर्यंत सुरु असलेली मेट्रो रेल सेवा मिरा भाईंदर पर्यंत विस्तार करण्याचा निर्णय घेवून विकास प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करण्यास मान्यता दिली आहे याबाबत आम्ही मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अभिनंदन व्यक्त करीत आहोत.**

सदर मेट्रो रेल्वेचा मार्ग दहिसर-दहिसर चेकनाका-काशिमिरा-गोल्डन नेस्ट सर्कल-नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान-भाईंदर (प.) मिरारोड ते दहिसर लिंक रोड- दहिसर (प.) या मार्गापर्यंत विस्तार करणेबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास याबाबत महापालिकेने नाहरकत प्रमाणपत्र सादर करुन कळविण्यास हि सभा मंजुरी देत आहे.

ठरावाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे :-

तसेच दुसऱ्या टप्प्यात सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा काशिमिरा ते कासारवडवली या मार्गापर्यंत विस्तार करुन ठाणे शहरास जोडण्यात यावा यासाठी महानगरपालिकेचे मागणी पत्र व नाहरकत प्रमाणपत्र मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देण्यात यावे अशी मी सुचना मांडत आहे.

सुनिला शर्मा :-

माझे अनुमोदन आहे.

वंदना चक्रे :-

माझी याला सहमती आहे आणि आम्ही ऑफिशियल आपल्याला पत्र दिलेल आहे आयुक्त महोदयांना पत्र दिलेलं होत मिरा भाईंदर शहरामध्ये मेट्रो यावं ठाण्यामध्ये आली, दहिसरपर्यंत आली यावं म्हणून आमची मागणी होती तर ते आज ठराव झाला त्या ठरावाला माझे सहमत आहे.

आसिफ शेख :-

आजच्या महासभेमध्ये आपण मिरा भाईंदर शहरामध्ये मेट्रो रेल्वे संदर्भात जो प्रस्ताव आणलेला आहे त्याबद्दल मी सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. महापौर मॅडम आपले ह्या ठिकाणी अभिनंदन करतो त्याचप्रमाणे राज्याचे मुख्यमंत्री यांचे ही याठिकाणी अभिनंदन करतो. मिरा भाईंदर शहरामध्ये मेट्रो रेल्वे सुरु व्हावी यासाठी नागरिक अधिकारी मंच मिरा भाईंदर यांनी वारंवार तगादा लावला. शहरामध्ये वेगळ्या पध्दतीने त्यांनी आंदोलने केली आणि जेव्हा सर्व लोक याठिकाणी मेट्रोसाठी आंदोलन करत होती त्या प्रत्येक लोकप्रतिनिधीला आमदारापासून महापौर नगरसेवक सर्व संघाना त्यांनी भेटलेली आहेत. जेव्हा ते आम्हास भेटण्यात आले होते त्यावेळी आम्ही मा. आयुक्तांना, मा. महापौराना पत्र दिल होते ०७/१०/२०१६ रोजी की मिरा भाईंदर शहरातील सर्व सामान्य जनतेची रोजच्या वाहतूकीचा कोंडीपासून व रेल्वे प्रवासाच्या मरण यात्रेपासून सुटका करण्यासाठी मेट्रो रेल्वे व रोप हे प्रकल्प मिरा भाईदरमध्ये सुध्दा करण्यासाबाबत या संदर्भात आम्ही पत्र दिल होत की उपरोक्त संदर्भिय विषयाबद्दल आपल्या निदर्शनास आणु इच्छितो की १६ लाख मिरा भाईदर शहर वासियाकरिता रेल्वेने प्रवास करण्याच्या प्रवाशांच्या अडीअडचणी व समस्यांचे निवारण करण्याकरिता व वेळेची बचत करण्याकरिता मेट्रो रेल्वेची अंत्यत आवश्यकता आहे. मिरा भाईंदर शहरातील लाखो प्रवाशांना दररोज जीव मूठीत घेऊन व मरण यात्रा सहन करून जनावराप्रमाणे प्रवास करावा लागत आहे. प्रवाशांच्या या जाचातुन मुक्त करुन दिलासा देण्याकरिता एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून दहिसरपर्यंत होणाऱ्या मेट्रोल रेल्वे प्रकल्पास भाईंदर पर्यंत विस्तारीत करण्यासाठी तातडीने उचीत कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच रेल्वे व मेट्रोच्या प्रवाशाला आणखी एक पर्याय म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने जो रोप वे चा प्रकल्प उभारण्याचे काम हाती घेतलेले आहे त्यामध्ये बोरीवली ते ठाणे दरम्यानचा मार्ग असून त्यात मिरा भाईंदर शहराचा समावेश केल्यास, मिरा भाईंदरच्या नागरिकांना आणखी एक सोयीचा प्रवास होण्यास मदत होईल त्यामुळे बोरीवली ते ठाणे दरम्यानच्या मार्गावर होणारा रोपवेचा प्रकल्प मिरारोड व भाईंदर पर्यंत विस्तारीत करण्याबाबत देखील आवश्यक ती कारवाई सुरु करणे आवश्यक आहे तरी आपण मिरा भाईंदर शहरातील सर्व सामान्य जनतेची रोजच्या वाहतुकीच्या कोंडीपासून व रेल्वेचा प्रवाशाच्या मरण यात्रेपासून सुटका करण्यासाठी दहिसरपर्यंत येणाऱ्या मेट्रो रेल्वे प्रकल्पात मिरारोड भाईंदर पर्यंत विस्तारीत करुन मेट्रो रेल्वे सुरु करणे करिता तसेच बोरीवली ते ठाणे रोपवे प्रकल्प मिरारोड भाईंदर मध्ये आणण्यासाठी देखील प्रशासनाच्या वतीने नागरिकांच्या हिताचा दृष्टीकोन आवश्यक ती कारवाई करण्यात यावी तसेच सदरचा प्रस्ताव आपल्याकडे दिला होता त्याचप्रमाणे आम्ही एम.एम.आर.डी.ए. चे आयुक्त मदान साहेब त्याचप्रमाणे अतिरिक्त आयुक्त धळाळे साहेब यंनाही दिला होता. ह्या संदर्भात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी आम्हाला ८ नोव्हेंबर २०१६ रोजी पत्राने कळविलेले आहे की, मिरा भाईंदर शहरातील सर्व सामान्य जनतेची रोजच्या वाहतुकीच्या कोंडीपासून रेल्वे प्रवासाच्या मरण यात्रेपासून सुटका करण्यासाठी मेट्रो रेल्वे व रोप वे प्रकल्प मिरा भाईंदरमध्ये सुरु करण्याबाबत संदर्भ आपले पत्र क्र. मनपा/प्र.स.क्र. १/१५९/२०१६-१७ दि. ७/१०/२०१६ महोदय, उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, दि. १९ ऑक्टोबर २०१६ रोजी झालेला प्राधिकरणाचा १४१ च्या बैठकीत मा. मुख्यमंत्री यांनी दहिसर पर्यंत आलेला मेट्रो मार्ग मिरा भाईंदर पर्यंत वाढविण्यात यावा तसेच मेट्रो मार्ग के विस्तार करण्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल लवकरात लवकर तयार करण्यात यावा असे निर्देश दिलेले आहेत सदर निर्देशच्या अनुषंगाने उपरोक्त मेट्रो मार्गाकरिता प्राधिकरणाने सल्लागार नियुक्तीचे काम हाती घेतले असून..............

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम हे ठराव वाचत आहेत की एम.एम.आर.डी.ने दिलेले पत्र वाचत आहेत. आमच्याकडे पण पत्र आहेत मॅडम आम्ही सगळे सन्मा. नगरसेवक म्हणून इथे मागणी केलेली आहे. जसे एम.एम.आर.डी.ए. ने आम्हाला पत्र पाठविलेले आहेत आम्ही सगळे पत्र वाचून रेकॉर्डवर आणायचे का? सभागृह मान्यता देत आहे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ९५ :-

दहिसर पर्यत येणाऱ्या मेट्रो रेल्वेचा विस्तार भाईंदर पर्यंत करणेबाबत.

ठराव क्र. ९६ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचे नागरीकरण वेगाने होत आहे. शहर मुंबई व ठाणे शहरालगत असून सदर दोन्ही शहरांना जोडण्यासाठी मेट्रो रेल्वेचे प्रकल्प मंजुर करण्यात आलेले आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पश्चिम बाजूस दहिसर लिंक रोड व पूर्व बाजूस राष्ट्रीय महामार्ग क्र.८ दहिसर पर्यंत मेट्रो चे काम सुरु झाले आहे. तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्रात कासार वडवली पर्यंत मेट्रो प्रकल्प मंजुर आहे.

मिरा भाईंदर शहरापर्यंत मेट्रो रेल सेवा सुरु व्हावी याबाबत शहरातील आमदार मा. श्री. नरेंद्रजी एल. मेहता, मा. श्री. प्रतापजी सरनाईक, शहरातील नागरीक, लोकप्रतिनिधी व विविध संस्थांनी शासनाकडे कळकळीची मागणी होती. सदर मागणीचा मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी सन्मानपूर्वक दखल घेवून अंधेरी ते दहिसर पर्यंत सुरु असलेली मेट्रो रेल सेवा मिरा भाईंदर पर्यंत विस्तार करण्याचा निर्णय घेवून विकास प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करण्यास मान्यता दिली आहे याबाबत आम्ही मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अभिनंदन व्यक्त करीत आहोत.

सदर मेट्रो रेल्वेचा मार्ग दहिसर-दहिसर चेकनाका-काशिमिरा-गोल्डन नेस्ट सर्कल-नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान-भाईंदर (प.) मिरारोड ते दहिसर लिंक रोड- दहिसर (प.) या मार्गापर्यंत विस्तार करणेबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास याबाबत महापालिकेने नाहरकत प्रमाणपत्र सादर करुन कळविण्यास हि सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदक :- श्रीम. सुनिला शर्मा

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

(सभागृहात गोंधळ)

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ९६, रस्ते, चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

नरेंद्र मेहता :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्ते, चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याकरीता सन्मानीय नगरसेवक/नगरसेविका यांना पत्र देऊन प्रस्ताव मागविण्यास आले होते. त्यांच्याकडुन प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. यापुर्वी झालेले नामकरण वगळात खालील प्रस्ताव सादर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र. ४५ महाजनवाडी, पेणकरपाडा येथील रॉयल कॉलेज ते एम.आय.डी.सी. डेल्टा संकुल येथील चौक | छत्रपती शिवाजी महाराज चौक |
| २ | मिरा रोड (पूर्व) प्रभाग क्र. ४५ पांडुरंग वाडी ते पेणकरपाडा या डी. पी. रस्त्यावरील कक्कड पॅराडाईज संकुल जवळील चौक | कै. पद्माकर मन्या म्हात्रे चौक |
| ३ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २८ मधील मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शॉपिंग सेंटर वरील सभागृहास | स्व. जर्नादन नारायण रकवी सभागृह |
| ४ | मिरा रोड (पूर्व) शांती पार्क हैप्पी होम अपार्टमेंट क्र. ०१ व ०२ चे मागील बाजूस असलेले उद्यान | गुरु गोबिंद सिंगजी उद्यान |
| ५ | भाईंदर (प.) मोर्वा गावातील व्यायाम शाळा | स्व. मनोहर हरिश्चंद्र पाटील व्यायामशाळा |
| ६ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १७ मधील मथुरा सदन, मथुरा धाम ते मथुरा कुंज रस्ता | कै. मथुराबाई केशव पाटील मार्ग |
| ७ | भाईंदर (पूर्व) स्टेशन समोरील चौक | हुतात्मा चौक |
| ८ | मिरा रोड प्रभाग क्र. ५ या परिसरात धरती कॉम्पलेक्स नर्मदा पॅराडाईज या इमारतीमधील चौक | गणेश मंदिर चौक |
| ९ | मिरा रोड प्रभाग क्र. ५ मध्ये आर. के. इन या हॉटेलकडे जाणारा रस्ता | श्रीमती नर्मदा महादेव कदम मार्ग |
| १० | मिरा रोड (पूर्व) रामदेव पार्क येथील शाखा क्र. ३१ जवळील चौक | सावित्रीबाई फुले चौक |

| | | |
|---|---|---|
| ११ | मिरा रोड (पुर्व) प्रभाग क्र. ३१ दिपक हॉस्पीटल लेन, सेवन स्वेक्अर शाळेच्या बाजूचा रस्ता | परमपुज्य श्री. माताजी निर्मला देवी मार्ग |
| १२ | मिरा रोड (पुर्व) प्रभाग क्र. ३१ बाळासाहेब ठाकरे मैदान जवळील एस.के.इंग्लीश हार्ड स्कुल व दुर्गा रेसिडेन्सी सरवाल चौक | प. पु. माधव सदाशिव गोळवलकर (गुरुजी) चौक |
| १३ | भाईंदर (प.) राधेश्याम रेसिडेन्सी ते दर्शना हाईटस परिसराचा रस्ता | श्री रामप्रसाद अग्रवाल (कंदोई) मार्ग |
| १४ | मिरारोड (पुर्व) सेक्टर क्र. ६ येथील कम्युनिटी हॉल | गुरू भगवंत आचार्य रती लालजी महाराज साहेब सभागृह |
| १५ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ एम.आय.डी.सी. चौक | अशोक सिंघल चौक |
| १६ | छत्रपती शिवाजी मार्गापासुन विनय नगर, पुजा पार्क, सिल्वर सरिता कॉम्पलेक्स कडुन जाणारा रस्ता | गावदेव विठ्ठल मंदिर मार्ग |
| १७ | भाईंदर (पुर्व) संजोली गोल्ड ते श्रीराम मंदिर (गोल्डन नेस्ट रस्ता) | स्वातंत्र्य सैनिक स्व. रावजी कदम मार्ग |
| १८ | मिरारोड (पुर्व) सिल्वर क्राऊन बिल्डिंगला चौक | धर्मवीर आनंद दिघे चौक |
| १९ | मिरारोड (पुर्व) संघवी नगर या खेळाचे मैदान (आरक्षण क्र. ३२८, शाळा व खेळाचे मैदान) | सरदार वल्लभभाई पटेल मैदान |
| २० | मिरारोड (पुर्व) अमर प्लाझा हॉल समोर ओम वसुंधरा, निल वसुंधरा या सर्कल | गुरु गौतम स्वामी चौक |
| २१ | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.३० लोधा कॉम्पलेक्स येथील सर्कल | हजरत टिपु सुलतान चौक |
| २२ | भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र. २४२ उद्यान | श्री. जगवल्लभ सुरीश्वरजी महाराज उद्यान |
| २३ | राई मंदिर तलावाच्या टिकाणी नविन बांधलेले डेक (Viewing Gallery) | प. पु. पार्वतीमाता वैजनाथ महाराज डेक |

वरील नामकरण प्रस्तावांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' मधील प्रकरण ११ (२) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

वर्षा भानुशाली :-

माझे अनुमोदन आहे.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम, पिछली बार रस्ते नामकरण शो के समय के अंदर में यहाँ पे बैठ के सभागृह में फैसला हुआ था की एक नाम कही दे दिया गया तो दुबारा उसका नाम नही दिया जाएगा।

मा. महापौर :-

अभी भी वही मंजूर है।

भगवती शर्मा :-

अभी आपने इसमें क्या किया है ४ नंबर ४ नंबर का क्या मतलब है। आपने यह बाकीके नाम है, जैसे की १४ नंबर, १५,१६ नंबर इसका उल्लेख नही किया है। आपने हमको पता नही चलता आप क्या बोल रहे हो, महापौर मॅडम, इनको बोलिए नामकरण का प्रस्ताव है या तो यह शांती से पढे या सचिव साहब ताकी पता चले हर सदस्य में अपनी भावना रखते हुए उन्होंने अपने अपने वॉर्ड के नाम दिए है तो किसमें क्या चेंज जा रहा है क्या नही हो रहा है पता तो चले।

मा. महापौर :-

हम चेंज नही कर रहे है जो नाम नही दिए गए है उसीको नाम दे रहे है। दिए हुए नाम चेंज नही किए जाएेंगे।

प्रमोद सामंत :-

दिलेलेच चेंज केले आहेत मॅडम.

भगवती शर्मा :-

मतलब यहाँ सुचना दिई हुई नाम में कोई बदलाव है क्या?

नरेंद्र मेहता :-

सुचना में है ना।

भगवती शर्मा :-

वही तो मैं कह रहा हूँ।

मा. महापौर :-

वह ठराव है।

प्रमोद सामंत :-

दिलेले नाव चेंज केलेले आहे. मिरारोड पूर्व, पुनम सागर कॉम्पलेक्स, मागील मैदान, १९६ रिझर्व्हेशन आहे ते त्याला नाव दिलेले आहे. तुम्ही आणले नाव दिलेले आहे तुम्ही खांबित साहेबांना विचारा.

नरेंद्र मेहता :-

२३ नंबर राई मंदिर तलावाच्या ठिकाणी नविन बांधलेला डेकप पार्वतीमाता वैद्यनाथ महाराज केलं आहे.

जुबेर इनामदार :-

सिरियल बदल केले आहेत.

प्रमोद सामंत :-

सिरीयल चेंज का करत आहात.

जुबेर इनामदार :-

अनुपालन नाही सिरियल नंबर, अनुक्रमांक बदललेला आहे. अनुक्रमांकाप्रमाणे वाचा.

प्रमोद सामंत :-

महापौर मॅडम याविषयी तीन ठराव झाले आहेत. प्रत्येक ठरावात गोंधळ झालेला आहे. प्रत्येक ठरावात दिलेल्या नावाच पुन्हा पुन्हा वेगवेगळे नाव दिल गेलेल आहे. सिरियल नेम चेंज करुन कन्फ्युजन करु नका. ऑलरेडी नाव दिलेल आहे.

आसिफ शेख :-

मागच्या महासभेत ठरवलेले आहे आपण की नगरपरिषदेच्या कारकिर्दीत जे ठराव झालेले होते तेच ठराव पुन्हा पुढे कन्टीन्यू व्हायला पाहिजे. परंतु नगरपरिषदेच्या वेळी जो ठराव झालेला आहे नामकरणाचा तो पुन्हा पुन्हा वारंवार महासभेत ठराव झाला पुन्हा महासभेत पुन्हा दुसरा त्याच रस्त्याला एक वेळा तीन तीन नाव देता.............

मा. महापौर :-

आसिफ भाई में बार बार आपको कह रही हूँ की, जो नाम पहले दिए गए है वो चेंज नही किए जाऐंगे। अगर आपके ध्यान में ऐसे कोई नाम आए है इस बार प्रशासन को यह नाम दिए है और उन्होंने यह चौकशी करके हमे नाम दिए है अगर इधर नाम नही दिए गए है...........

प्रमोद सामंत :-

प्रशासन चुकीची चौकशी करतो फक्त कन्फ्युजन क्रिएट करतो मॅडम आता नाव बदली करा १९६ आरक्षण १९६ होतं तिचे नाव दिलेले आहे. मिरारोड पूर्व पुनम सागर कॉम्पलेक्सच्या मागील मैदान अख्या त्या मँग्रोज आहेत. एवढ मोठ मैदान आहे तिथे.

दिपक खांबित :-

सर तुम्ही बघा मी ते नाव कापलेले आहे.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम, मागच्या वेळी नावात गोंधळ झाला होता. त्यावेळी सभागृहात ठरवल आणि नावात बदल करु नये ह्या शहरामध्ये हा निर्णय त्यावेळी सभागृहाने घेतला ज्यावेळी टेंभा हॉस्पीटलच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने डॉ. पंडित भिमसेन हॉस्पीटल रुग्णालय याचं नाव ज्यावेळी बदलत आणलं होत त्याचवेळी आम्ही निर्णय घेतला की कुठल्याही महापुरुषाचे नाव दिलं तर तो बदलला जाणार नाही मग ग्रामपंचायतने दिला असेल किंवा नगरपालिकेने दिलं की महानगरपालिकेने दिलं एकदा नाव दिलं ते बदलायचं नाही हा निर्णय सभागृहाने घेतलेला आहे. महानगरपालिकेमध्ये ज्या नगरसेवकाला नाव द्यायची असतील एखादा रस्ता किंवा चौक किंवा उद्यानाच नाव दिलेलं असेल तरी मा. आयुक्तांना सुचवायच आहे आणि मा. आयुक्तांनी ते महापौर मॅडमकडे सभागृहामध्ये घेण्यासाठी विनंती करतात त्याप्रमाणे हे नाव आलेली आहेत. आता त्यात जे नाव रिक्त आहेत जे रस्ते असतील, उद्याने असतील ते नाव काय द्यायच शेवटी तो अधिकार सभागृहाचा आहे मांडायचा अधिकार ह्या शहराचा लोकप्रतिनिधीचा आहे ते मांडत असताना शेवटी काय द्यायचा हा अधिकार सभागृहाचा आहे. आज जे नावात फरक आला ज्यावेळी ते नाव दिली गेली ह्या मिरा भाईंदर शहर झपाट्याने वाटचाल एकाच गल्लीला एकाच चौकला आपण वेगवेगळ्या नावाने सांगत असतो मी सांगतो शांती नगर रोड आपण सांगता शांती पार्क रोड अशामुळे दोन नावामध्ये चुक आली होती ते आम्ही ठरावामध्ये कमी केलेली आहे आता आपण जे सांगितल एक नाव सुटल दोन असे म्हणून २५ चे झाले तरी यामध्ये आमची पहिल्यापासून भुमिका आहे आजही भुमिका आहे एखादा कुठल्याही नाव आपल्या निदर्शनास आलं की याचं पहिला झालेलं आहे साहेब तर पहिल दिलेलं नाव हे कायम राहतील नंतर दिलेल नाव आपण सभागृहामध्ये दुरुस्तीसाठी पाठवा ते आम्ही करुन देऊ आणि परत एकदा सांगतो की नाव जे आहेत सभागृहाचा अधिकार प्रमाणे आम्ही ती सुचविलेली आहेत आणि आम्ही तो ठराव मांडतो त्याच्यामध्ये एखाद्याला वेगळ काही मांडायचं असेल ते मांडू शकतात.

आसिफ शेख :-

आयुक्त महोदय प्रशासनामार्फत टिपणी अशी यायला पाहिजे की, ह्या रस्त्याला यापूर्वी या महासभेने असे असे नाव दिलेले आहे आणि हे प्रस्तावित केलेलं आहे याच प्रशासनामार्फत स्पष्ट येतच नाही.

मा. महापौर :-

आपण दिलेल नाव प्रस्तावित करायचा प्रश्नच येत नाही.

आसिफ शेख :-

तुमची कसली वेगळी आहे तुमची करणी वेगळी आहे.

मा. महापौर :-

तुम्ही ते लक्षात आणुन द्या कारण आम्ही परत नाव देत नाही. जे दिलेल नाव आहे ते चेंज करायच नाही.

आसिफ शेख :-

प्रशासनाकडे सगळ नगरपरिषदेचे यापर्यंत संपूर्ण...............

मा. महापौर :-

अशी काही चुक आहे नगरपरिषदेपासून ते आतापर्यंत संपूर्ण...................

वंदना चक्रे :-

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलते मी तीन नाव दिलेली आहेत. माझ पण नाव दिलेल आहे एक दिलेल आहे अंबर प्लाझा चौकाला नाव वंदना चक्रे. आपण म्हणालात की जिवंतपणी द्यायच नाही सभागृहाला माझी विनंती आहे की...........

मा. महापौर :-

महापौरांना नावांबदल काय बोलायचं आहे तेवढच बोला. दुसरे काही बोलु नका नाही तर मी ठराव मंजूर करते.

वंदना चक्रे :-

मागे मी तुम्हाला विनंती पत्र दिलेलं आहे अर्ज दिला आहे.

मा. महापौर :-

आपण नाव दिलेल आहे ते नाव लिस्टमध्ये घेतल आहे. ज्यांनी ज्यांनी नाव चौकावर नाव सर्व लिस्टमध्ये दिलेली आहेत महासभेला जे मंजूर होणार ते नाव पास होणार.

वंदना चक्रे :-

मॅडम इथे डबल नाव कसे आले हे नाव कधी नव्हतेच. याच्याआधी पण विषय नाही आला. आता कसे डबल नाव आले मॅडम मला याचं उत्तर द्याव आमची विनंती एकच आहे की डबल नाव कशी आली. वंदना चक्रेने जी तीन नाव दिलेली आहेत ती घ्यावी ही विनंती आहे..........

मा. महापौर :-

एकाच रोडला चार नाव द्यायची म्हणजे चार प्रकरण आलेली आहेत चार शिफारशी आलेली आहेत.

वंदना चक्रे :-

मॅडम त्या जागेत रस्ताच नव्हतो तो रस्ता आम्ही बनवला.

मा. महापौर :-

चक्रे मॅडम तुमच नाव मी घेतलेले आहे. आता महासभेने जे नाव मंजूर करायचं आहे ते महासभेवर आहे. मी नाव सर्वच घेतलेलं आहे. प्रशासनाने ते दिलेले आहेत की काही काही लेटर आले आहेत त्या रस्त्यावर.

वंदना चक्रे :-

अर्ज कधी आले आहेत? ज्यांचे पहिले आले आहेत त्यांचे पहिला नाव का नाहीत. अशी चुकीची नाव घेऊ नये अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

मा. महापौर :-

ठिक आहे बसुन जा. सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

प्रकरण क्र. ९६ :-

रस्ते, चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. ९७ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्ते, चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याकरीता सन्मानीय नगरसेवक/नगरसेविका यांना पत्र देऊन प्रस्ताव मागविण्यास आले होते. त्यांच्याकडुन प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. यापुर्वी झालेले नामकरण वगळात खालील प्रस्ताव सादर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र. ४५ महाजनवाडी, पेणकरपाडा येथील रॉयल कॉलेज ते एम.आय.डी.सी. डेल्टा संकुल येथील चौक | छत्रपती शिवाजी महाराज चौक |
| २ | मिरा रोड (पूर्व) प्रभाग क्र. ४५ पांडुरंग वाडी ते | कै. पद्माकर मन्या म्हात्रे चौक |

| | | |
|---|---|---|
| | पेणकरपाडा या डी. पी. रस्त्यावरील कक्कड पॅराडाईज संकुल जवळील चौक | |
| ३ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २८ मधील मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शॉपिंग सेंटर वरील सभागृहास | स्व. जर्नादन नारायण रकवी सभागृह |
| ४ | मिरा रोड (पूर्व) शांती पार्क हैप्पी होम अपार्टमेंट क्र. ०१ व ०२ चे मागील बाजूस असलेले उद्यान | गुरु गोबिंद सिंगजी उद्यान |
| ५ | भाईंदर (प.) मोर्वा गावातील व्यायाम शाळा | स्व. मनोहर हरिश्चंद्र पाटील व्यायामशाळा |
| ६ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १७ मधील मथुरा सदन, मथुरा धाम ते मथुरा कुंज रस्ता | कै. मथुराबाई केशव पाटील मार्ग |
| ७ | भाईंदर (पूर्व) स्टेशन समोरील चौक | हुतात्मा चौक |
| ८ | मिरा रोड प्रभाग क्र. ५ या परिसरात धरती कॉम्पलेक्स नर्मदा पॅराडाईज या इमारतीमधील चौक | गणेश मंदिर चौक |
| ९ | मिरा रोड प्रभाग क्र. ५ मध्ये आर. के. इन या हॉटेलकडे जाणारा रस्ता | श्रीमती नर्मदा महादेव कदम मार्ग |
| १० | मिरा रोड (पूर्व) रामदेव पार्क येथील शाखा क्र. ३१ जवळील चौक | सावित्रीबाई फुले चौक |
| ११ | मिरा रोड (पुर्व) प्रभाग क्र. ३१ दिपक हॉस्पीटल लेन, सेवन स्वेक्अर शाळेच्या बाजूचा रस्ता | परमपुज्य श्री. माताजी निर्मला देवी मार्ग |
| १२ | मिरा रोड (पुर्व) प्रभाग क्र. ३१ बाळासाहेब ठाकरे मैदान जवळील एस.के.इंग्लीश हार्ड स्कुल व दुर्गा रेसिडेन्सी सरवाल चौक | प. पु. माधव सदाशिव गोळवलकर (गुरुजी) चौक |
| १३ | भाईंदर (प.) राधेश्याम रेसिडेन्सी ते दर्शना हाईटस परिसराचा रस्ता | श्री रामप्रसाद अग्रवाल (कंदोई) मार्ग |
| १४ | मिरारोड (पुर्व) सेक्टर क्र. ६ येथील कम्युनिटी हॉल | गुरू भगवंत आचार्य रती लालजी महाराज साहेब सभागृह |
| १५ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ एम.आय.डी.सी. चौक | अशोक सिंघल चौक |
| १६ | छत्रपती शिवाजी मार्गापासुन विनय नगर, पुजा पार्क, सिल्वर सरिता कॉम्पलेक्स कडुन जाणारा रस्ता | गावदेव विठ्ठल मंदिर मार्ग |
| १७ | भाईंदर (पुर्व) संजोली गोल्ड ते श्रीराम मंदिर (गोल्डन नेस्ट रस्ता) | स्वातंत्र्य सैनिक स्व. रावजी कदम मार्ग |
| १८ | मिरारोड (पुर्व) सिल्वर क्राऊन बिल्डिंगला चौक | धर्मवीर आनंद दिघे चौक |
| १९ | मिरारोड (पुर्व) संघवी नगर या खेळाचे मैदान (आरक्षण क्र. ३२८, शाळा व खेळाचे मैदान) | सरदार वल्लभभाई पटेल मैदान |
| २० | मिरारोड (पुर्व) अमर प्लाझा हॉल समोर ओम वसुंधरा, निल वसुंधरा या सर्कल | गुरु गौतम स्वामी चौक |
| २१ | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.३० लोधा कॉम्पलेक्स येथील सर्कल | हजरत टिपु सुलतान चौक |
| २२ | भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र. २४२ उद्यान | श्री. जगवल्लभ सुरीश्वरजी महाराज उद्यान |
| २३ | राई मंदिर तलावाच्या टिकाणी नविन बांधलेले डेक (Viewing Gallery) | प. पु. पार्वतीमाता वैजनाथ महाराज डेक |

वरील नामकरण प्रस्तावांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' मधील प्रकरण ११ (२) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदक :- श्रीम. वर्षा भानुशाली

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ९७, टेलिफोन बुथ, गटई स्टॉल यांचे धोरण ठरविणेबाबत.

प्रशांत केळुसकर :-

सदर टेलिफोन बुथ, गटई स्टॉल यांचे धोरण ठरविणेबाबतचा विषय पुढील महासभेत घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

मुन्ना सिंग :-

माझे अनुमोदन आहे.

प्रकरण क्र. ९७ :-

टेलिफोन बुथ, गटई स्टॉल यांचे धोरण ठरविणेबाबत.

ठराव क्र. ९८ :-

सदर टेलिफोन बुथ, गटई स्टॉल यांचे धोरण ठरविणेबाबतचा विषय पुढील महासभेत घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदक :- श्री. मुन्ना सिंग

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ९८, विशेष निधी अंतर्गत विकास कामांना मान्यता देणे.

प्रशांत केळुसकर :-

नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2015/प्रक्र.80/नवि-16 दि.8 मार्च 2016 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेस रु.10 कोटी एवढा विशेष निधी शासनाकडून मंजूर करण्यात आला असून त्यामध्ये महानगरपालिकेस रु.10 कोटी एवढी रककम लावून एकूण रु. 20 कोटी रकमेचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांच्या समितीपुढे सादर करावयाचे होते. मा. महासभा दि.28/06/2016 ठराव क्र. 24 अन्वये रु. 20 कोटी रकमेच्या 09 कामांना मा. महासभेने मान्यता दिल्यानूसार सदर कामे प्रशासकीय मान्यतेसाठी मा. विभागीय आयुक्त कोंकण विभाग यांच्या समितीपुढे सादर करण्यात आली होती. तथापी शासन निर्णयानूसार सदर कामे दि. 31 मार्च 2017 पर्यंत पूर्ण करावयाची असल्याने व इमारती विषयक कामांचे नकाशे मंजूर करणे व प्रत्यक्षात नविदा मागवून कामे पूर्ण करण्यास विलंब होणार असल्याने इमारती विषयक रु.3.00 कोटी रकमेची 04 कामे अंतिम मान्यतेसाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आलेली नाहीत. उर्वरीत रु.17 कोटी रकमेच्या 05 कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. इमारती विषयक रु. 3 कोटी रकमेच्या कामा ऐवजी विशेष निधीतून खालील कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

1) मिरारोड (पूर्व) प्रभाग क्र.31 मधील विकास योजनेतील रस्ते व रस्त्यालगत गटारे बांधणे.- रु.258,36,200/-
2) भाईंदर (पूर्व) नवघर रोड लगत एस.व्ही. रोडचे पूर्णपृष्ठीकरण करणे. - रु.41,63,800/-

वरील कामांना मान्यता देण्यात येत आहे.

डिम्पल मेहता :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय, गोषवाऱ्यामध्ये उल्लेख केला गेला की ३ कोटी रुपयांची काम इमारत बांधकाम म्हणजे त्याचे नकाशे मंजूर होण्यासाठी विलंब लागणार आहे. म्हणजे इमारती बांधकाम कुठल्यातरी आरक्षणामध्ये आपण कम्युनिटी हॉल बांधला असता एक वास्तुचा निर्माण झाला असता आता नकाशाला मंजुरीला इतका विलंब लागण्याचा विशेष कारण सभागृहाला याची माहिती द्या.

प्रमोद सामंत :-

महापौर मॅडम, ह्या ठरावात अस लिहिलेल आहे मिरारोड पूर्व प्रभाग ३१ मधील विकास योजना रस्ते पर रस्त्यालगत आयुक्त साहेब २३ करोड ५८ लाख ३६ हजाराची कामे करायची. २३ करोड ५८ लाख रुपयांची एकाच प्रभागात कामे करायची. बाकी प्रभागातली जी शिल्लक कामे आहेत ते आयुक्त साहेब तुम्हाला वारंवार दिलेली आहेत. महापौर मॅडम तुमच्याकडे मी निधी मागितलेला आहे. जी गटारे ओपन आहेत जिथे २५ वर्षापासून लोक राहतात ती करायची नाहीत का?

दिपक खांबित :-

सॉरी मिस्टेक आहे. २ कोटी ५८ लाख ३६ हजार २०० आहे.

प्रमोद सामंत :-

ठिक आहे. साहेब अशा ठिकाणी जिथे लोक राहत नाहीत कोणी राहायला आलेलं नाही त्याठिकाणी डि.पी. रस्ते बनलेले आहेत आणि तिथे २५-३०वर्ष जुनी वस्ती आहे. तिथे मी निधी मागतो तुम्ही सांगतात आमच्याकडे पैसे नाहीत. साहेब अजुनही तिथे २ कि.मी. ची गटारे उघडी आहेत. मी लिहून दिलेले आहे. माझ्या प्रभागात २ कि.मी. ची गटारे अजुन उघडी आहेत.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम, हा सभागृहाचा अधिकार आहे. आयुक्तांना तस विचारण्याच्या आधी आम्ही मांडलेला ठराव आहे............

जुबेर इनमादार :-

तुम्ही ठराव मांडण्याच्या आधी गोषवारा प्रशासनाने दिलेला आहे.

प्रमोद सामंत :-

आयुक्त साहेब त्या प्रभागात राहणाऱ्या लोकांना तुम्ही त्याचा विचार करत नाहीत का? ते महत्वाच नाही का? जिथे मनुष्य एकही माणुस राहत नाही एकही बिल्डींगला परमिशन दिली नाही तिथे आपण २५ करोड रुपये खर्च करतो.

दिपक खांबित :-

प्रभाग क्र. ३१ मध्ये जी कामे करायची आहेत. डी.पी. रोडची आणि गटाराची तिच सगळे कामे घेतलेली आहेत.

प्रमोद सामंत :-

जिथे लोक राहतात त्या गटाराचं काय त्याचं काय करायचं तिथे २५ वर्षापासून लोक राहत आहेत त्यांना असच ठेवायच का खांबित साहेब.

दिपक खांबित :-

साहेब डेव्हलपमेंट सगळ्या ह्याच वॉर्डमध्ये आहे.

प्रमोद सामंत :-

आमच्या इथे एवढी वर्ष टॅक्स भरतात.

जुबेर इनामदार :-

जिथे लोक राहतात तिथे डेव्हलपमेंट करा ना.

प्रमोद सामंत :-

तुम्ही काय केल तिथे तेथुन गटाराच खाडीच पाणी रोज भरतीच पाणी आतमध्ये येते. ते दिसत नाही खांबित साहेब तुम्हाला.

दिपक खांबित :-

बजेटमध्ये आम्ही काम घेतो साहेब.

प्रमोद सामंत :-

कोणता बजेट ५ वर्ष सांगतो साहेब मी मागे लागलेलो आहे.

नरेंद्र मेहता :-

सभागृहात बोलण हे काही बरोबर नाही मॅडम हा सभागृहाचा अधिकार आहे.

प्रमोद सामंत :-

त्या प्रभागात राहणारी लोक सभागृहाला दिसत नाहीत का? तुम्ही त्या प्रभागाचे आमदार आहेत. आमदारांना दिसत नाही का? त्या प्रभागातील लोकांवर अन्याय करत आहेत.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

सामंत साहेब महासभेचा काय निर्णय आहे. काय काम करायच आहे काय नाही आपण बसून जा.

प्रमोद सामंत :-

ती लोक टॅक्स देत नाहीत का? सर्वात जास्त टॅक्स आमच्या प्रभागाकडून येतो. आयुक्त साहेब तुमच्या इंजिनीयरला तुमच्या एक्झीक्युटीव्हला त्या प्रभागातली उघडी गटारे दिसत नाहीत का?

जुबेर इनामदार :-

गोषवारा प्रशासनाचा आहे.

प्रमोद सामंत :-

गोषवारा प्रशासनाने दिलेला आहे ना २ करोडचा निधीतून तुम्हाला इकडची लोकं दिसत नाहीत का? मा. आयुक्त साहेब सभागृहाने एखादा निर्णय चुकीचा घेतला तुम्ही बदलु शकतात.

दिपक खांबित :-

शासन निर्णयानुसार एकूण २० कोटीची काम आपण मंजूर केली. २० कोटी पैकी जी ४० कोटी काम आहेत ती बिल्डींगची होती. आणि जो शासनाने जी.आर. काढला आहे त्याप्रमाणे हा खर्च ३१ मार्च २०१७ पर्यंत पूर्ण करायचा आहे. बिल्डींग कामांची टेंडर काढून ते काम कुठल्याही परिस्थितीत पूर्ण होणार नाही. त्यामुळे आपण ही ४ काम बदलून नविन काम सुचवाव.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर. सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ९८ :-

विशेष निधी अंतर्गत विकास कामांना मान्यता देणे.

ठराव क्र. ९९ :-

नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2015/प्रक्र.80/नवि-16 दि.8 मार्च 2016 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेस रु.10 कोटी एवढा विशेष निधी शासनाकडून मंजूर करण्यात आला असून त्यामध्ये महानगरपालिकेस रु.10 कोटी एवढी रककम लावून एकूण रु. 20 कोटी रकमेचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांच्या समितीपुढे सादर करावयाचे होते. मा. महासभा दि.28/06/2016 ठराव क्र. 24 अन्वये रु. 20 कोटी रकमेच्या 09 कामांना मा. महासभेने मान्यता दिल्यानूसार सदर कामे प्रशासकीय मान्यतेसाठी मा. विभागीय आयुक्त कोंकण विभाग यांच्या समितीपुढे सादर करण्यात आली होती. तथापी शासन निर्णयानूसार सदर कामे दि. 31 मार्च 2017 पर्यंत पूर्ण करावयाची असल्याने व इमारती विषयक कामांचे नकाशे मंजूर करणे व प्रत्यक्षात नविदा मागवून कामे पूर्ण करण्यास विलंब होणार असल्याने इमारती विषयक रु.3.00 कोटी रकमेची 04 कामे अंतिम मान्यतेसाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आलेली नाहीत. उर्वरीत रु.17 कोटी रकमेच्या 05 कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. इमारती विषयक रु. 3 कोटी रकमेच्या कामा ऐवजी विशेष निधीतून खालील कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

1) मिरारोड (पूर्व) प्रभाग क्र.31 मधील विकास योजनेतील रस्ते व रस्त्यालगत गटारे बांधणे .- रु.258,36,200/-
2) भाईंदर (पूर्व) नवघर रोड लगत एस.व्ही. रोडचे पूर्णपृष्ठीकरण करणे. - रु.41,63,800/-

वरील कामांना मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदक :- श्रीम. डिंपल मेहता

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ९९, घनकचरा प्रकल्प संदर्भात NGT पूणे न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार ७० कोटी रुपये मा. विभागीय आयुक्तांकडे जमा करणेबाबत निर्णय घेणे.

प्रशांत केळुसकर :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे उत्तन-पाली येथे बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर माहे मे, २००८ मध्ये घनकचरा प्रक्रिया प्रकल्प सुरू करण्यात आला होता. परंतू सदरचा प्रकल्प दि.२५/१०/२०१३ पासून काही तांत्रिक कारणांमुळे बंद झाला आहे.

मौजे उत्तन येथील घनकचरा प्रकल्पाबाबत नागरीक हक्क संघर्ष समिती, पो. उत्तन यांनी मा. नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल, पुणे (पश्चिम विभाग) येथे महानगरपालिका विरोधात अर्ज क्र. ६५/२०१५ दाखल केली. दि.२१/७/२०१५ रोजी मा. ट्रिब्युनल यांनी महानगरपालिकेस कोकण विभागीय आयुक्त यांचेकडे रु. ७०.०० कोटी इतकी रक्कम एस्क्रो अकाऊंट उघडून ०४ आठवड्यांत जमा करणेस व मौजे उत्तन येथे टाकण्यात येणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्याचा प्रकल्प (Stop Gap Arrangement) सुरु करणेस आदेशित केले आहे.

महानगरपालिकेने मा. ट्रिब्युनल यांनी दिलेल्या आदेशानुसार आय.आय.टी., मुंबई यांची मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणी करणे कामी तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणुक केली आहे. आय.आय.टी., मुंबई यांचेकडून दि. ११/०३/२०१६ रोजी प्राप्त झालेल्या तांत्रिक सल्ल्यानुसार महानगरपालिकेने मौजे उत्तन येथील जागेवर घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणी करणे करीता बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर खालीलप्रमाणे तारखांना निविदा मागविण्यात आली होती.

१. दि. २७/०५/२०१६ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.
२. दि.०६/०७/२०१६ व दि. ०५/०८/२०१६ रोजी निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने मुदतवाढ देण्यात आली होती.

३. दि.२०/०९/२०१६ रोजी निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने फेर निविदा मागविण्यात आली होती.
४. दि.११/११/२०१६ रोजी प्रतिसाद न मिळाल्याने पुनश्चः फेर निविदा मागविण्यात आली होती.

महानगरपालिका सांविधिक कर्तव्य (Obligatory duties) म्हणुन घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन साफसफाई करणे, घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे, गोळा केलेला कचरा प्रकल्प ठिकाणी वाहतुक करणे इत्यादी करीता महानगरपालिका अंदाजित वार्षीक रु. ७०.०० कोटी खर्च करीत आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे महानगरपालिकेतर्फे बांधा, वापरा व हस्तांतरीत करावा या तत्वावर घनकचरा प्रक्रियेसाठी निविदा काढलेली आहे. त्यामुळे सदर प्रकल्प उभारणीसाठी महानगरपालिकेस कोणत्याही प्रकारची भांडवली गुंतवणुक करावी लागणार नाही. तथापी, प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर महानगरपालिका टिपिंग फि द्यावी लागणार आहे.

आज सभागृहामध्ये प्रशासनाने प्राप्त निविदा दि. २४/११/२०१६ रोजी उघडण्यात आली असून त्यामध्ये एक निविदा प्राप्त झाली. मे. सौराष्ट्र इन्व्हायरो प्रा. लि. यांची प्राप्त झाली आहे. त्यांचा तांत्रिक लिफाफा अभिप्राय मिळणेकरीता आय.आय.टी. मुंबई यांचेकडे पाठविण्यात आला असून अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर निविदाकाराचा दराचा लिफाफा उघडण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

मा. ट्रिब्युनल यांनी Misc. Application 363/2016 यात दि. २१/११/२०१६ रोजी यापूर्वी पारीत केलेल्या आदेशाची पुर्तता करण्यासाठी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नसल्याबाबतचा मा. महासभेचा ठराव करुन सादर करणेस आणि आयुक्त व उप-आयुक्त (आरोग्य) यांनी आदेशाची पुर्तता केल्याबाबत शपथपत्र दि. १४/१२/२०१६ रोजी दाखल करणेस आदेशित केलेले आहे.

सदर गोषवाऱ्याद्वारे प्रशासनाने मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन २०१५-१६ ची उत्पन्न व खर्चाची माहिती खालीलप्रमाणे सादर केलेली आहे.

| महानगरपालिकेचे एकुण महसुली उत्पन्न | रु. ४५८.५३ कोटी |
|---|---|
| भांडवली जमा | रु. १.६५ कोटी |
| एकुण | रु. ४६०.१८ कोटी |

| | |
|---|---|
| महानगरपालिकेचे एकुण महसुली खर्च | रु. ३२२.६३ कोटी |
| भांडवली खर्च | रु. १३७.०१ कोटी |
| एकुण | रु. ४५९.६४ कोटी |

आवश्यक खर्च :- १) अत्यावश्यक होणारा वार्षिक खर्च :- रु. २५८.०० कोटी (कर्मचारी वेतन, पाणी बिल, लाईट बिल, वॉर्ड साफसफाई, शिक्षण मंडळ वेतन, वाहन इंधन, कर्ज परतफेड इत्यादी)
२) महानगरपालिकेवर असलेले दायीत्व (कर्जाची सद्यस्थिती) :- रु. २१७.५० कोटी आहे.

महानगरपालिकेची उपरोक्त आर्थिक स्थिती व दायीत्व व कर्जाची सद्यस्थिती पाहता रु. ७०.०० कोटी जमा करणे आर्थिक दृष्ट्या शक्य होणार नाही. तरी सदरची आर्थिक वस्तुस्थिती मा. नॅशनल ग्रीन टिब्युनल (NGT) पुणे यांना कळविणेस आयुक्त यांना हि सभा प्राधिकृत करीत आहे.
मुन्ना सिंग :-

माझे अनुमोदन आहे.
लियाकत शेख :-

महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब हा विषय आमच्यासाठी खुप ज्वलंत आहे. उत्तनच्या रहिवाशांसाठी एक ठिकाणी सांगतात तुम्ही इथे ऑब्लीग्रेटरी ड्युटी आहे. इट्स मॅन्डेटरी अस असताना आपण सांगतो की आमच्याकडे फंड नाही. आताच तुम्ही विक्रमी रक्कम काही तरी जमा केली आहे. आता तुमचं अभिनंदन झाल. अशा परिस्थितीत तुम्ही सांगता पैसे नाही. आमच्याकडे भरायला पुन्हा तुम्ही सांगतात की बी.ओ.टी. तत्वावर चालवणार चार वेळेला तिथे तुमचे टेंडर झाले कोणी बी.ओ.टी. तत्वावर चालवायला येत नाही आणि पुढे कोणी येणारही नाही. कारण तिथे चालवायला गेल्यानंतर साहेब तिथे खुप मोठा टेक्नीकल प्रॉब्लेम आहे त्या जागेचा. ती जागा समुद्र सपाटी पासून ५० मीटर ऊंचीवर आहे. अशा परिस्थितीत तिथे हा प्रोजेक्ट आणि तिथुन येणारी दुर्गंधी हा आयुष्यात थांबणार नाही. कोणीही तिथे माणूस येईल. कुठल्याही कामासाठी त्याला माहित आहे का पुढे मागे गावकऱ्याला त्याचा त्रास होणार आहे विरोध होणार आहे. अशा परिस्थितीत पुन्हा तिथे तुम्ही बी.ओ.टी. तत्वावर चालवणार भले तिथे टेम्परररी बेसीस नंतर तुम्ही ते स्टॉप गॅप अरेंजमेंटनुसार तुम्ही त्या सकवारला काय करणार आहेत तर आता सकवारमध्ये ऑलरेडी डेव्हलपमेंट चालु होतं साहेब आपण किती पैसे सकवारसाठी भरलेली आहेत?
संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

मा. महापौरांच्या परवानगीने ७३ लाख.
लियाकत शेख :-

७३ लाख रुपये आपण भरलेले आहेत. साधारणतः किती महिने झाले साहेब?
संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

दोन वर्ष झाले.

लियाकत शेख :-

त्याने ॲफिडेव्हिट दिलेल होत का आम्ही १८ महिन्यात टप्प्याटप्प्याने काम चालु करु. दोन वर्षात तुम्ही तुमच्या नावाने सातबारा तरी केला का अजुन.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

ह्या संदर्भात आम्ही वारंवार पत्र व्यवहार केलेला आहे. जिल्हाधिकारी मा. महोदयाला १४ वेळेस आम्ही पत्रव्यवहार केलेला आहे. १४ वेळेस स्मरणपत्र गेलेले आहे. त्या लॅंडच्या थोडा डीस्प्यूट आहे. त्यासंदर्भात चौकशी करुन निर्णय घेणार आहेत. आता जिल्ह्याच विभाजन झाल्यामुळे थोडासा वेळ लागलेला आहे.

लियाकत शेख :-

आता हे साधारण आम्हाला किती वेळ तुम्हाला डेव्हलपमेंट करण्यासाठी आता जे टेंडर काढलेले आहे. ११ तारखेला काही टेंडर आहे.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

आता जे टेंडर काढलेले आहे ते उत्तनसाठी काढलेले आहे. स्टॉप द अरेंजमेंटसाठी पाच वर्षाच एक आलेल आहे त्याला आय.आय.टी.कडे आपण पाठविलेले आहे.

लियाकत शेख :-

म्हणजे ते प्रोजेक्ट पाच वर्ष तिथेच चालु राहिल का?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

हो आम्ही तस हायकोर्टला कळविलेल आहे. एन.जी.टी.ला पण कळविलेले आहे.

लियाकत शेख :-

एन.जी.टी. हायकोर्टाने सुध्दा मान्यता दिलेली आहे की पाच वर्ष प्रोजेक्ट चालु राहिल म्हणून.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

हो अपडेट करुन सांगितलेल आहे.

लियाकत शेख :-

अलॉंग विथ ॲफिडेव्हीट.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

ॲफिडेव्हीट सांगितले आहे.

लियाकत शेख :-

ठिक आहे.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम चक्रे मॅडमच सुध्दा ऐकून घ्या त्यांची विलंबना ऐकून घ्यावी अशी विनंती आहे.

मा. महापौर :-

मी ऐकून घ्यायला तयार आहे तुम्ही मांडलेल्या ठरावात बदल करायला तयार असाल तर.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम, आम्हाला प्रॉब्लेम असा आहे दरवेळी ते आमच्या विरोधात ठराव मांडतात पण वंदना चक्रे बाबतीत तर ठराव सुध्दा मांडत नाही राष्ट्रवादी कॉंग्रेस त्यांची विलंबना घ्यावी.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम, सन्मा. वंदना ताई चक्रेने आज बरसो पहले जो तीन नाम दिए थे बरसो पहिले दिए थे। उनके नाम के सिवा उनका यह कहना है आज तक दुसरा किसीने नाम नही दिए आपके खांबित साहब उनको बोलके गए दुसरे ने किसीसे नाम नही दिए। फिर ओपनींग करके दुसरा नाम दिया उसका जवाब तक देने को तयार नही है। आपको इतना सम्मान था तो इनके नाम को क्यों बदल रहे हो। किसकी सुचना है बताईए आप।

वंदना चक्रे :-

आत्ताच पुरावा दाखवा मला आमदार साहेब.

भगवती शर्मा :-

आपके इनके अलावा भी कई नाम थे जो यहाँ के स्थानिक रहिवासी थे जो दिवंगत हो रहे थे उनका समाज में भी कुछ नाम था आपने उनका भी नाम काटा है।

वंदना चक्रे :-

माझ म्हणणे काय आहे की दुसरे नाव तरी दाखवा.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम इनका भी नाम दिया हुआ था जबकी वह वहाँ के आज रहिवासी दिवंगत हो चुके है।

मा. महापौर :-

आपने जो नाम दिए है आपको नाम प्रशासन को देने है। एक बार हमने डबल नाम दे दिया था इसके लिए हम अभी से आप जो नाम प्रशासन को देंगे प्रशासन उसका तेहसीस करेंगे और उसके बाद जो

नाम अगर वह नही दिए होंगे तो वह नाम अगले गोषवारे में भी आऐंगे आप हर महासभा में चाहे तो हम नाम का विषय ले सकते है लेकिन प्रशासन जब देगा..........

भगवती शर्मा :-

आयुक्त साहब इसी घनकचरा के अंदर के बारे में ७० लाख रुपया दे करके जल्दबाजी करनी नही। वहाँ पे प्रोसेस करने के लिए लिया इन्होंने कोर्ट में ॲफिडेव्हिट भी दिया था की वहाँ प्रोसेसिंग शुरु करेंगे। इस महासभा में ठराव भी कर के दिया था की, जिस के अंदर में आयुक्त को अधिकार दिया था की, आगे का वहाँ पे जो भी प्रोसेस करने का अधिकार आयुक्त को देते है। उसके कुछ एन.ओ.सी. आई थी क्या बाकी रह गया जिसके कारण से वह काम बाकी रह गया की आप वह बाकी का प्रोसेस करना चाह रहे है उत्तन में क्योंकी उस समय हाऊस के अंदर में बताया गया था सकवार की जमिन को हमने लिया है, इसके उपर के अंदर में जल्द से जल्द काम होगा। एक बार इसी सकवार की जमिन के लिए उस समय के अंदर में जैसे वसई विरार महानगरपालिकामें भी अपनी सहानुभूती जताई थी की आप अगर यह प्रोजेक्ट करते हो तो हम भी इसमे सहभाग हो सकते है। मा. आयुक्त साहबने उस समय स्मरण पत्र देके कहाँ था की आप अपनी महासभा का डिसीजन देंगे तो हम आपको सहभाग करेंगे नंबर १ बात यह हो गई। उस समय के अंदर में २०१५ तक उस समय जो तत्कालीन महापौर थे आमदार थे, खासदार थे उन्होंने प्रयास करके २-३ एन.ओ.सी. लाके दी थी। उसके बाद में आज तक क्या हुआ हमारा यह प्रश्न है। दुसरा मेरा यह प्रश्न है शासन के द्वारा बताया गया था की वहाँ पर भी एक प्लान्ट बैठ रहा है जहाँ पे मिरा भाईंदर महानगरपालिका भी सहभाग हो सकती है। उसके उपर के अंदर में आज तक क्या-क्या काम हुए है जरा यह दोनों की जानकारी दिजीए। उसके बाद में हमारा ठराव आएगा।

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आपण सकवारसाठी ३ वेळेस निविदा पण काढल्या होत्या. वेस्ट एनर्जीसाठी त्या निविदेला कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. त्याठिकाणी तिथल्या सकवार व्हिलेजने त्याठिकाणी ग्रामपंचायतीने ठराव केला त्या सदर ठिकाणी कुठल्या प्रकारचा कचरा प्रक्रियेचा प्रकल्प होऊ नये म्हणून त्यासंदर्भात पालघर जिल्हापरिषदेने सुध्दा विखंडीत करुन पत्र दिलेले आहे. आपण तीन वेळेस निविदा काढून वेस्ट एनर्जी कुठल्याही प्रकारची त्याला प्रतिसाद मिळालेला नाही म्हणून आता आपण संयुक्त प्रक्रिया प्रकल्प राबविण्यासाठी गोखिवरे ह्या ठिकाणी मध्यंतरी सचिव कार्यालयावर बैठक झाली होती आणि दोन्ही आयुक्तांनी चर्चा करून गोखिवरे येथे अशा प्रकारच्या प्रकल्पा संदर्भात  चर्चा चालू आहेत आम्ही पत्र सुध्दा दिलेले आहेत आता संयुक्त बैठक मा. सचिव यांच्याकडे होणार आहे. त्याठिकाणी पुढच वेस्ट एनर्जीसाठी पाच वर्षाचा नंतर आम्ही त्याठिकाणी करणार आहोत.

भगवती शर्मा :-

इन्होने बोला की, सकवार की जमिन में हम लोग ७० लाख, ७५ लाख रूपया दिया था। आगेगा का इनकी प्रोसेस के अंदरमें तीन एन.ओ.सी. हमारी दि गई अभी इनका कहना है की इसके उपरके अंदरमें वहॉ के स्थानिक रहिवासीओका ऑब्जेक्शन था। अगर यह चिंजे  थी तो इस सदनको क्यो नही बताया गया। आज ७०-७० लाख, ७५-७५ लाख जो इस महानगरपालिकाकी इतनी इनकम नही है। हमारा पैसा भी गया और आज तक वह जमिन इस मिरा भाईदर महानगरपालिका के नामसे भी नही हूआ। तो कहीना कही यह प्रक्रिया आपकी चल रही है। इस खास तौर पर बताना चाहिए ना। की क्या चल रहा है उसका हूँआ की नही आज तक हमारे उत्तन वासियोंने यह कहॉ की सकवार में जा रहा है आज यह बोल रहे है की, सकवार में नही हो रहा है तो कमसे कम नागरिकोंको यहा के नगरसेवकोको  यह उत्तन के नगरसेवक है हमारे २ नगरसेवक है जानकारी तो होनी चाहिए। पब्लिक को क्यो नही साधन साहब यहा पें बहूत बडा आंदोलन हूआ ना। जिस आंदोलन की पुरी महाराष्ट्र में चर्चा हूई थी। कही पे रस्ता रोखा गया ना कितने लोग घायल हुए थे। उनके उपर में केस दर्ज हुए थे। आज उन्होने इतना देनेके बाद इनसाफ किया गया ताकी यहा से मुक्ती दिलाई जाएगी लेकिन क्या प्रोसेस चल रहा है। हमको सदन में गुमराह किया जा रहा है। कमसे कम इसपर जानकारी दिजीए की ठिक है यहा पे नही होगा तो आगे कहॉ पे होगा नही होगा तो हम इस हिसाबसे सभागृह में निर्णय लेंगे ना।

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

तात्पुरता स्टॉप गॅप अरेंजमेंट म्हणून जी कामे ॲफिडेव्हिट आहेत एन.जी.टी.जा ला हायकोर्टाला केलेला आहेत. त्या पाच वर्षासाठी उत्तन ठिकाणी स्टॉप गॅप अरेंजमेंट म्हणून प्रक्रिया होणार आहे. आता एक सौराष्ट्र एनव्हायरो अशी एक एजन्सी आलेली आहे. त्याचा टेक्नीकल स्क्रुटीनीसाठी आय.आय.टी ला पाठविले आहे. त्याच्यानंतर फक्त पाच वर्षासाठी आपण उत्तनला तात्पुरत्या स्वरूपाचा करणार आहोत. आणि आपला मोठा प्रोजेक्टस आहेत ४०० टनाचा तो आपण गोखिवरेला करणार आहोत.

भगवती शर्मा :-

म्हणजे तात्पूरता तूम्ही करणार आहात.

रोहिदास पाटील :-

मा. महापौर मॅडम गोखिवरेचे काही डॉक्यूमेन्ट आले की लेखी आले की फक्त तुम्ही सांगता आहेत की तिथे जास्त करता सभागृहाला तुम्ही अशी माहिती गोखिवरेमध्ये एवढी जमिन एवढे सर्व्हे नंबर कोणाच्या

ताब्यात आहेत. महापालिकेच्या, ग्रामपंचायतीच्या कोणती एरिया त्याठिकाणी गोखिवरेमध्ये आता पाय ठेवयला जागा नाही. त्याठिकाणी तुमचा हा प्रोजेक्टस जाईल कसा.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

गोखिवरा ऑलरेडी त्यांचा प्लान्ट आहे. तिथला सर्व प्रकारच्या एन.ओ.सी. आहेत. त्याठिकाणी मोठा प्रकल्प आयोजित.................................

रोहिदास पाटील :-

वसई विरार महानगरपालिकेला ती जागा पुरीच नाही आहे. ते अडचणी मध्ये आहेत तुम्ही त्याच्यावर डिपेन्ट राहता कसे? सभागृहाला माहिती कशी देता. तुम्ही कोणतीही अधिकृत माहिती द्या. तुमच्याकडे एक तरी लेखी पत्र आहे का गोखिवरेच?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

पत्र आहे.

भगवती शर्मा :-

वहॉ पे मेरी जो जानकारी है मेरे पासभी पत्र है मैं दिखाता हूँ की वहॉ पे अपनी मिरा भाईदर महानगरपालिका और वसई विरा महानगरपालिका के तरफसे वह प्रोजेक्टस हो रहा है। वो महानगरपालिका मिरा भाईदर महानगरपालिका को सहभाग देने के लिए तयार है। इसके आगे आपकी स्टेट लेव्हलके अंदर में मिटींग हूई की नही हूई?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

नही हूई रिक्वेस्ट के लिए दिया है।

भगवती शर्मा :-

लेकिन इसकी प्रक्रिया चालू हूई की नही हूई?

मा. आयुक्त :-

आपल्याला सचिव पातळीवरची जी मिटींग आहे ना. तर त्याच्यामध्ये मी स्वतः सहभागी होतो. आणि आपले आयुक्त वसई विरार दोघेही सहभागी होते आमची चर्चा झाली आहे. म्युन्सिपल ॲडमिस्ट्रेशन जे ऑफिस आहे त्यांच्यामार्फत ही कार्यवाही चालू आहे आणि ही अंतिम टप्प्यात आहे. माझे काल बोलणे झालेले आहे. आयुक्तांशी वसई विरारच्या आणि त्यांनाही मी विनंती केलेली आहे. आपण दोघ मिळून त्याठिकाणी आम्ही सचिवाकडे जावून ह्याठिकाणी काम पूर्ण करू.

(सभागृहात गोंधळ)

मा. आयुक्त :-

असमर्थ दाखवत आहेत की आम्हाला भरण शक्य नाही म्हणून हा ठराव सभागृहाला समोर मांडलेला आहे.

भगवती शर्मा :-

तुम्ही भरू शकता की नाही?

मा. आयुक्त :-

आम्ही भरू शकत नाही.

भगवती शर्मा :-

ढाई सो टन कचरा प्रतिदिन मिरा भाईदर में मिनिमम निकलता है। पानपट्टे साहब प्रकल्प कितना बरससे बंद है। कई साल हो गया। और कुछ नही २०१५ से लेके आल २०१६ है साहब साहब आप गलत ना करिए की वहॉ के लोगोंकी क्या स्थिती होगी वह कचरेका कोई भी वहा प्रोसेसिंग नही हो रहा है। सुप्रिम कोर्ट के गाईडलाईन के अनुसार आज वहॉ पे बारिश होती है उसी कचरे में से वह पाणी बहकर के निचे जाता है। वहॉ की खेती की जमिन है वहॉ के लोग खेती के उपर में आक्रीत रहते है बाकीका पाणी उस खाडी के अंदर जाता है मतलब वहा की जिविका के उपर के अंदर में...............

मा. आयुक्त :-

मा. मुख्यमंत्री महोदय आए थे उत्तन को बैठने के लिए और वहॉ की यह जो मसला है वह मसला वह लोगो ने वहा डेलिगेशन दिया था। वह अपने आमदार साहबभी थे, महापौर मॅडम भी थी सब लोग थे उन्होने मुझे और कलेक्टर को भी डायरेक्शन दिया है की देढ साल के दरम्यान यह प्रकल्प पुरा करने की कोशिश करीए वह डायरेक्शन देने के बाद मैने खुद वह सेक्रेटरी को भी वह लेटर लिखा है ऑर इमिजिएटली हमारा जो कचरे का प्रकल्प है वह वसई विरार के साथ होनेवाला है। वसई विरार को एक्स्पीडेट करने जल्दीस जल्दी पुरा करके किसी हमने रिक्वेस्ट की है अभी जितना हमारे हाथ में है हम जरुर कर देंगे। मैं खुद होके ही उसका प्रोसेशन कर रहा हूँ अब हम सब मिलकर पुरी कोशिश करेंगे।

लियाकत शेख :-

साहेब पुढे काही होत नाही आम्हाला फक्त आश्वासनच देत आहेत.............

मा. आयुक्त :-

त्याच्यामध्ये उत्तनच्या नागरिकांचे जे डेलिगेशन आलेलं होत त्या डेलिगेशनला मुख्यमंत्री महोदयांनी सविस्तर ऐकले आहे त्यांची तिथे मिटींग झाली. मिटींग नंतर त्या ठिकाणी मिटींगला मी होतो, जिल्हाधिकारी होते, एस.पी. होते. आम्ही सगळे होतो, महापौर मॅडम, आमदार साहेब सगळेच मिटींगला होते. ह्या मिटींगमध्ये मुख्यमंत्र्यांनी दिलेल डायरेक्शन तर ते मी आपल्याला अवगत केलेले आहे. म्हणजे आपल्याला काय ह्या प्रक्रियेमध्ये झालेल आहे हे सांगतो.

भगवती शर्मा :-

वो साल हो गया आपके भुमिका के लिए लेकिन मेरा यह कहना है की, आज ७० लाख की क्या चिज है, यह कोर्ट दंड नही है। ७० लाख रुपया इस लिए मांगा है की कल को आप नही कर पाए आपने बोला हमारी आर्थिक स्थिती नही है। हम कर नही पाएँगे कल को वहाँ पे बार-बार टेंडर कमसे कम ४ लाख डिव्हाईड कर के जा चुका है। कोई भरने के लिए तयार नही। कल को खराब परिस्थिति हुई अर्ज नही भरा आप क्या करेंगे, सकवार वालों का, उत्तन वालों का कचरे का प्रोसेस नही होगा एन.जी.टी. ने इस लिए पैसा मांगा है की, वह ७० करोड रुपया हमारे पास में जमा होगा। उस पैसो से हम वह प्रोसेसिंग का काम करेंगे ताकी लोगों के साथ में न्याय हो सके। आप अभी बताते है की इन्होंने बजेट में बता दिया की यह सच है, यह भांडवली खर्च है हर बरस के अंदर में आदमी को उसके लिए प्रोव्हिजन करना चाहिए नही किया ठिक है कोई बात नही आज अपनी स्थिती ऐसी खराब नही है। आज जो आपनी ॲम्युनिटी स्किम के अंदर में आपने डिक्लेर किया उसके अंदर में काफी रेव्हेन्यु आई है। हम यह नही कहते है की उसको आप फालतु विचार करो इस शहर में और भी बाकी खर्चे भी होते है, जो गटर नही तुटे उनके उपर में भी होते है। रस्ते भी होते है रस्ते सिमेंट करने पे भी होते है अब यह इमारत के उपर में भी कुछ घटजारा करा उसको आप कोर्ट में डायव्हर्ट करते हो हमारी नगरपालिका पास में ऐसा नही है की कुछ पैसा नही है की आर्थिक स्थिती खराब है। आप उस पैसे को यह जनहित का काम है, एक साईट में हम बोलते है हम आदर्शवाद की योजना शुरु करेंगे। एक साईट में हम बोलते है की, स्मार्ट सिटी यहाँ पे डेव्हलप करके स्मार्ट सिटी का पैसा यहाँ पे लाऐंगे और स्थिती क्या है हमारे पास में कचरा डम्प करते है उसका प्रोसेसिंग प्लान्ट नही है कहाँ से हम यह आदर्श शहर बनाऐंगे। कहाँ से हम स्मार्ट सिटी बनाऐंगे, कहाँ से आदर्शवाद साहब। पैसो की इस शहर के अंदर में मानसिकता रखके प्रशासन को कोई कमी नही है पैसा भरा जाना चाहिए ताकी उत्तन के लोगो के साथ न्याय हो सके इसलिए हमारा ठराव है।

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, ठराव व्हायच्या आधी दोन मिनिट घेईन. आयुक्त महोदय ७५ एकर जागा घनकचरा प्रकल्पासाठी शासनाकडून कलेक्टरकडून ७५ एकर जागा मिळवून घेतली होती. आज त्या जागेमध्ये २५ एकरमध्ये अतिक्रमण आहे. आपली जागा होती आपण विशेष कामासाठी ती जागा उपलब्ध करुन घेतली याची तक्रार आरोग्य विभागाने अतिक्रमण विभागाला लेखी केलेली आहे म्हणजे मी बोलतो असे नाही आरोग्य विभाग सुध्दा बोलतो त्याच्यावरती कुठलीही कारवाई नाही. दुसरं त्या पूर्ण सर्व्हेचा परिसराचा सर्वेक्षण करुन कुंपण भिंती बांधायचा आपण टेंडर काढलेले आहे. त्या कुंपण भिंतीचा आजपर्यंत कुठेही ठिकाणा नाही हाच विषय आता मांडला की त्याचा मिळणारा १९ टक्के, २० टक्के निचळ तो खालचा शेतामध्ये जातो. त्याच्यासाठी ती कुंपण भिंत आपण तयार करणार होतो साहेब त्याच्याही आजपर्यत कुठे काही ठाव ठिकाणा नाही सर्वेक्षणाची आम्ही वारंवार केलेली तक्रार किंवा त्याच्याबद्दल मागितलेली माहिती ही अपुरी दिशाभुल करणारी आम्हाला देण्यात आली आहे. साहेब २०१३ मध्ये हा प्रकल्प बंद झाला आहे. आयुक्त महोदय सर्वांची भुमिका आहे की येथुन हा प्रकल्प स्थलांतरीत झाला पाहिजे. सकवारला करा, गोखिवऱ्याला करा मात्र आपला कचरा शेजारी आपल्या घराच्या समोर ठेवत नाही साहेब आणि आपण जे करायला निघालो तर किती पटीने पॉसिबल आहे याची शास्वती देता येत नाही आहे त्या जागेवर टेंडर आम्ही काढलेले आहे. आय.आय.टी.ने त्याच्यामध्ये मुख्य रोल आहे त्या विषयाला साहेब जलद गतीला कस काय करता येईल याच्यावर आपल्याला कारवाई केलीच पाहिजे. सकवार येथे आपल्याला शिफ्ट करायचे आह. हरित लवादाने आपल्याला आदेश प्रमाणे केले आहे. आपल्याला मान्य करावेच लागतील कारण आपल्याला आपली तयारी दाखवायला लागणार आहे नाहीतर लोक आमच्या अंगावर येतील. आम्ही पैसा नाही भरला याचा अर्थ आमची तयारीच नाही करायची. मानसिक तयारीच नाही हा अर्थ साहेब येतो. सारा शहर पेटलेले आहे.

मा. आयुक्त :-

आपण पैसा भरणे हा विषय त्याच्यामध्ये नाही आहे. आपली जर क्षमता असती तर पैसे भरले असते. परंतु पैसे आपल्याकडे क्षमता नसल्यामुळे आपण भरु शकत नाही. हे महासभेने सांगावे असे एन.जी.सी. ने म्हटलेले आहे म्हणून आपण सांगितलेले आहे म्हणून माझी सभागृहाला विनंती आहे. आपण ह्या बाबी ज्या आहेत आपण ठराव का केला आहे. कोर्टाच्या डायरेक्शनप्रमाणे आपण त्यांना अवगत करण्यासाठी केलेला आहे. बाकीची जी प्रोसेस आहे तर ती आपण दोन फोरमवर करतो आहे एक फोरमवर आपण तात्पुरत्या स्वरुपात उत्तनला प्रक्रिया करण्याचा प्रकल्प करतो आणि दुसऱ्या फोरमवर तितक्यात तातडीने शासन आपल्याला वसई विरार आणि मिरा भाईंदर दोघांचा जॉईंट प्रकल्प करतो हे प्रयत्न शासनाचे चालु असुन सुध्दा जर आपल्याला वाटत असेल तर मला वाटत की आपण पुन्हा एकदा विचार करायचा त्याच्यामध्ये आपण ह्या गोष्टीची त्या म्हणजे बंद केल्या नाहीत.

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय, आपण ७० कोटी भरु शकलो नाही. कमीत कमी काही तरी तिथे भरलं पाहिजे. त्यांना आपण तितक तरी सांगत होतो आज आमची ऐपत ७० कोटी भरायची नाही आहे. आपले बाकीचे नको त्या योजना यायच्या आहेत हा आदर्शवाद परत तोडून आपण नविन बांधणार साहेब. कित्येक रस्ते परत बांधणार आपण. हा शहराचा ज्वलंत विषय आहे.

बर्नड डिमेलो :-

आयुक्त साहेब ही रक्कम भरल्यानंतर कोर्ट आपल्याला दुसरे काही पुढे एखाद्या वर्षी काही शाश्वती आहे का आपल्याला समजा हा भरला नाही आपण ठराव केला त्यांच्याकडे पैसे नाही पैसे भरायची ऐपत नाही. त्यानंतर कोर्ट तुम्हाला वाटत की दुसर डिसीजन देण्यास मागे राहिल. आपल्याला दिड वर्ष कालावधी दिला होता. आपण सर्वांना आश्वासित केल होते दिड वर्षात आपण काहीच केल नाही. कमसे कम तिथे कचरा बंद करायला पाहिजे होता जो प्रकार तिथे चाललेला आहे तो बंद करुन प्रभाग व्हाईज ज्याचा त्याचा कचरा केला असता तरी एवढा मोठा प्रकल्प आमचे पर्याय चालु आहेत. प्रयोग चालु आहेत आणि प्रयत्न चालु आहेत पण काहीच न करता आपण वाटेल तस वागत चाललो. म्हणून हा कोर्टाचा दणका लागलेला आहे आता जर आपण त्याला ठराव करु दिला की आमची ऐपत नाही पुन्हा आम्हाला वाटत की यापुढे काही कारवाई करणार नाही वाटेल तस करता नको त्याठिकाणी खर्च चालु आहेत दोन रस्ते बंद करा. पहिला त्या कचऱ्याची विल्हेवाट लावा.

मा. आयुक्त :-

२००८ ते २०१३ ला आपला त्या ठिकाणी प्रकल्प चालु होता. त्याच्यानंतर लोकांनी त्याठिकाणी विरोध केला. त्याठिकाणी आपण प्रकल्प बंद केला.

लियाकत शेख :-

साहेब विरोध का केला याचे कारण नाही.

मा. आयुक्त :-

त्याच्यानंतर आपण वर्सोवा ठिकाणी स्थलांतरीत करण्याचा निर्णय महासभेने घेतला. महासभेने त्याच्यानंतर शासनाकडून वर्सोवाला इको सेन्सीटीव्ह झोन असल्या कारणाने आपल्याला शक्य जाणार नाही. त्याच्यानंतर सकवारला त्याठिकाणी ३२ कि.मी. वसई तालुक्यामध्ये आपण २०१४ ला महासभेचा ठराव केला. त्याच्यानंतर ती जागा घेऊन प्रकल्प सुरु करण्यासाठी आपण प्रयत्न करतो. आणि आपण त्याच्यात जे पैसे भरलेले आहेत पैसे भरले परंतु त्याठिकाणी ही जी लॅन्ड आहे ती कुणाची नावाची आहे हे त्या डिसप्युटमध्ये कळत नाही पालघर आणि ठाणे जिल्हा हा वेगळा झाल्यामुळे ते रेकॉर्ड कुठे आहे याच्याबद्दल चालु आहे. मी स्वतः जिल्हाधिकाऱ्यांना याविषयी बोललो म्हणजे कालच बोललो. हा विषय जेव्हा माझा अजेंड्यावर आला त्यावेळेस आणि ह्यांनी १४ त्याठिकाणी रिमाईंडर दिलेले आहेत पण प्रयत्न प्रशासनाचे नाहीत अस नाही आहे. त्याच्यानंतर आपण हे १५ हेक्टरची जमिन ७२ लाख रुपये भरलेले तुम्ही म्हणालात तेही सत्य आहे. परंतु त्या डिस्प्युटमध्ये आहे ह्या सगळ्या प्रक्रियेमध्ये आपल्याला सगळ माहिती आहे. प्रशासनाने काहीच केलेल नाही अशी बाब नाही. प्रशासनाने प्रयत्न केलेले आहेत यश आलेलं नाही ही बाब वेगळी परंतु यश येण्यासाठी आपण पुन्हा पुन्हा सर्व मिळून प्रयत्न करु.

बर्नड डिमेलो :-

साहेब ५-५ प्रयोग आपण केले होते. तलोजा, वर्सोवा, सकवार आता गोखिवरे. मलातरी वाटत की पर्यायी उपाय सूचवून तिथे बंद करावे. दुसऱ्या ठिकाणी कचरा चालु करा. तलोजाला आपण मार्ग काढला होता तिथे तलोजाला चालु करा.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

संदर्भात मी पत्र लिहीलेले आहे पत्र आम्ही लिहीलेले आहे. पत्राचा पाठपुरावा आहे शासनाची ........

बर्नड डिमेलो :-

पानपट्टे साहेब तिकडची कॅपेसिटी किती आहे? त्या डम्पींगची कॅपेसिटी किती आहे? किती दिवस चालेल तिथे कचरा?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

भयानक परिस्थिती आहे. त्याला काही ईलाज नाही महानगरपालिकेने कुठल रिझर्व्हेशन करुन ठेवण हे महानगरपालिकेची जागा नाही. रि-सेंट्रलाईज प्रत्येक प्रभागात सुध्दा जागा नाही.

बर्नड डिमेलो :-

तुम्हाला वाटत की एका गावात तसच लोटत राहायच का? एका गावात तसच टाकत राहायच जिथे कॅपेसिटी नाही तुम्हाला तिथे भुकंप करायचा आहे का.........

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

महानगरपालिकेने कुठे रिझर्व्हेशन करुन ठेवलेले नाही एक गुंठा पण जागा महानगरपालिकेची साहेब.

बर्नड डिमेलो :-

साहेब प्रभागाचा प्रभाग व्हाईज कचरा घ्या ज्या प्रभागाचा कचरा आहे त्या प्रभागात ठेवा.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम, आयुक्त साहेब हा गंभीर विषय आणि ह्या विषया संदर्भात मा. महापौर मॅडम यांच्यावर सुध्दा गुन्हा दाखल झाला. त्यांची तिथे काय चुक आहे. आयुक्तावरही झालेली आहे. आता चुक तर नक्की कुठल्यातरी डिपार्टमेंटने केली असेल ठिक आहे. त्याची १०० टक्के चुक नसेल पण कारणीभुत तर असेल. आज जर ठराव मांडायचा हा कोर्टाने सांगितलेल फक्त ठराव करुन आणा तरी हे सांगितल नाही की नंतर मी काय निर्णय देणार. तुम्हाला खाली सादर करायचा आहे ठराव केला म्हणजे आपण सुटलो अशातला भाग नाही. त्याच्यावर कोर्ट नविन रुलिंग देणार आहे. ठिक आहे मी मान्य करतो काही तरी कंडीशन टाकेल किंवा एखादा सांगेल मी ॲक्सेप्ट करत नाही सरकार काही ना काही टाकेल आता आम्हाला ठराव करताना भिती वाटत होती की शेवटी प्रशासन तिकडे जाईल सागेल की आमची परिस्थिती नाही आम्हाला सहा महिने द्या आणि ६ महिन्यात नाही केल तर जसा महापौरांवर गुन्हा दाखल केला तर ह्या सगळ्या सदस्यांवर पण गुन्हा दाखल करा ही जबाबदारी आम्ही घ्यायची का हे महत्वाचे आहे. आयुक्त साहेब तुम्हाला प्रशासनाने काय सांगितले हे आम्हाला माहित नाही २००३ ला ह्या प्रोजेक्टला मान्यता झाली २००९ ला हा प्रोजेक्ट बंद झाला.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

२००८ ला आपला प्रकल्प सुरु झालेला आहे.

नरेंद्र मेहता :-

२००९ ला इलेक्शन होत त्यावेळी आंदोलन झाल आणि तो प्रकल्प त्यावेळी बंद झाला.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

तात्पुरता झाला नंतर सुरु केला होता.

जुबेर इनामदार :-

पानपट्टे साहेब २०१३ ला बंद झाला. बंद केला नव्हता तो चालु केला होता.

नरेंद्र मेहता :-

ठिक आहे काही तारखा चुकत असेल जशी तुमची चुक आहे तस उभ राहून सांगा की हे अस नाही हे अस होत आयुक्त साहेब. कोर्टाने काय आदेश दिले होते की पोलीस प्रोटेक्शन घ्या आणि त्या कचऱ्याची विल्हेवाट लावा केल का नाही केल. ज्यावेळी शासनाकडे हा वर्सोवाचा ठराव विखंडीत झाला त्यावेळी शासनाने काय निर्देश दिले होते ती जी उत्तनची जागा आहे त्याच्यामध्ये पर्याय पोल्युशन कंट्रोलबोर्ड हे सर्वांनी आपल्याला पर्याय सुचवले होते. कुंपण भिंत करा गटार काढा. लिकेजचे पाणी जाण्यासाठी करा. एकही केल का? तेही कोर्टाचे आदेश होते किंवा त्या समिती जी गठीत झाली त्याचे आदेश होते. त्याच्यावर कुठल्याही प्रकारची अंमलबजावणी झाली नाही साहेब. ती झाली असती तर आज हा दिवस आला नसता. आधी प्रशासनाची भुमिका काही स्पष्ट होत नाही कधी कोर्टात सांगतात आम्ही सकवारला चाललो आम्हाला सातबारा भेटला नाही. कधी सांगतात आमच गोखिवरेला चाललेल आहे. म्हणजे कोर्टाला हे माहित नाही नक्की हे काय करणार आहेत. म्हणजे आपण गोखिवरेला करणार. सकवारला घेऊन जाणार आपली भुमिका सभागृहाला विचारलं तरी आम्ही उत्तर देऊ शकत नाही की, तुम्हाला पुढे साथ द्यायची. सकवारला द्यायची गोखिवरेला द्यायची तुम्हीच स्पष्ट नाही आहेत.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

सर्व पर्याय खुले ठेवले साहेब उद्या गोखिवरेला अपयथ आलं सकवारला अपयश आलं. तळोद्याला अपयथ आल म्हणून आपण सगळ ओपिनियन ठेवलेल आहे.

नरेंद्र मेहता :-

आयुक्त महोदय आपली भुमिका कोर्टामध्ये पण एक राहिली नाही. वेगवेगळी झाली आणि कोर्टाने हे निर्णय साहेब ७० कोटी काल दिले नाही कोर्टाने हे सगळ गांभिर्य बघितल की ह्यामध्ये आपण काही करत नाही खाली खामाढ्य उत्तर देतो म्हणून कोर्टाने तुम्हाला ७० कोटी, ७० कोटी भरायचं हा निर्णय झाला एकदाही महासभेपूढे आणला का? एकदाही एवढी मोठी रक्कम की आज तुम्ही गांभिर्य बोलतात जस सांगितल आमची विकास काम ठपवून आहे. शेवटी साहेब कोर्टाने उद्या सांगितले तुम्हाला भराव लागेल तुम्ही काय करणार चेक काढणार आणि देऊन टाकणार. मग आमची विकासाची काम एकही होणार नाही याला जबाबदार कोण? ७० कोटी रुपये ज्यावेळी तुम्हाला निर्देशात आल त्यावेळी तुम्ही सभागृहापुढे मांडायला पाहिजे होते, सभागृहाने एखादा चांगला ठाम निर्णय घेतला असता की आम्हाला हे करायच आहे किंवा सरकारकडे जायचे किंवा काय करायचे ७० कोटीचा आदेश झाल्यानंतर तुम्ही आजपर्यंत आमच्याकडे आले नाहीत ही फाशी लागली पैसे भरा त्यावेळी तुम्ही आमच्याकडे येतात. पानपट्टे साहेब तुमच्या माहितीसाठी दिड कोटी काय २ कोटी रुपयाचं सकवारला कुंपण भिंत करायची आर्थिक प्रशासकीय मान्यता घेतली. त्यावेळी व्हिटनेस आम्ही बोललो तुमच्याकडे परवानगी आहे का? आज जसे ७० लाख तुमचे अडकले ती कुंपण भिंत केली असती तर आम्ही ठणकून सांगितल तुमच्याकडे परवानग्या नाहीत तुम्ही खाली खर्च करत राहणार. माझ्याकडून प्रकल्प होत नाही साहेब त्याची आर्थिक प्रशासकीय मान्यता घेतली टेंडर काढल की नाही मला माहित नाही ते विचारा म्हणजे किती दिशाभूल करायची.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

सकवारला साहेब आपण काढल नाही.

नरेंद्र मेहता :-

तुम्ही मान्यता घेतली नाही.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

सकवारला आपण परवानगी घेतलेली नाही.

नरेंद्र मेहता :-

साहेब आजही तो बजेट आहे. खांबित साहेब व्हिटनेस आहे तिकडचे पैसे आम्ही उत्तनला वर्ग केले. काही तरी बोलु नका. मला चांगल माहित आहे रिअप्रोप्रिएशन करुन ते पैसे नंतर आम्ही इकडे आणले कारण तुम्ही तिकडे कुंपण भिंत बांधत नव्हते. साहेब अशा अनेक चुका आहेत. त्यानंतर आता एम.बी.एम.सी. ने वारंवार तुम्हाला किती ॲफिडेव्हिट दिलं माहित नाही म्हणजे ह्या भाषेत पानपट्टे तुम्हाला उत्तर देत नसेल साहेब ह्या भाषेत सांगितल तुम्ही डी.एम.सी. आहेत की काय आहेत अशा भाषेत कोर्टाने त्यांना फटकारले आहे. साहेब एम.बी.एम.सी. ने रिझर्व्हेशन दिल की आम्ही हा नगरविकासला माहिती द्या आम्ही सस्पेन्ड झालेला आम्ही ह्या ठिकाणी सरेन्डर करतो हे सगळ अनेक बाबी त्यांनी दिलेल्या आहेत साहेब आत २०१२ साली सुप्रिम कोर्टाचा गाइड लाईनप्रमाणे २०१२ ला एन.जी.टी. ची स्थापन झाली त्यामध्ये उत्तन नागरी संस्था ह्या सर्व कोर्टात गेले त्यानंतर सेकेड डेटला त्यांना कोर्टात निर्देशनात आलं हे सगळ चुकीच चालल आहे. त्यांना बोलले तुम्ही ७० कोटी भरा कारण की वारंवार तुम्ही त्या तारखेपासून आतापर्यंत काय केल हे कोर्टाच्या निदर्शनात आले. त्यानंतर तुम्ही हायकोर्टात गेले ते आम्हाला काही माहित नाही गुन्हा दाखल झाला तेही सभागृहाला माहित नाही याच्यातली एकही बाब माहित नाही. आता मला सांगा ५० लाखाच एकर कन्सलटन्ट डेफॉन्टला निविदा काढली की एफर्ट केल काय आय.आय.टी. ला.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

हायकोर्टाचे आदेश होते एन.जी.टी. चे त्यानुसार आपण नोंदलेले आहेत.

नरेंद्र मेहता :-

किती खर्च झाला?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

२७ लाख झाला.

नरेंद्र मेहता :-

साहेब हे कुणाला माहित आहे आणि कसे खर्च केले?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

साहेब कोर्टाचे आदेश होते की आय.आय.टी लाच नेमा म्हणून.

नरेंद्र मेहता :-

कोर्टाचे आदेश काहीही असले तरी ज्या-ज्या बॉडीची मान्यता ही लागतेच. अस होत नाही आता ७० कोटी भरायचे आहेत आयुक्त साहेब चेक करतील सभागृहाला सांगणार नाहीत का?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत.

नरेंद्र मेहता :-

आयुक्त महोदय, आपण जर्मनमध्ये काम केले आहे. सरकारचा जो काही आदेश असेल पण ती प्रोसेस करावी लागते ना अस नाही की सांगितल घरातुन पैसे देऊन टाकायचं अस होत नाही. साहेब ती तुम्हाला प्रोसेस फॉलो अप करावी लागते. ह्या महासभांची मान्यता नाही काही नाही. डायरेक्ट टेंडर काढल पैसे दिले, कोणत्या अधिकाऱ्याने आणि आज काय झाल ते पैसे काय तुमचे फुकट काय त्याचा परिणाम आता आय.आय.टी ने काय सुचवल त्यांना की तुम्हाला आणि ह्या पोल्युशन कंट्रोल बोर्डने पण वारंवार ताशोरे उडवलेत की वारंवार महापालिकेला समज दिलेली आहे की, कुठल्याही प्रकारची कारवाई करत नाही. सर कोर्टाने चिडून हे आदेश दिलेले आहेत. एक रुटींगमध्ये नाही कुठलीही महापालिकेला वेटेस काही कोर्ट धरत नाही. आपली एखादी बाजुल १८ मॅक्स काही तरी प्रोसेस झाली असती तर कोर्टाला आपण सांगितल असत आपल ३० टक्के काम झालेल आहे. तर कधी सांगितल असत ७० कोटी भरा त्यांना दिसत कोर्टाला हे गेल्या १८ महिन्यापासून साहेब तुम्ही कोर्टाची तारीख बघा आणि निविदाची तारीख बघा तुम्हाला थोडाफार फरक दिसेल म्हणजे कोर्टात तारीख पडली परत निविदा काढायची निविदा निर्णय आला नसेल तुम्ही पाचवेळा केली असेल पण ज्या-ज्या वेळेला हे मात्र कोर्टाला दाखविण्यासाठी आणि वारंवार हेच सांगितल कोर्टाला की आम्ही निविदा काढली साहेब ५-५, ६-६ महिने १-१ वर्ष तुम्हाला निविदा प्राप्त होत नाही. त्याने तुम्हाला दुसरी काही योजना दाखवायला नको. आजही तुम्ही अस विचारल परत हेच आपण करत राहणार का? परत निवेदन आले परत काढायच का आणि जे तुम्हाला आता शक्य होणार आहे ते गेल्या दोन वर्ष शक्य झाल नाही का? आता तुम्हाला कोर्टाने सांगितल ७० कोटी भरा आता जे तुम्हाला शक्य होणार आहे साहेब दोन वर्षात झाल नाही ते आता पुढे कस होणार असा प्रश्न आमचा आहे. साहेब दुसर सुका कचरा आणि ओला कचरा हे तुमच आय.आय.टी. ने सुचवल होत वेगळ करा. मला पानपट्टे साहेबाने सांगाव की कुठली अशी दोन गाड्या येतात एक सुका उचलतात आणि ओला उचलतात आणि वेगळ केल तरी हे मिक्स करुन टाकतात साहेब मी उदाहरण दिलं माझा शाळेचा रोज सहा डबा सुका

कचरा निघतो. रस्त्यावर आपण साफसफाई करतो झाडू मारतो तो सुका कचरा निघतो आम्ही जर फोटो आणले राकेश शहा आणि आमचे कुठे आहे तो सुका कचरा? म्हणजे तुम्ही ज्या आय.आय.टी ला ५० लाख, ३० लाख सुचविले तरी आपण ते करत नाही मग पैसे का दिले? फक्त ह्यासाठी कोर्टाला दाखवायला बघा की मी आय.आय.टी. केलं आहे. सर हे आदेश तुम्हाला कधी प्राप्त झाला तुम्हाला माहित आहे? परवा तुम्हाला ही कोर्टाची ऑर्डर भेटली आहे तुम्ही विषय आम्हाला दोन दिवसांपूर्वीच देऊन टाकला. आदेश परवा आले आणि विषय दोन दिवसांपूर्वी आम्ही एवढ सांगितलं मागच्यावेळी बोललो आपण नाराज झाले होते. दर वेळी आम्हाला सांगतात कोर्टाचे आदेश, कोर्टाची भिती. आता मला सांगा की, दोन दिवसांपूर्वी माणुस विषय देतो केवढा इंटरेस्ट असेल मग बाकी गोष्टीमध्ये इंटरेस्ट नको की कोर्टाचे एवढे आदेश आहेत हे इकडे आले म्हणून दोन दिवसांपूर्वी हे आमच्याकडे आले. साहेब ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात शासनाच्या चुका आहेत. सर आपण हा फोटो बघा तुम्ही ७५ लाखाचा नाला केलेला आहे. तो माहिती आहे निचळसाठी हा नाला कोर्टाला दाखवायचा का आम्ही ७५ लाखाचा नाला केलेला आहे. आपण फोटो बघा ह्या ७५ लाखाला जबाबदार कोण? म्हणजे सकवारला पैसे भरले त्याला जबाबदार कोण? तुम्ही हा नाला ७५ लाखाला ही त्याची परिस्थिती आहे. ज्या ठिकाणी साहेब कोर्टामध्ये मॅटर चालु आहे. एकदा ऑब्जरवेशनला आले आपला जो सेफ्टी टँक भरलेला होता ह्या लोकांना माहिती पडल त्यांनी अर्धा खाली करुन त्या शेतात सोडून टाकले माझ्याकडे सेप्टी टँक भरला आहे आणि पम्प लावलेला आहे. आणि पाणी सोडतात तो ही फोटो आहे. ही परिस्थिती आहे म्हणजे करायच काय ज्याला आपण वाचवायला जातो आपल्या वॉर्डात त्याच शेतीची आपण वाट लावली मग मला सांगा उत्तन गावकरी तुमच्यावर चिडणार नाही का? तुम्हाला हा प्रकल्प करु देणार का? त्यांना तुम्ही कुठेतरी बरोबर घेऊन आपला हा स्टॉप गॅप तुम्ही भरायला पाहिजे हे कुठल्याही प्रकारच आपण केलेल नाही आता नागरिकाला तुम्ही ह्या प्रकारच कुठल सहकार्य करणार. नगरसेवक आहेत आम्हाला एखादा सांगायचे असेल ठिक आहे आम्ही व्यवस्था करतो २ वर्ष, ३ वर्ष आम्हाला करु देणार का? निचळची प्रक्रिया सुध्दा होत नाही हा तर एक भाग आहे साहेब, अनेक मुद्दे यामध्ये आहेत बोलायला गेलो तर सभागृहाचा भरपुर वेळ जाणार आहे.

भगवती शर्मा :-

साहेब इतना रामायण पढने के बाद में भी ७० कोटी नही भरना है। सबकुछ करना है यही भी बोल रहे है............

नरेंद्र मेहता :-

आयुक्त महोदय, मी परत आपल्याला सांगतो माझा पहिला प्रश्न हा होता की, ज्यावेळी अशाप्रकारचे निर्देश आले त्यावेळी सभागृहाने एखादा हा निर्णय घेतला असता ७० कोटी भरायचे असेल तर तुम्ही इमिजिएटली त्या कामाला सुरुवात करा. पैसे नाही हे आम्ही घेतल असत ना. आम्हाला दोन वर्षात १०-१०, २०-२० कोटी तरी जमल असत ना. हे आम्हाला काही माहिती नाही ना. कोणाला माहित आहे की ७० कोटी भरायचे आदेश आलेले आहेत. साहेब ७० कोटीचा विषय आजही शेवटी महापालिका आपलीच आहेत, अधिकारी आपले आहेत त्यातला मार्ग काढावा लागेल म्हणून आम्ही हा मजबुरीने ठराव करतोय आणि परिस्थिती आपली ७० कोटी आज आम्ही भरु शकत नाही आमची चिंता आहे की पुढचा आदेश असा तर नाही देणार ना. ठिक आहे तुम्ही भरु शकत नाही विषय संपला. ती तुम्हाला प्रक्रिया करावी लागेल. आज तुम्ही विषय आणता ना पूर्ण नाही आणला की हे आम्ही करतो आणि पूढे काय करणार हे आम्हाला काही माहिती नाही. आणि मला सांगा साहेब उद्या जर तुम्हाला काही करायच असेल तरी तुम्हाला आर्थिक प्रशासकीय मान्यता नको का? त्याल अप्रुव्हल नको का? तुम्ही कधी येणार आता सभा लागेल दिड दोन महिन्याने तुम्ही दोन महिन्यानंतर येणार ह्या परिस्थितीमध्ये किती गांभिर्य सर. ॲन्ड इट इज नॉट दी शॉर्ट स्टोरी. इट इज गोईंग फ्रॉम टू २००९. साहेब सुका आणि ओला हे तुम्ही त्यासाठी आल्या आल्या एवढे मोठा ऐतिहासिक त्या म्हणजे एक एक वेळी ५-५ हजार विद्यार्थी त्याप्रकारची रॅली काढली आपण प्रयत्न केला. बोर्ड लावले महापौर मॅडमने बोर्ड लावले. आपण होर्डिंग्ज लावले. शेवटी आपल्याकडे ती परिस्थिती नाही. मी तुम्हाला एक दोनदा फोन केला आता मीच फोन करायच सोडून दिल की, त्याला काही अर्थ नाही. नंतर सांगितल एक उचलल चुकुन उचलले हे उचलल ह्या सभागृहामध्ये जेवढे लोक आहेत त्यांनी एकाने सांगाव की त्यांच्याकडे दोन गाड्यात येतात एक सुका उचलायला आणि एक ओला उचलायला. साहेब कधी येत नाही. आपल्याला खाली एवढीच विनंती अहे ह्यामध्ये ह्या सभागृहाला वेठीस धरु नये. नुकसान कुठल्याही प्रकारचे होऊ नये. आयुक्त साहेब आपण कोर्टात भुमिका मांडा आणि याच स्टॉर्टपासून आतापर्यंत करुन ह्यामध्ये दोषी असतील त्यांना शिक्षा दिल्याशिवाय हे काही होत नाही. साहेब आम्ही दर वेळी तुम्ही कोर्टाची भिती दाखवून हा सभागृह व्हिटनेस आहे हॉस्पीटल आम्हाला कितीदा कोर्टाची भिती दाखविली आणि आम्हाला काही करुच दिल नाही शेवटी आम्ही धाडस पणाने निर्णय घेतला सरकारने निर्णय घेतला आता तुम्हाला पत्रही आल हे त्यांनी सांगाव साहेब कितीदा हा सभागृह विटनेस आहे.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

साहेब मी वस्तुस्थिती सांगितली. राष्ट्रवादी कॉंग्रेस..............

नरेंद्र मेहता :-

वस्तुस्थिती आज बदलली का. तोच कोर्ट तोच हॉस्पीटल सरकार बदलले त्यांना तुम्ही वारंवार काय सांगितल कोर्टाचे हे आदेश ते आदेश काही ना काही साहेब हरवेळी कोर्टाची भिती आम्हाला दाखवायची

आता हाई  इलेव्हन तलाव आम्हाला सभागृहाला अभ्यास सुध्दा करु दिला नाही की नंतर कोर्ट शिक्षा देतील कोर्ट हे करतील. आयत्यावेळी आम्हाला इलेव्हन तलावाचा विषय घ्यावा लागला आणि त्यांना २-२ वर्ष काही करता येत नाही. आम्हाला दोन तासही देत नाही साहेब स्टार्टपासून आतापर्यंतची आपण पूर्ण माहिती घ्या हा ७५ लाखाचा नाला असु द्या. किंवा तुमच एखाद्या आय.आय.टी.ला केलेला खर्च असू द्या त्याची मान्यता कुठे त्यचे अप्रुव्हल कुठे आय.आय.टी ने सुचविल्याप्रमाणे का काम केल नाही जुन्या कोर्टाने हायकोर्टाने डायरेक्शन दिल होतं. उत्तनला कुंपण भिंत बांधा, लिकेजसाठी गटर बांधा. तिकडे वृक्ष लावा हे सगळ लावा. पण याचा इतिहास तुम्ही बघितला तर त्याच्या अगोदर आम्ही ४ कोटी खर्च केले होते. भगवतीजी वह कौनसा प्रकल्प था। हमने ४ कोटी भरा था प्रफुल्लजी के टाईम पे। पहिला वह जो शेड लगाया था ते पण आम्ही ४ कोटी भरले आणि अधिकारी आम्हाला कायदा दाखवतात आम्ही त्यांच्या मागे लागतो ठिक आहे ४ खर्च करा ह्याला नुकसान आहे भरपाई द्या. सकवारला पैसे खर्च करा सकवारलाही खर्च केले आता सकवारला करायच नसेल सर तर ते सातबाऱ्याच्या भानगडीत नव्हत तर आपले पैसे परत मागवा. गोखिवरेला करायच असेल साहेब. तुम्हाला फॉरेस्टची अडचण आली होती. तुम्ही आपण दोघे जण सरकारकडे विनंती केली दोन दिवसात मार्गी लागला. याच काम नाही का फॉरेस्टची एक एन.ओ.सी. अडकलेली आहे तर यायला नको का? कोणाची मदत घ्या काहीच नाही. मागच्यावेळी सांगितल हॉस्पीटलच रिझर्व्हेशन झाल ६ महिने झाले आणि कधी माहितीच घेतली नाही की काय झालं इंटरेस्ट नाही. फॉरेस्टचे तुमच्याकडे किंवा आमच्याकडे किंवा लोकांकडून आणल असत तर आम्ही केल नसत का? ठराव पाहिजे त्यावेळी एकदा नाही दोनदा येतात सकाळी येतात, रात्री येतात हे करा ते करा. एकदाही सभागृहाला किंवा आम्हाला विश्वासात घेतल नाही ठिक आहे आमच्यावर नाही घेतल सभागृहाला तरी विश्वासात घ्यायला पाहिजे. मग काहीच करायच नाही आणि कोणाला काही करु द्यायच नाही. आणि अशा प्रकारचे मोठे नुकसान झालेले आहे. लोकांचे झालेले आहे प्रकल्पाचे झालेले आहे आणि भविष्यात सुध्दा मला खात्री आहे की, एवढ्या लवकर ह्यांच्या भरवश्यावर काम होऊ शकत नाही. आपण ह्यासाठी वेगळ कोणाला तरी स्पेशल अपॉईंट करा ह्यासाठी तुरंत त्याचा मार्ग लागेल हे तुम्हाला पण वेगळ उत्तर आणुन देतील आणि परत सर काही होणार नाही मी काही त्यांचा अपमान होण्यासाठी बोलत नाही परंतु एक असा व्यक्ती लावा की तो पूर्ततेने काम करेल सर रोज जाऊन त्या ऑफिसच्या बाहेर बसेल साहेब पाण्याची जेवढी परमिशन प्रशासनाने आणली कधी नागपुरला जाऊन, दिल्लीला जाऊन एवढ्या झपाट्याने काम केले त्यात तुमच्या अधिकाऱ्यांना त्यामध्ये इंटरेस्ट दाखवून काम केल म्हणून नाहीतर आजपर्यंत एवढ्या लवकर परवानग्या मिळत नाहीत. हेच त्यांनी केल असत तर हे झाल असत पण कुठल्याही प्रकारे कुणालाही विश्वासात न घेता जिकडे लागल तिकडे खर्च करा आणि आश्चर्य वाटताच पानपट्टे सर उपायुक्तांसारखा व्यक्ती बोलतो ते कोर्टाने सांगितल म्हणून टेंडर देऊन टाकल पैसे देऊन टाकले अस होत नाही हे तुम्हालाही माहित आहे. जो दोषी असेल त्याच्यावर योग्य कारवाई आणि ह्यामध्ये साहेब आपण व्यवस्थित मार्ग काढा. गरज पडल्यास सर्व गटनेत्यांची बैठक घ्या. विश्वासात घ्या महापौर दालनात लावा आणि सगळ्यांना विश्वासात घेऊन करा. ७० कोटी काय १०० कोटी तरी लागले तर भविष्यात आपण त्याला निधी उपलब्ध कसा त्याचा विचार करता येईल. परंतु एखाद्याने चुक करायची आणि आम्ही भरायची हे आम्हाला जमणार नाही.

लियाकत शेख :-

प्रकरण क्र. ९९ च्या ठरावाचे वाचन केले.

जुबेर इनामदार :-

माझे अनुमोदन आहे. मॅडम एक तास कमीत कमी सभागृहामध्ये चित्र स्पष्ट झाल सत्ताधाऱ्यांना स्थलांतरीत करायच नाही. करायच असत तर सकवार किंवा ग्रिव्हीन लवादाने आपल्याकडे पैसे त्यांना एच.डी. अकाऊंटमध्ये ठेवायला सांगितल तो फक्त डिपॉझीट तो काही फाईन पॅनल्टी नाही आहे. त्यांना शाश्वती पाहिजे की, आपण हे करणार आमची इच्छा आहे. मनापासून एवढा ज्वलंत विषय आहे. आणि सत्ताधारी अशाप्रकारे हाताळायचा म्हणजे हे योग्य नाही. कारण सर्वानुमते हा ठराव झाला पाहिजे होता.

नरेंद्र मेहता :-

सभागृहाला परत ही विनंती राहील राजकारण करायला भाषण करायला ह्या बाबी चांगल्या आहेत की ७० कोटी रुपये आपण ते भरायला पाहिजे. प्रकल्पाला ७० की १०० कोटी लागेल ते आम्ही आताच सांगितल ते आपण करायलाच पाहिजे. पण एकदमच ७० कोटी भरण आणि एक प्रकल्प चालु करुन त्याला आज १० कोटी ३ महिन्यानंतर ५ कोटी, ६ महिन्यानंतर अजुन २ कोटी ह्याप्रकारेच काम होणार आहे. आज महापालिकेची परिस्थिती आपणही महापालिका चालवलेली आहे. ७० कोटी रुपये भरणे ही आम्हाला आज.....

जुबेर इनामदार :-

७० नाही ७ भरा.

मा. महापौर :-

ते तुमच्या हातात नाही ना ७ भरा.

नरेंद्र मेहता :-

७ कोटीचा विषय नाही.............

जुबेर इनामदार :-

तुमची काय परिस्थिती आहे आर्थिक परिस्थिती तुम्ही सांगा फक्त अधिकाऱ्याला तुम्ही वेठीस धरतात दुसर काहीच करत नाही.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम मी विषयावर भाषण करत नाही मला खाली एक सांगायच आहे की, कोर्टामध्ये ज्यावेळी आपले ठराव जाईल तो राजकारण न करता एक मताने गेला पाहिजे. त्याला व्हॅल्यु जास्त राहील. महापौर मॅडम एक मताने गेलं तर ठरावाला महत्व राहील. नाही तर त्यामध्ये कोर्टाना पण हे होईल की नक्की काय चालले आहे. महापालिकेला दिसून येणार नाही. मी सांगितल आपल्याला माहित आहे. ७० कोटी रुपये उद्याच चेक काढून द्यायची आपली महापालिकेची ताकद आहे का? नाहीच आहे टप्याटप्याने काम करायची आपली ताकद आहे. आणि ते करायलाच पाहिजे त्यासाठी ७० किंवा १०० जे लागेल आपल्याकडे निधी नसेल तर आम्ही सरकारकडून आणु. आम्हाला खात्री आहे आमचे सरकार आम्हाला पैसे देतील. पण ७० कोटी आहेत. एक्स्ट्रा अकाऊंटमध्ये भरायला आपल्याकडे पैसे नाही आणि एखादा निर्णय कोर्टाचा झाला तर आपला विकास कामाची सगळी काम हे ठप्प होणार आहेत. आता जे प्रमोद सामंतजी म्हणत होते ह्या वॉर्डात ही काम ती काम............

जुबेर इनामदार :-

ते ३ कोटी रुपये इथे वर्ग करा.

नरेंद्र मेहता :-

३ काय आम्ही तर ३० द्यायला तयार आहोत.

जुबेर इनामदार :-

३ करा ७० चे ७ भरा पण कमीत कमी इच्छा दाखवा. हा शहराचा ज्वलंत विषय आहे म्हणजे तुम्हाला शहरामधला हा निचरा काढायचा नाही आहे. आदर्शवाद योजना रद्द करा आहे ते पैसे त्या ठिकाणी स्थलांतरीत करा.

मा. महापौर :-

सचिव साहेब मतदान घ्या.

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. ९९ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. प्रशांत केळुसकर, अनुमोदन श्री. मुन्ना सिंग. दुसरा ठराव सुचक श्री. लियाकत शेख, अनुमोदन श्री. जुबेर इनामदार. प्रथम मी दुसरा ठराव मतदानास घेत आहे. सुचक श्री. लियाकत शेख यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

सुचक श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने २७ विरोधात २१ तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. ९९ :-

घनकचरा प्रकल्प संदर्भात NGT पूणे न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार ७० कोटी रुपये मा. विभागीय आयुक्तांकडे जमा करणेबाबत निर्णय घेणे.

ठराव क्र. १०० :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे उत्तन-पाली येथे बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर माहे मे, २००८ मध्ये घनकचरा प्रक्रिया प्रकल्प सुरू करण्यात आला होता. परंतू सदरचा प्रकल्प दि.२५/१०/२०१३ पासून काही तांत्रिक कारणांमुळे बंद झाला आहे.

मौजे उत्तन येथील घनकचरा प्रकल्पाबाबत नागरीक हक्क संघर्ष समिती, पो. उत्तन यांनी मा. नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल, पुणे (पश्चिम विभाग) येथे महानगरपालिका विरोधात अर्ज क्र. ६५/२०१५ दाखल केली. दि.२१/७/२०१५ रोजी मा. ट्रिब्युनल यांनी महानगरपालिकेस कोकण विभागीय आयुक्त यांचेकडे रु. ७०.०० कोटी इतकी रक्कम एस्क्रो अकाऊंट उघडून ०४ आठवड्यांत जमा करणेस व मौजे उत्तन येथे टाकण्यात येणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्याचा प्रकल्प (Stop Gap Arrangement) सुरु करणेस आदेशित केले आहे.

महानगरपालिकेने मा. ट्रिब्युनल यांनी दिलेल्या आदेशानुसार आय.आय.टी., मुंबई यांची मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणी करणे कामी तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणुक केली आहे. आय.आय.टी., मुंबई यांचेकडून दि. ११/०३/२०१६ रोजी प्राप्त झालेल्या तांत्रिक सल्ल्यानुसार महानगरपालिकेने मौजे उत्तन येथील जागेवर घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणी करणे करीता बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर खालीलप्रमाणे तारखांना निविदा मागविण्यात आली होती.

१. दि. २७/०५/२०१६ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.
२. दि.०६/०७/२०१६ व दि. ०५/०८/२०१६ रोजी निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने मुदतवाढ देण्यात आली होती.
३. दि.२०/०९/२०१६ रोजी निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने फेर निविदा मागविण्यात आली होती.
४. दि.११/११/२०१६ रोजी प्रतिसाद न मिळाल्याने पुनश्चः फेर निविदा मागविण्यात आली होती.

महानगरपालिका सांविधिक कर्तव्य (Obligatory duties) म्हणुन घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन साफसफाई करणे, घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे, गोळा केलेला कचरा प्रकल्प ठिकाणी वाहतुक करणे इत्यादी करीता महानगरपालिका अंदाजित वार्षीक रु. ७०.०० कोटी खर्च करीत आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे महानगरपालिकेतर्फे बांधा, वापरा व हस्तांतरीत करावा या तत्वावर घनकचरा प्रक्रियेसाठी निविदा काढलेली आहे. त्यामुळे सदर प्रकल्प उभारणीसाठी महानगरपालिकेस कोणत्याही प्रकारची भांडवली गुंतवणुक करावी लागणार नाही. तथापी, प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर महानगरपालिका टिपिंग फि द्यावी लागणार आहे.

आज सभागृहामध्ये प्रशासनाने प्राप्त निविदा दि. २४/११/२०१६ रोजी उघडण्यात आली असून त्यामध्ये एक निविदा प्राप्त झाली. मे. सौराष्ट्र इन्व्हायरो प्रा. लि. यांची प्राप्त झाली आहे. त्यांचा तांत्रिक लिफाफा अभिप्राय मिळणेकरीता आय.आय.टी. मुंबई यांचेकडे पाठविण्यात आला असून अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर निविदाकाराचा दराचा लिफाफा उघडण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

मा. ट्रिब्युनल यांनी Misc. Application 363/2016 यात दि. २१/११/२०१६ रोजी यापूर्वी पारीत केलेल्या आदेशाची पुर्तता करण्यासाठी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नसल्याबाबतचा मा. महासभेचा ठराव करुन सादर करणेस आणि आयुक्त व उप-आयुक्त (आरोग्य) यांनी आदेशाची पुर्तता केल्याबाबत शपथपत्र दि. १४/१२/२०१६ रोजी दाखल करणेस आदेशित केलेले आहे.

सदर गोषवाऱ्याद्वारे प्रशासनाने मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन २०१५-१६ ची उत्पन्न व खर्चाची माहिती खालीलप्रमाणे सादर केलेली आहे.

| | |
|---|---|
| महानगरपालिकेचे एकुण महसुली उत्पन्न | रु. ४५८.५३ कोटी |
| भांडवली जमा | रु. १.६५ कोटी |
| एकुण | रु. ४६०.१८ कोटी |

| | |
|---|---|
| महानगरपालिकेचे एकुण महसुली खर्च | रु. ३२२.६३ कोटी |
| भांडवली खर्च | रु. १३७.०१ कोटी |
| एकुण | रु. ४५९.६४ कोटी |

आवश्यक खर्च :- १) अत्यावश्यक होणारा वार्षिक खर्च :- रु. २५८.०० कोटी (कर्मचारी वेतन, पाणी बिल, लाईट बिल, वॉर्ड साफसफाई, शिक्षण मंडळ वेतन, वाहन इंधन, कर्ज परतफेड इत्यादी)
२) महानगरपालिकेवर असलेले दायीत्व (कर्जाची सद्यस्थिती) :- रु. २१७.५० कोटी आहे.

महानगरपालिकेची उपरोक्त आर्थिक स्थिती व दायीत्व व कर्जाची सद्यस्थिती पाहता रु. ७०.०० कोटी जमा करणे आर्थिक दृष्ट्या शक्य होणार नाही. तरी सदरची आर्थिक वस्तुस्थिती मा. नॅशनल ग्रीन टिब्युनल (NGT) पुणे यांना कळविणेस आयुक्त यांना हि सभा प्राधिकृत करीत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदक :- श्री. मुन्ना सिंग

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | भानुशाली वर्षा गिरीधर | ३ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ४ | मीरादेवी रामलाल यादव | ४ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ५ | कोठारी सुमन रमेश | ५ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ६ | डॉ. नयना मनोज वसाणी | ६ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ७ | जैन गिता भरत | ७ | पाटील वंदना विकास | |
| ८ | अरोरा दिपिका पंकज | ८ | शबनम लियाकत शेख | |
| ९ | रावल भगवती जयशंकर | ९ | प्रभात प्रकाश पाटील | |
| १० | मेहता डिंपल विनोद | १० | पुजारी कांचना शेखर | |
| ११ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ११ | वंदना रामदास चक्रे | |
| १२ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १२ | अनिता जयवंत पाटील | |
| १३ | सुजाता रविकांत शिंदे | १३ | इनामदार जुबेर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | पाटील प्रेमनाथ गजानन | १४ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १५ | सिंग मदन उदितनारायण | १५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १६ | कांगणे यशवंत ठकाजी | १६ | सामंत प्रमोद जयराम | |
| १७ | जैन दिनेश तेजराज | १७ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| १८ | जैन रमेश धरमचंद | १८ | लियाकत ग. शेख | |
| १९ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | १९ | नरेश तुकाराम पाटील | |
| २० | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | २० | रविंद्र भिमदेव माळी | |
| २१ | प्रविण मोरेश्वर पाटील | २१ | वंदना मंगेश पाटील | |
| २२ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| २३ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| २४ | केळूसकर प्रशांत नारायण | | | |
| २५ | मुन्ना सिंग | | | |
| २६ | मयेकर सरस्वती रजनकांत | | | |
| २७ | अशोक तिवारी | | | |

ठराव बहुमताने मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रमोद सामंत :-

आयुक्त साहेब १९/०७/२०१४ चा एक ठराव शासनाने रद्द केला आहे. विकास कामांचा मंजुरीचा त्याची किती काम झाली आहेत? आणि आता ठराव रद्द केला आहे. आर्थिक प्रशासकीय मंजूरी आपण घेतली होती.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

माहिती घेऊन सांगतो साहेब.

प्रमोद सामंत :-

माहिती घेऊन सांगतो म्हणजे ह्या ठरावात आले आहे ना. अधिकाऱ्यांना बोलवा माहिती अधिकारी देतील ना. पाठ असते त्यांना कुठलं गटर कधी बनवल आहे ते आणि कुठल नाही बनवल असेच पैसे आलेले आहेत. पानपट्टे साहेब तुम्ही बोलवत नाहीत.

मा. महापौर :-

प्रमोद भाई आपको बोला माहिती लेके वह आपको बता देंगे अभी उनको पता नही।

प्रमोद सामंत :-

हमारे अधिकारी बैठे हुए है।

मा. महापौर :-

अभी वह विषय नही है............

प्रमोद सामंत :-

महापौर मॅडम विषय नसले तरी हा प्रशासनाचा पैशाचा गैरव्यवहार आहे तुम्ही त्याला मदत करत आहेत महापौर मॅडम.

भगवती शर्मा :-

त्रिशुल बिल्डींग मेहूल हनुमान जैन अल्प आयु में निधन हो गया। भगवान उनके आत्मा को शांती प्रदान करे। ऐसे ही रत्नसागर बिल्डींग में अल्प आयु अंदर में दर्शन श्रीपाल युवरा इनका निधन हो गया ईश्वर उनकी आत्मा को शांती दे। सर्जिकल स्ट्राईक बाद के अंदर में हमारे सेना के जवान करीबन ३० वहाँ पे लढाई करते हुए शहीद हुए ईश्वर उनकी आत्मा को भी शांती प्रदान करे। इसके साथ ही ८ नोव्हेंबर से लेके आज जो बँको की नोट की लाईन के अंदर में खडे खडे मृत्यू को प्राप्त हुए ईश्वर उनकी भी आत्मा को शांती दे।

जुबेर इनामदार :-

मिरारोड वसंत हाईट्समध्ये राहणाऱ्या नगरसेविका मर्लिन डिसा यांची भाची ५ वर्षांची तिचा अपघाती मृत्यू झालेला आहे त्यांचा शोक प्रस्ताव मी मांडतो.

प्र. नगरसचिव :-

सर्वांनी शांत उभे राहायचे आहे.

दु:खवठा ठराव क्र. १०१ :-

त्रिशुल बिल्डींग मेहूल हनुमान जैन अल्प आयु में निधन हो गया। रत्नसागर बिल्डींग में अल्प आयु अंदर में दर्शन श्रीपाल युवरा इनका निधन हो गया ईश्वर उनकी आत्मा को शांती दे। भारतीय सैन्यातील

मृत्युमुखी पडलेल्या जवानांचा शोकप्रस्ताव मांडत आहे. तसेच मिरारोड वसंत हाईट्समध्ये राहणाऱ्या नगरसेविका मर्लिन डिसा यांची भाची ५ वर्षांची तिचा अपघाती मृत्यू झालेला आहे त्यांचा शोक प्रस्ताव मी मांडतो.

सुचक :- श्री. जुबेर इनामदार    अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(सभा संपण्याची वेळ दु. २.१५ वाजता)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका